रुढी विधी व कला

विशेषांक

लेखन, संशोधन व संकलन
डॉ. श्रीमती मडिमन

अनुक्रमणिका

१४ विद्या

१. वेद
२. यजुर्वेद
३. सामवेद
४. अथर्ववेद
५. शिक्षा
६. कल्पसूत्रे
७. व्याकरण
८. निरूक्त
९. छंद
१०. ज्योतिष
११. न्याय
१२. मीमांसादर्शन
१३. पुराणे
१४. धर्मशास्त्र

६४ कला

१. गीतम्
२. वाद्यम्
३. नृत्यम्
४. आलेख्यम्
५. विशेषकच्छेद्यं
६. तण्डुलकुसुमवलिविकार
७. पुष्पास्तरणं
८. दशनवसनाङ्गराग
९. मणिभूमिका कर्म
१०. शयनरचनं
११. उदकवाद्यम्
१२. उदकघात
१३. चित्रयोग
१४. माल्यग्रथन विकल्प
१५. शेखरकापीडयोजनम्
१६. नेपथ्यप्रयोग
१७. कर्णपत्रभंग
१८. गंधयुक्ति
१९. भूषणयोजनम्
२०. ऐन्द्रजालयोग
२१. कौचुमारयोग
२२. हस्तलाघवं
२३. विचित्रशाकयूषभक्ष्य-विकार क्रिया
२४. पानकरसरागासव योजन
२५. सूचीवानकर्माणि
२६. सूत्रक्रीडा
२७. वीणाडमरूवाद्यानि
२८. प्रहेलिका
२९. प्रतिमाला
३०. दुर्वाचक योग
३१. पुस्तकवाचनं
३२. नाटकाख्यायिकादर्शनम्
३३. काव्यसमस्यापूरणं
३४. पट्टिकावानवेत्र विकल्प
३५. तक्षकर्माणि
३६. तक्षणम्
३७. वास्तुविद्या
३८. रूप्यरत्नपरीक्षा
३९. धातुवाद
४०. मणिरागाकरज्ञानम्
४१. वृक्षायुर्वेदयोग
४२. मेषकुक्कुटलावक युद्धविधि
४३. शुकसारिकाप्रलापनम्
४४. उत्सादने संवाहने केशमर्दने कौशलम्
४५. अक्षरमुष्टी
४६. मेच्छितविकल्प
४७. देशभाषाविज्ञानम्
४८. पुष्पशकटिका
४९. निमित्तज्ञानम्
५०. यन्त्रमातृका
५१. धारणमातृका
५२. सम्पाठ्यम्
५३. मानसिकाव्य क्रिया
५४. अभिधानकोश विज्ञानम्
५५. छन्दोविज्ञानं
५६. क्रियाकल्प
५७. छलितयोग
५८. वस्त्रगोपनानि
५९. द्यूतविशेष
६०. आकर्षक्रीडा
६१. बालक्रीडनकान्
६२. वैनयिकी विद्या
६३. वैजयिकी विद्या
६४. व्यायामिकी विद्या





विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्न गुप्तम् धनम् ।
विद्या भोगकरी यशःसुखकरी विद्या गुरुणां गुरू ॥

अशी विद्येची महती सांगितली आहे.

'न ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।' असे भगवद्‌गीता सांगते. ज्ञान हे पवित्रतम असल्यामुळे भारतीय संस्कृतीत विद्येला देवता मानलेले आहे. विद्या संपादन करण्यासाठी अतोनात श्रम करणे हे भारतीयांना जीवनाचे सारसर्वस्व वाटे. विद्यांची परिगणना ही प्राचीन काळीच सुरू झाली. वेगवेगळ्या शास्त्रांमध्ये विद्यांची संख्या वेगवेगळी दिली आहे. कुठे ती अठरा आहे तर कुठे चौदा. चार वेद, चार उपवेद, सहा वेदांगे मिळून चौदा विद्या होतात. त्यांची उत्तरांगे म्हणून दर्शन, इतिहास, पुराणे व यज्ञ ही मानली तर त्यांची संख्या अठरा होते.

श्रीगणेशाला चौदा विद्या व चौसष्ट कलांचा अधिपती मानले आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या आरंभी चौदा विद्यांनी सावयव व कलांनी मंडित अशा गणेशाचे स्तवन केलेले आहे. संत नामदेव गणेशाला आळविताना म्हणतात,

"चौदा विद्या तुमच्या कृपेने येतील । मुके बोलतील वेदघोष" ।

होनाजी बाळा गणपतीला आवाहन करताना म्हणतो,

"चौसष्ट कलांचा लेख कोणा न करवे"

'ज्या गोष्टीत कौशल्य दिसून येते ती कला' अशी कलेची सामान्य व्याख्या करता येते. व्यवहारातील प्रत्येक गोष्टीत कौशल्य लागते त्यामुळे निरनिराळ्या धंद्यांना 'कला' हे नाव पडले.

आदिमानवाच्या रानटी अवस्थेतही अनेक कला निर्माण झाल्या. उपजीविकेकरता शिकारीची हत्यारे करण्याची कला, शरीर विभूषित करण्याची कला, गुहांमधील चित्रकला तसेच सुतारकाम, लोहारकाम, शिल्पकला इत्यादी अनेक कलांचा आरंभ व विकास आदिमकाळापासून झाला. आहार - निद्रादी प्रवृत्तींच्या खालोखाल भावनांचे प्रदर्शन करणे मानवासाठी महत्त्वाचे होते त्यातूनच गायन, वादन, नर्तन याही कलांचा उदय झाला.

उपयुक्त कला व ललितकला यांची उपपत्ती ॲरिस्टॉटलसारख्या ग्रीक तत्त्ववेत्यांनी

मांडताना उपयुक्ततेला महत्त्व दिले. वैद्यक, शेतकी, चांभारकाम वगैरे कलांना महत्त्व देऊन केवळ मनोरंजनाच्या ललितकला कुचकामी ठरविल्या. काव्य, चित्र, संगीत या कलांनी शरीरपोषणाला मदत होत नाही किंवा संपत्तीतही भर पडत नाही असे असूनही या कलांची वाढ प्राचीन कालापासून चालू आहे याबद्दल ॲरिस्टॉटल आश्चर्य प्रगट करतो. आणि गंमत म्हणजे खुद्द ग्रीस व रोममध्ये संगीत, काव्य, चित्र आणि शिल्पकला यांची सतत प्रगती चालू राहून १४व्या १५व्या शतकात त्या अत्यंत उन्नत अवस्थेला पोचल्या होत्या.

पुढे कँट, शिलर यांसारख्या जर्मन पंडितांनी ललित कलांबद्दल असे म्हटले की, मनुष्यमात्रात इंद्रियसुखाच्या पाशवी वृत्तीचे व नैतिक प्रवृत्तीचे द्वंद्व सतत चालू असते याशिवाय एक प्रवृत्ती असते ती म्हणजे लीलाप्रवृत्ती. ललितकला त्यातूनच उगम पावतात. सद्भिरुची, सौंदर्यप्रेम या उच्च भावनांचे शिक्षण ललितकलांमधून मिळते. पण याही पुढे जाऊन असे म्हणता येते की, लीलाप्रवृत्ती, अनुकरणप्रवृत्ती, स्मारकेच्छा आणि भावना प्रदर्शन प्रवृत्ती या चार प्रवृत्तींमधून ललितकला निर्माण होतात.

कला या शब्दाचे विषयव्यापकत्व लक्षात घेऊन प्राचीन भारतीयांनी ६४ कला ठरविल्या आहेत. त्यांची यादी शुक्रनीतीत, भागवतात व वात्स्यायन कामसूत्रात निरनिराळी दिली आहे.

भरताच्या नाट्यशास्त्राच्या पूर्वी 'कला' हा शब्द ललितकला या अर्थी वापरला जात नव्हता. 'ललितकला' या अर्थी 'शिल्प' हा शब्द संहितांमध्ये व ब्राह्मणग्रंथांत सापडतो. पाणिनीच्या अष्टाध्यायीत व बौद्ध ग्रंथात 'शिल्प' हा शब्द उपयोगी कला व ललितकला ह्या दोन्ही अर्थाने वापरलेला दिसतो.

प्रबंधकोशात कलांची संख्या ७२ सांगितली आहे. ललितविस्तर या ग्रंथात 'पुरुषकला' या नावाखाली ८६ नावे दिली आहेत. क्षेमेंद्र या काश्मिरी पंडिताने आपल्या 'कलाविलास' या ग्रंथात कलांची फार मोठी सूची दिलेली आहे. त्या सूचीतील ६४ कला या जनोपयोगी असून त्यापैकी अर्ध्या पुरुषार्थाच्या प्राप्तीसाठी व अर्ध्या मात्सर्य-शील-प्रभाव-मान यासंबंधीच्या आहेत. याशिवाय सोनारांच्या सोने चोरण्याच्या ६४ कला, १० भेषज कला (वैद्यांच्या कला), १६ कायस्थांच्या कला तसेच १०० सारकला यांचीही या ग्रंथात चर्चा केली आहे.

वात्स्यायनाने ज्या ६४ कलांची यादी दिली आहे, ती सर्व नावे यजुर्वेदाच्या ३०व्या अध्यायात मिळतात.

प्रथम आपण चौदा विद्यांकडे वळू या.

१. वेद

मानव जातीचे आद्य धर्मग्रंथ आणि भारतीयांच्या सांस्कृतिक अस्मितेचे आद्य अधिष्ठान म्हणजे वेद होत. हे ग्रंथ केवळ भारतातच नव्हे तर साऱ्या जगात अद्वितीय मानले जातात. मानवी संस्कृतीच्या बाल्यकाळी निसर्गाच्या शांत तसेच रौद्र स्वरूपाकडे पाहून कधी आश्चर्यचकित होऊन, कधी दिपून जाऊन, कधी आनंदित होऊन तर कधी भयभीत होऊन आपल्या पूर्वजांना जी कवने स्फुरली तीच वेदवाणी होय.

विद् - या धातूपासून वेद या शब्दाची उत्पत्ती झाली असून त्याचा अर्थ ज्ञान, ज्ञानाचा विषय किंवा ज्ञानाचे साधन असा आहे.

मानवसृष्टीच्या आधी परमेश्वराने मानवाच्या कल्याणासाठी वेद निर्माण केले त्यामुळे ते 'अनादी' आहेत अशी वैदिकांची धारणा आहे. सायणाचार्य वेदांना परमेश्वराचे निःश्वास म्हणतात.

प्राचीन ऋषी तपश्चर्येत मग्न असताना त्यांना वेदांचा साक्षात्कार झाला. त्यांना परमेश्वराचे संगीत ऐकू आले, त्याचेच त्यांनी उच्चारण केले. या वाङ्मयसृष्टीला वेद हे नाव मिळाले. त्यामुळे ऋषींना मंत्रद्रष्टे म्हटले जाते व वेदांना श्रुतीवाङ्मय म्हटले जाते.

वेद प्रथम कोणी लिहिले हे निश्चित सांगता येत नाही पण भारतीय दर्शनांच्या मते शब्द हा नित्य असून त्याचा अर्थाशी स्वयंभू असा संबंध असतो. वेदातील शब्द नित्य समजले गेले असल्यामुळे वेद अपौरुषेय ठरले. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

पै अहितापासूनि काढिती । हित देऊनि वाढविती ॥
नाही श्रुतीपरौती । माऊली जगा ॥ (ज्ञानेश्वरी १६/४६२)

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद मानले गेले.

ऋग्वेद

ऋग्वेद हा आद्यग्रंथ आहे. विद्वानांच्या मते आपले पूर्वज उत्तर ध्रुवप्रदेशात राहत होते. तिथले हवामान जीवनानुकूल नसल्यामुळे तो प्रदेश सोडून, मध्य-आशियात येऊन ते स्थायिक झाले. वेदांचे पहिले निर्मितीस्थान मध्य-आशिया हेच आहे. ऋग्वेदाची भाषा व पर्शियन, ग्रीक, लॅटीन, स्लाव्हिक इत्यादी भाषांमध्ये बरेच साम्य आढळते. त्यावरून हे सर्व लोक प्रथम एकत्र राहत असावेत असा कयास आहे. मग निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या ठिकाणी स्थायिक झाल्या. त्यातील काही भारतातील सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थायिक झाल्या व आर्य म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. सप्तसिंधूच्या प्रदेशात आल्यावर नद्या, ऋतुमान, समृद्धी या सर्व गोष्टी त्यांना अनुकूल ठरल्या. त्यानंतर सूर्य, उषस्, पर्जन्य, पृथ्वी अशा नव्या देवतांसाठी नव्या ऋचा रचल्या गेल्या. निरनिराळ्या मंत्रांचे संहितीकरण झाले. देवतांना उद्देशून जी सूक्ते गायली गेली त्याची एक संहिता तयार झाली. एकाच ऋषिकुलातील लोकांनी रचलेली सूक्ते एकत्र करण्यात आली व त्यातूनच दहा मंडले असलेली ऋग्वेदसंहिता तयार झाली.

ऋग्वेदातील पुष्कळशा देवतासूक्तांमध्ये विभिन्न सृष्टिचमत्कारांना देवतास्वरूप मानून त्यांच्या कृपेची आणि संरक्षणाची याचना केलेली दिसते. सृष्टीतील अनाकलनीय पंचमहाभूतांनी आणि सृष्टि चमत्कारांनी मानव ज्या काळी भयभीत व स्तिमित झाला होता अशा काळी ऋग्वेदातील देवतासूक्तांची रचना झाली आहे. त्यात भावनाप्रधानता व कल्पनेच्या भराऱ्या जास्त दिसतात.

ऋग्वेदातील देवता व सृष्टिचमत्कार यांची सांगड खालीलप्रमाणे घालता येईल. अग्नी - अग्नी, अप् - जल, अश्विनीकुमार - उषःकालपूर्व संधिप्रकाश, आदित्य - सूर्य, इंद्र - मेघगर्जना, उषा - उषःकाल, मरूत् - पर्जन्यकालीन झंझावात वगैरे.

सृष्टीची उत्पत्ती, परमेश्वराचे स्वरूप आणि सामर्थ्य, आत्मा-जीव यांचे परस्पर

संबंध, चेतन-अचेतन सृष्टीतील गूढतत्त्व, वगैरेंचे सविस्तर विवरण ऋग्वेदात आढळते.

उपनिषदे, पातंजल योगसाधना, पौराणिक साहित्यातील भक्तिसंप्रदाय, तंत्रसंप्रदायाच्या ग्रंथातील मंत्रविद्या, मनुयाज्ञवल्क्यादी स्मृतींमधील धर्मनियम या साऱ्या धर्मविषयक तत्त्वज्ञानशाखांचे मूळ ऋग्वेदात आहे. अनेक स्त्रिया मंत्रकर्त्या आहेत त्यावरून त्यांचे समाजातले स्थान कळते. ऋग्वेदातील मंत्र प्रदीर्घ तपश्चर्येने स्फुरलेले असल्याने त्याचा गूढ अर्थ सहज समजणे अशक्य होते. ते समजण्यासाठी व त्यातील दैवी शक्ती शरीरात बाणवण्यासाठी गायत्री मंत्रासारखे अनेक जपमंत्र ऋग्वेदात आढळतात. धर्माची मूलतत्त्वे ग्रंथित करणारी अनेक सुभाषिते ऋग्वेदात आढळतात. उदा. सत्या देवेष्वाशिषो जगाम (चांगले काम करणाऱ्या व्यक्तीला देवांचे आशीर्वाद प्राप्त होतात.) ऋतस्य पन्थां न तरन्ति दुष्कृतः (पापी लोक सत्यमार्ग तरून जाऊ शकत नाही) अतप्ततनूर्न तदामो अश्नुते (कष्ट न करणाऱ्या भक्ताचे अन्न देव स्वीकारीत नाही) ऋग्वेदातील धर्मप्रतिपादन हे प्रामुख्याने यज्ञप्रधान असले तरी त्यामधील यज्ञाची संकल्पना होमहवनादी कर्मकांडाहून अधिक व्यापक आहे. स्वतःचा क्षुद्र स्वार्थ सोडून दया, दान, अहिंसा ह्या गुणांच्या साहाय्याने सर्वस्वाचे बलिदान करण्याची प्रेरणा वैदिक आर्यांच्या यज्ञसंस्थेमध्ये अभिप्रेत आहे. मानवांनी अर्पिलेल्या यज्ञाहुतीमुळे सूर्यास नवचैतन्य प्राप्त होते, तो पर्जन्यवृष्टी करतो, त्यामुळे अन्न निर्माण होते व मनुष्याचे आणि प्राणिमात्रांचे पोषण होते असा यज्ञ आणि लोकजीवन यामधील संबंध ऋग्वेदात वर्णिला आहे. गीतेतील 'अन्नाद् भवन्ति-भूतानि' या श्लोकात या विचाराचा पुनरुच्चार दिसतो.

ऋग्वेदात एकूण १०५५२ कवने, ऋचा अथवा मंत्र असून हे मंत्र १०२८ अध्याय अथवा सूक्त आणि १० विभाग अथवा मंडल यांमध्ये एकत्रित केले आहेत

२. यजुर्वेद

दुसरा वेद यजुर्वेद. ज्ञान, कर्म आणि उपासना या जीवनविकासाच्या तीन श्रेणी आहेत. त्यामधील कर्मश्रेणी किंवा कर्मकांडांचे प्रतिपादन यजुर्वेदाने केले आहे. वैदिक कर्मकांडांचा मुख्य आधार यजुर्वेद असून त्यात यज्ञसंस्थेचा तपशीलवार विचार आहे. 'यजुस' म्हणजे गद्यमंत्र. निरनिराळ्या यज्ञात जे विशिष्ट मंत्र म्हणावयाचे असतात किंवा जे विशिष्ट नियम पाळावयाचे असतात त्या मंत्रांच्या आणि नियमांच्या संग्रहाला यजुर्वेद हे नाव आहे. यजुर्वेदाचे कृष्ण व शुक्ल असे दोन भेद आहेत. तसेच ब्रह्म व आदित्य हे दोन संप्रदाय आहेत. ब्रह्म संप्रदायाचा प्रतिनिधी कृष्ण यजुर्वेद व आदित्य संप्रदायाचा शुक्ल यजुर्वेद आहे.

हे दोन भाग का झाले यासंबंधी एक कथा आहे. यजुर्वेदाचे मुख्य आचार्य वैशंपायन ऋषी होते. त्यांनी याज्ञवल्क्यासारखे अनेक शिष्य तयार केले. पुढे याज्ञवल्क्य व गुरू वैशंपायन यांच्यामध्ये काही कारणाने वितुष्ट आले. वैशंपायनाने रागाने 'मी तुला जो वेद शिकविला तो मला परत देऊन टाक' असे सांगितले. याज्ञवल्क्याने वेदविद्येला मूर्तिमंत करून तिचे वमन केले व त्या स्वरूपात गुरूचा वेद त्याला परत केला. मग सूर्याची उपासना करून त्याच्याकडून याज्ञवल्क्याने स्वतःसाठी वेद मिळविला त्याला शुक्ल यजुर्वेद असे गौरवपर नाव दिले. त्याच्या विरोधात वैशंपायनाच्या जुन्या यजुर्वेदाला कृष्ण यजुर्वेद म्हणू लागले. याज्ञवल्क्याने जनमेजय तसेच जनक राजा यांच्यावर आपला प्रभाव पाडून त्या राजाश्रयाच्या बळावर आपल्या नव्या वेदाचा उत्तर भारतात धडाडीने प्रचार केला. कृष्ण यजुर्वेदाला त्या भागात स्थान उरले नाही त्यामुळे त्या लोकांनी दक्षिणापथाचा आश्रय घेतला व दक्षिणेकडे त्यांचा अधिक प्रचार झाला. शुक्ल यजुर्वेदाच्या १५ शाखा आहेत तर कृष्ण यजुर्वेदाच्या लहान लहान ३९ शाखा आहेत.

यजुर्वेदात चारही वर्णांची व्यवस्थित वाढ झालेली दिसते. ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन्ही वर्ण पूर्णावस्थेस पोहोचलेले दिसतात. ह्या दोन वर्णांचे हितसंबंध विशेष प्रकारे सुरक्षित केलेले असून ह्या दोघांच्या कल्याणाकरताच

यजुर्वेदात देवतांची आराधना केलेली दिसते. देवतांविषयी कल्पनांमध्ये फारशी प्रगती झालेली दिसत नाही. ऋग्वेदातील देवतांचीच यजुर्वेदातही आराधना व प्रार्थना असून याच देवतांना हविर्भाग अर्पण करण्यास सांगितले आहे. अत्यंत महत्त्वाचा फेरफार प्रजापती, विष्णू व रुद्र या देवतांच्या दर्जामध्ये झाला असून या देवतात्रयीचा गुणकर्मानुसार वेगळेपणाचा प्रारंभ यजुर्वेदात झाला आहे.

कृष्ण यजुर्वेदाची तैत्तिरिय संहिता प्रसिद्ध आहे. तेलंग किंवा द्रविड ब्राह्मण त्यालाच आपस्तंब शाखा म्हणतात.

शुक्ल यजुर्वेदाची वाजसनेयी संहिता व महत्त्वाचा ग्रंथ शतपथ ब्राह्मण होय.

३. सामवेद

तिसरा वेद म्हणजे सामवेद. बृहदारण्यकात साम शब्दाची व्युत्पत्ती आढळते. सा म्हणजे ऋचा आणि अम म्हणजे गांधारादी स्वर होत. दोन्ही मिळून साम होते. सामवेदात ऋग्वेदातील पुष्कळसे मंत्र घेतले असून त्यांच्या आधारे केल्या जाणाऱ्या गायनाला साम म्हणतात. बृहद्देवता ग्रंथात ''सामानियोवेत्ति स वेद तत्त्वम्'' म्हणजे जो पुरुष साम जाणतो त्यालाच वेदांचे रहस्य समजते असे सांगितले आहे.''वेदानां सामवेदोऽस्मि ।'' असे गीतेमध्ये श्रीकृष्णाने सामवेदाला गौरविले आहे. यज्ञसंस्थेचा विचार करता ऋग्, यजू, साम या तिन्ही वेदांचा यज्ञाशी प्रत्यक्ष संबंध येतो. यज्ञातील वेगवेगळी कामे करणारे ऋत्विज निरनिराळे असतात. देवतांना संतुष्ट करण्यासाठी ऋचांचे गायन करण्याचे काम सामवेद्यांचे असते. ते करणाऱ्या चार ऋत्विजांचा एक गट असतो. त्याच्या प्रमुखाला उद्गाता असे म्हणतात.

एखादे साम तयार झाले की त्याच्या गायनाचे पाच अवयव होतात. (१) प्रस्ताव - हा मंत्राचा आरंभाचा भाग असतो तो प्रारंभ हुं अशा उच्चाराने होतो. गायक गटातला प्रस्तोता हा या अवयवाचे गायन करतो. (२) उद्गीथ - या अवयवाच्या प्रारंभी ओमकार उच्चारला जातो व उद्गाता हा गायक हा अवयव उच्च स्वरात म्हणतो. (३) प्रतीहार - याचा अर्थ दोन पदांना जोडणारा. याच्या शेवटी ओमकार येतो आणि हा अवयव प्रतिहर्ता गातो. (४) उपद्रव - या नावाचा एक अवयव असतो तो उद्गाता गातो. (५) निधन - यात मंत्राच्या अंतिम दोन पदांचे अंश किंवा ॐकार राहतो, याचे गायन उद्गाता, प्रस्तोता आणि प्रतिहर्ता असे तिघे मिळून करतात. सामयोनी मंत्राच्या आधाराने ऋषींनी गानपद्धतीची रचना केली आहे. (१) ग्रामगेयगान यालाच प्रकृतीगान किंवा वेयगान म्हणतात, (२) आरण्यकगान, (३) ऊहगान, (४) ऊह्यगान किंवा रहस्यगान.

सामगान करताना त्यातील ऋचांची आवृत्ती केली जाते. अशा आवृत्त ऋचेला स्तोम म्हणतात. सामगायनात पदांच्या वर १ ते ७ अंकांनी संगीताच्या स्वरांचा निर्देश केला जातो. अधिकांश मंत्रांमध्ये पाचच स्वर लागतात. सहा स्वरांनी गायली जाणारी सामे थोडी आहेत. सात स्वरांची खूपच कमी आहेत. सामगायनातल्या या सात स्वरांचा बासरीच्या सात स्वरांशी संबंध येतो.

पतंजलीच्या सांगण्यानुसार एकेकाळी सामवेदाच्या सहस्र शाखा असाव्या पण त्यातील १३ ऋषींचीच नावे उपलब्ध आहेत. त्यातही सध्या तीनच अस्तित्वात आहेत. कौथुम ही गुजरातेत आहे. राणायनीय शाखा महाराष्ट्रात तर केरळ व तंजावर जिल्ह्यात जैमिनीय शाखा आहे.

४. अथर्ववेद

हा चतुर्थ वेद म्हणून मान्यता पावला असला तरी ब्राह्मणवर्गाने हा वेदत्रयीमध्ये समावेश करण्यास नाकारलेला आहे. हा यज्ञसंस्थेच्या दृष्टीने ऋग्वेदाहून कमी महत्त्वाचा असला तरी भारतीय लोकसाहित्याचा आद्य स्रोत या दृष्टीने, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने तो ऋग्वेदाहून अधिक महत्त्वपूर्ण आहे. हा समाजाच्या सर्व थरांना स्पर्श करतो. भारतीय ग्रामीण जनतेच्या आशाआकांक्षा आणि भयभावना यांचे सुंदर चित्रण येथे आहे. या सर्वसंग्राहकतेमुळे चतुर्वेदांपासून याची फारकत झाली किंबहुना धर्मग्रंथ म्हणूनही मान्यता हिरावून घेण्यात आली. लोकसाहित्य या नात्याने अथर्ववेदाचे वैशिष्ट्य असे की, त्यामध्ये सांगितलेले मंत्र-तंत्र, गंडेदोरे, ताईत, आकृती, तोडगे, संकटनिवारण पद्धतींचा प्रचार आजही समाजात दिसतो. अथर्ववेदात यातुविद्या प्रसिद्ध असून स्त्रीवशीकरण व रणभूमीतील शत्रूंचे निर्दालन हे त्याचे दोन प्रमुख विषय आहेत. जनसामान्यांच्या अंधविश्वासस्वरूप अभिचार विधींना आणि मंत्रतंत्राना धर्मविधी मानण्याच्या अथर्ववेदाच्या कटाक्षामुळे लोकमानसात प्रचलित असणाऱ्या भूतपिशाचादी देवतांना नवे महत्त्व प्राप्त झाले. ऋग्वेदात परम सात्त्विक मानलेल्या अग्नी, इंद्र, मरुत बृहस्पती, वरुण आदी देवतांना येथे जनसामान्यांच्या अभिचार विधींमध्ये सरसहा समाविष्ट केले आहे आणि दानव, प्रेते, जादूगार, अभिचारक आणि अभिचारक-पुत्रांच्या वधार्थ त्यांना आवाहन केले आहे. लोकदेवतांना अवास्तव महत्त्व आले आहे.

अन्य वेदांप्रमाणे यज्ञप्रक्रियेचे अथवा मुहूर्तादिकांचे अवडंबर अथर्ववेदात नसल्याने समस्त वेदांचे सारभूत अशा या वेदाचे पठण विशेष फलप्रद मानण्याची प्रथा पौराणिक काली सामान्य लोकांमध्ये रूढ झाली.

पद्मपुराणात म्हटले आहे, ''न तिथिर्न नक्षत्रं न ग्रहोनच चंद्रमाः। अथर्व मन्त्रसम्प्राप्त्या सर्वसिद्धिर्भविष्यति। (तिथी, नक्षत्रे, ग्रह, चंद्र यापैकी कुठलीही अनुकूलता नसली तरी अथर्वमंत्राच्या केवळ पठणाने इच्छित कार्य सिद्धीस जाते).

सायणाचार्य म्हणतो की अन्य वेदग्रंथाप्रमाणे हा केवळ पारलौकिक फळ देणारा नसून ऐहिक व पारलौकिक अशी दोन्ही फळे अथर्ववेदामुळे मिळतात.

शौनक अथर्वसंहिता उपलब्ध असून त्यात ६००० मंत्र आहेत. २० काण्डे आहेत. त्यापैकी १२०० मंत्र ऋग्वेदातील वेगवेगळ्या मंडलातले आहेत. अथर्वन् आणि अंगिरस ऋषींचा निर्देश अथर्ववेदात अनेक ठिकाणी असून जवळजवळ एक चतुर्थांश (१/४) मंत्र

अथर्वन् आणि अथर्वन् वंशीय ऋषींनी रचलेले असल्यामुळे ह्यास वेवारू अथर्ववेद म्हणतात.

रोगनाशन सूक्ते (भैषज्य) दीर्घायुष्य सूक्ते, शत्रूविरोधी जादुटोण्याची सूक्ते, स्त्रीसंबंधी अभिचार सूक्ते, समृद्धिप्राप्तीची सूक्ते, पापाचे प्रायश्चित करण्याची सूक्ते असे विविध विषय अथर्ववेद हाताळतो.

वेदांगे

वेदातील मंत्राचा अर्थ नीट समजण्यासाठी तसेच विशेष विवरण करण्यासाठी वेदांगांचा उपयोग होतो. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष ही सहा वेदांगे मानली आहेत.

पाणिनीच्या मताने वेदपुरुषाची शिक्षा ही नासिका आहे, कल्प हे हात आहेत, व्याकरण मुख आहे, निरुक्त कान आहेत, छंद हे पाय आहेत व ज्योतिष हे नेत्र आहेत.

श्रुती वाङ्मयात वेदांगाचा समावेश होत नाही कारण वेद हे अपौरुषेय मानले आहेत व वेदांगे ही मानवनिर्मित आहेत त्यामुळे त्यांचा अंतर्भाव स्मृतिवाङ्मयात करतात.

५. शिक्षा

हे वेदपुरुषाचे नाक आहे. स्वर, वर्ण इत्यादींचा उच्चार कसा करावा ते शिकविणारी ही विद्या आहे. वेदमंत्रांचा उच्चार नीट व्हावा म्हणून स्वरज्ञानाची आवश्यकता आहे. स्वर हे शब्दांचे अर्थनियामक आहे. शब्द एकच असला तरी त्याच्या उच्चारात स्वरभेद झाला की त्याचा अर्थ भिन्न होतो. स्वरात थोडी जरी चूक झाली तरी अर्थाचा अनर्थ होतो.

'यथेन्द्रशत्रुः स्वरतोऽपराधात् ।' इथे स्वराच्या चुकीच्या उच्चारणामुळे इंद्रशत्रू शब्द यजमानाचा घातक ठरला. ती गोष्ट अशी : त्वष्ट्याने आपला शत्रू इंद्र, त्याच्या नाशासाठी यज्ञ केला. या ठिकाणी ऋत्विजांची नेमणूक केली. यज्ञातील प्रधान मंत्र होता. इन्द्रशत्रुर्वर्धस्व = इंद्राचा शत्रू वाढो. हा अर्थ अन्तोदात्त उच्चारल्याने मिळत होता.

परंतु ऋत्विजांकडून तो बेसावधपणे आदिउदात्त उच्चारला गेला त्यामुळे त्याचा अर्थ इंद्र ज्याचा शत्रू आहे असा होऊन यज्ञाचे फल यजमानाला उलटे मिळाले.

म्हणून प्राचीन गुरू मंत्रोच्चारणाबाबत जागरूक असत. तैत्तिरिय उपनिषदात शिक्षेची सहा अंगे सांगितली आहेत. वर्ण, स्वर, मात्रा, बल, साम व संतान.

वर्ण म्हणजे अक्षर - वेदांच्या ज्ञानासाठी संस्कृत वर्णमालेचे ज्ञान आवश्यक आहे.



स्वर - उदात्त, अनुदात्त व स्वरित असे तीन स्वर आहेत. उच्च स्वराला उदात्त, नीच स्वराला अनुदात्त व दोघांच्या मधल्या स्वराला स्वरित म्हणतात. स्वराचा उच्चार करायला जेवढा वेळ लागतो त्याला मात्रा म्हणतात. ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत असे मात्रेचे तीन प्रकार आहेत. एक मात्रा म्हणजे ऱ्हस्व, दोन मात्रा म्हणजे दीर्घ व तीन मात्रांच्या उच्चाराला जो वेळ लागतो त्याला प्लुत म्हणतात.

बल म्हणजे वर्णोच्चाराचे स्थान होय. साम याचा अर्थ साम्य असा आहे. दोषरहित माधुर्यादी गुणांनी युक्त अशा उच्चाराला साम म्हणतात. संतान म्हणजे संहिता - अर्थात पदांचे सानिध्य म्हणतात. ते असले की पदांचा संधी होतो.

प्रत्येक वेदात वर्णांचा उच्चार एकाच प्रकारे होत नाही. त्यामुळे प्रत्येक वेदाचा स्वतःचा शिक्षाग्रंथ असतो.

पाणिनीय शिक्षा, याज्ञवल्क्य शिक्षा, वासिष्ठी शिक्षा वगैरे शिक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत.

६. कल्पसूत्रे

विधी, नियम, न्याय इत्यादी कल्प शब्दाचे अर्थ आहेत. अल्पाक्षर, असंदिग्ध, साररूप व व्यापक अर्थ सांगणाऱ्या वाक्याला सूत्र (Formula) म्हणतात. त्यामुळे विधी व नियम सांगणारी जी सूत्रे असतात त्यांना कल्पसूत्रे म्हणतात. कल्पसूत्रे कर्मकांडांविषयी विधि-नियम सांगतात. वैदिक धर्मातील सारी कर्मे, सगळे संस्कार, सगळी अनुष्ठाने, सगळे रीतिरिवाज कल्पसूत्रातूनच निर्माण झाले आहेत. धर्मानुष्ठानात मानवी भावना संलग्न करणे व धार्मिक विधी-नियमांच्या चाकोरीत व्यक्ती आणि समाज यांचे जीवन संयत करणे हा कल्पसूत्रांचा मुख्य उद्देश्य आहे.

कल्पसूत्रे तीन प्रकारची आहेत. श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे आणि धर्मसूत्रे.

श्रौतसूत्रांमध्ये श्रौत यज्ञांचे विवरण मिळते. धर्माचा व यज्ञसंस्थेचा इतिहास या सूत्रांमध्ये मिळतो.

गृह्यसूत्रांमध्ये वैदिकांच्या कुटुंबांमध्ये जन्मापासून मृत्यूपर्यंत जे वेगवेगळे संस्कार केले जातात त्याचप्रमाणे विविध कर्तव्ये आणि अनुष्ठाने पार पाडली जातात त्याचे विवरण सापडते.



धर्मसूत्रांमध्ये सामाजिक, राजनैतिक, पारमार्थिक कर्तव्ये, वर्णाश्रमधर्माची कर्तव्ये, विवाद, दायभाग, कर, स्त्रीचे समाजातील स्थान, चौर्य व्यभिचारादी अपराधांना दंड वगैरे विषय हाताळलेले असतात. कल्पसूत्रात त्या त्या विधीबरोबर कोणते मंत्र म्हणावेत तेही सांगितले आहे.

७. व्याकरण

व्याक्रियन्ते शब्द अनेन इति व्याकरणम्।

ज्याच्या द्वारे अपशब्दांपासून सुशब्द वेगळे काढले जातात किंवा ज्याच्यापासून चांगल्या शब्दांचे ज्ञान होते ते व्याकरण होय. व्याकरणास शब्दानुशासनही म्हणतात. शब्दांचे अनुशासन करणे म्हणजेच शब्दसिद्धी करणे हे व्याकरणाचे प्रमुख कार्य आहे. कोणत्या शब्दाचा कशा प्रकारे प्रयोग करावा हे व्याकरणामुळे समजते. वेद अभ्यासकांना समजावेत म्हणून व्याकरणाची गरज निर्माण झाली. त्याच्याबद्दल कथा अशी. एकदा प्रबुद्ध देव देवाधिपती इंद्राकडे गेले व प्रार्थना करून म्हणाले की, वेद आमची भाषा आहे पण ती अव्याकृत आहे तिचे व्याकरण व्हायला हवे. इंद्राने ते मान्य केले. प्रत्येक पद मध्ये तोडून प्रकृति-प्रत्यय भेदाने व्याकरण निर्माण केले. वररुचीने व्याकरणाची पाच प्रयोजने सांगितली आहेत.

(१) रक्षा : वेदांचे रक्षण करणे.

(२) ऊह : नव्या पदांची कल्पना करणे.

(३) आगम : स्वतः श्रुती हीच व्याकरणाच्या अध्ययनासाठी प्रमाणभूत मानणे.

(४) लघु : संस्कृत भाषेतील प्रत्येक शुद्ध शब्दाचे अध्ययन करणे अशक्य त्यामुळे व्याकरण हा छोटा सुटसुटीत उपाय आहे.

(५) असंदेह : वैदिक विषयांच्या संदर्भात उत्पन्न होणाऱ्या संदेहांचे निराकरण व्याकरणच करू शकते.

याव्यतिरिक्त पतंजलीने आणखी काही प्रयोजने सांगितली आहेत :

अपभाषण : अशुद्ध शब्द उच्चारले जाणार नाहीत याची काळजी व्याकरण घेते.

दुष्टशब्द : शब्दांच्या शुद्धाशुद्धतेचे ज्ञान व्याकरणाधीन असते.

अर्थज्ञान : वेदांचा अर्थ समजण्यासाठी व्याकरणाचे ज्ञान आवश्यक आहे.

धर्मलाभ : जो मनुष्य भाषेच्या व्यवहारात शुद्ध शब्दप्रयोग करतो तो स्वर्गलोकी अनंत फळे मिळवतो आणि अपशब्द वापरतो तो पापाचा धनी होतो.

'पाणिनीय व्याकरण' हा व्याकरणाचा मान्यवर ग्रंथ आहे. पाणिनीनंतर संस्कृतात नव्याने आलेल्या शब्दांची व्याख्या कात्यायनाने आपल्या वार्तिकांमध्ये केली. पतंजलीचे महाभाष्य हे पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवरच आहे. पाणिनी, कात्यायन व पतंजली यांना व्याकरणाचे मुनित्रय म्हणतात.

८. निरुक्त

निरुक्त ही निघण्टूवरची टीका आहे. पण निरुक्त आणि निघण्टू या दोन्ही ग्रंथांना मिळूनच निरुक्त ही संज्ञा पूर्वीपासून पडली आहे. यास्क हा निरुक्ताचा कर्ता आहे. दुर्गाचार्य म्हणतो की अर्थाचे परिपूर्ण ज्ञान निरुक्त घडवत असल्यामुळे ते सर्व वेदांगे व शास्त्रे यांच्यामध्ये श्रेष्ठ आहे. वेदार्थ जाणण्यासाठी निरुक्ताची आवश्यकता आहे. निरुक्त हे व्याकरणशास्त्राचे पूरक आहे. त्यात शब्दांचा संपूर्णपणे विचार केला जातो. शब्दांचे केवळ अर्थ दिलेले नसतात तर त्या अर्थाशी जुळणारी त्यांची व्युत्पत्ती केलेली असते. त्याची विवरण पद्धती अशी आहे : (१) तो वेदांच्या ऋचेतील शब्दांचा क्रम जसाच्या तसा ठेवतो. (२) उपसर्ग व क्रियापदे एकत्र आणतो. (३) वैदिक शब्दांचे अर्वाचीन पर्याय देतो. (४) अर्वाचीन संस्कृतात असलेले शब्द जसेच्या तसे ठेवतो. (५) जाता जाता शब्दांच्या व्युत्पत्ती करतो. सर्व नामे धातूंपासून उत्पन्न होतात हा निरुक्ताचा मुख्य सिद्धान्त आहे व वर्तमान भाषाशास्त्रांज्ञानाही हा सिद्धान्त मान्य आहे. जेव्हा धातू व नाम यांच्यात कोणताही मेळ नसतो तेव्हा व्युत्पत्ती करणाऱ्याने त्या नामाचा अर्थ लक्षात घ्यावा व अर्थावर भिस्त ठेवून तदर्थक धातू शोधून काढून त्या धातूचे नामाला जवळ असणारे रूप कोणते ते पाहून त्या नामाची व्युत्पत्ती करावी. उदा. वधू हा शब्द. या शब्दात वध् हा धातू दिसतो पण वधूचा ठार मारण्याशी काही संबंध नसल्यामुळे दुसरा जवळचा धातू शोधून काढला पाहिजे. असा धातू वह् हा आहे कारण वधू माहेराहून सासरी व सासरहून माहेरी नेली जाते. वह् + ऊ = वहू = वधू.

निरुक्ताचे चौदा अध्याय आहेत. यास्काच्या पूर्वी १२ निरुक्तकार होऊन गेले पण निरुक्तविषयक वाङ्मयात यास्काचा ग्रंथ अप्रतिम आणि शेवटचा ठरला.

९. छंद

वेदकालीन इष्टदेवतेला वृत्तांनी संतुष्ट केले म्हणून त्या वैदिक वृत्तांना छंदस म्हणतात. (शतपथ ब्राह्मण ८.५.२१) मानवी साहित्याचे सर्वांत जुने नमुने छंदोबद्धच आहेत. वेदांतील छंद अक्षरनिर्भर आहेत. छंदांचे चरण घेऊन त्यातील अक्षरे सांगण्याची वैदिक पद्धती रूढ होण्यापूर्वी समग्र छंदातील अक्षरे मोजली जात. २३ अक्षरांपर्यंतची वृत्ते सविशेष असतात. पुढे २४ ते ४८ अक्षरांचे सात अतिच्छंद मानले गेले त्यापुढे कृती येते. त्यांचा उल्लेख वाजसनेयी संहितेत आहे.

आठ अक्षरांचा अनुष्टुभ, ११चे त्रिष्टुभ, १२ची जगती अशी वैदिक छंदांची उत्तरोत्तर वाढ झाली आहे. त्रिपदा गायत्री म्हणजे ३ अनुष्टुभ चरणांचा छंद. चतुष्पदी अनुष्टुभ, त्रिष्टुभजगती, पंचपदी पंक्ती असे वेगवेगळे चरणबंध तयार होतात. प्राचीन छंदःशास्त्राने विराम किंवा यती मानलेले नाहीत. पण वैदिक अनुष्टुभ रचनेत दोन समान भाग स्वाभाविकपणे आढळतात त्याला अर्वाचीन भाषेत दुखंडी चरण मानतात. पिंगलाचार्य किंवा पिंगलनाग यांनी रचलेल्या छंद-सूत्रांना छंदशास्त्र म्हणण्याचा प्रघात आहे. पिंगलाच्या सूत्रातील पहिली सूत्रेच वैदिक छंदासंबंधी आहेत व पुढची प्राकृत काव्यकालीन छंदाबद्दलची आहेत. वैदिक छंदःशास्त्राचा प्राचीनतम प्रयत्न सांख्यायन श्रौतसूत्रात आढळतो. ऋग्वेदाच्या छंदोनुक्रमणीत तसेच शुक्ल यजुर्वेदाच्या काही भागात दिसतो.

१०. ज्योतिष

द्युत् = प्रकाशणे या धातूपासून ज्योती शब्द बनला आहे. ज्योती म्हणजे आकाशात प्रकाशित होणारे ग्रहनक्षत्रादी तेजोगोल होत. ज्योतिषशास्त्र हे या संबंधीच्या गणिताचे, वेधाचे आणि कालज्ञानाचे शास्त्र आहे. शुक्ल यजुर्वेदात याला नक्षत्रदर्श व छांदोग्य उपनिषदात नक्षत्रविद्या असे म्हटले आहे. नारदसंहितेत ज्योतिषशास्त्राचा उद्देश सांगितला आहे.

विनैतदखिलं श्रौतस्मार्तं कर्म न सिध्यति ।
तस्माज्जगद्धितायेदं ब्रह्मणा रचितं पुरा ॥

म्हणजे ज्योतिषावाचून श्रौतस्मार्त कर्मेपूर्ण होत नाहीत (कालज्ञानाच्या रूपाने) जगाच्या हितासाठी हे ज्योतिषशास्त्र ब्रह्मदेवाने निर्माण केले. कालज्ञान म्हणजे मुख्यत्वे दिवस, रात्र, मास व वर्ष यांचे ज्ञान. वेदांग ज्योतिषाचा काल शकापूर्वी १५०० वर्षेहा होय. त्या वेळी दिवसाच्या ६० घटिका हे मान प्रचारात होते. सूर्यचंद्राच्या मध्यम गती बऱ्याच सूक्ष्म माहीत झाल्या होत्या. वर्षाचे १२ सौरमास प्रचारात होते. ग्रहस्थिती नक्षत्रांवर सांगितलेली असे.

इ. स. ४७६ मध्ये 'आर्यभटाचा' जन्म झाला त्याचा आर्यसिद्धान्त नावाचा ज्योतिष ग्रंथ सर्वांत प्राचीन मानला जातो.



११. न्याय

षड्दर्शनांपैकी प्रमुख दर्शन. न्यायाचे प्रतिपादन करणे हा न्यायदर्शनाचा विषय आहे.

'प्रमाणैरर्थपरीक्षणं न्याय ।' विविध प्रमाणांच्या साहाय्याने वस्तुतत्त्वाची परीक्षा करणे म्हणजे न्याय होय. (न्यायभाष्य १.१.१)

प्रमाणांचे स्वरूपवर्णन, प्रमाणपरीक्षेचे व्यावहारिक रूप यांच्याविषयी विवेचन केलेले असल्यामुळे त्याला न्यायदर्शन नाव मिळाले.

गौतम, वात्स्यायन, उद्योतकर, वाचस्पती, मिश्र, जयंतभट्ट, भासर्वज्ञ, उदयनाचार्य वगैरे अनेक न्यायदर्शनावर लिहिणारे विद्वान होऊन गेले. निःश्रेयसप्राप्ती हे न्यायशास्त्राचे मुख्य प्रयोजन आहे. न्यायशास्त्राच्या अध्ययनाने पदार्थांचे तत्त्वज्ञान होते व त्यामुळे आत्मसाक्षात्कार होऊन मोक्षप्राप्ती होते असे मानले आहे. ज्या सोळा पदार्थांच्या तत्त्वज्ञानाने मोक्ष मिळतो ते पदार्थ. (१) प्रमाण (२) प्रमेय (३) संशय (४) प्रयोजन (५) दृष्टान्त (६) सिद्धान्त (७) अवयव (८) तर्क (९) निर्णय (१०) वाद (११) जल्प (१२) वितंडा (१३) हेत्वाभास (१४) छल (१५) जाती (१६) निग्रहस्थान.

१२. मीमांसादर्शन

'विचारपूर्वक तत्त्वनिर्णय' असे मीमांसेचे लक्षण केलेले आहे. परस्पर विरोधी वेदमंत्रातला विरोध दूर करून त्यांच्या अर्थाचा निर्णय ठरविणे याचे नाव मीमांसा आहे. धर्म नावाच्या विषयाचे विवेचन करणे हे मीमांसेचे प्रयोजन होय. श्रुतींचे कर्मकांड व ज्ञानकांड असे दोन विभाग आहेत. यज्ञयागाच्या विधींचे व अनुष्ठानाचे वर्णन करणे हा कर्मकांडाचा विषय आहे. याला पूर्वमीमांसा म्हणतात. जीव, जगत्, ईश्वर यांचे रूप व त्यांचा परस्पर संबंध या गोष्टींचे निरूपण करणे हा ज्ञानकांडाचा विषय आहे. यालाच उत्तरमीमांसा म्हणतात. या दोहोत दिसणाऱ्या विरोधांचे निराकरण करणे ह्या मुख्य उद्देशाने ह्या मीमांसादर्शनाची योजना झाली आहे. मीमांसा या शब्दाचा नेमका अर्थ म्हणजे संबंध निश्चिती. एखाद्या शब्दाचा अथवा वाक्याचा अर्थ निश्चित करताना व त्याचा इतर शब्दांशी अथवा वाक्यांशी असणारा संबंध निश्चित करताना जो विचार करावा लागतो व जो तर्कवाद स्वीकारावा लागतो त्याला मीमांसा म्हणायचे.

जैमिनीच्या सूत्रग्रंथात अर्थ लावण्याचे जे नियम दिले आहेत ते नियम इतके सर्वमान्य होऊन बसले आहेत की गौतम, वसिष्ठ, आपस्तम्बासारख्या धर्मशास्त्रावरील प्राचीन शास्त्रकारांनीही या नियमांना आधारभूत मानले आहेत. धर्मशास्त्राचा विस्तारही याच मीमांसान्यायावर झाला आहे. न्यायालयातून जेव्हा शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याची पाळी येते तेव्हाही मीमांसाशास्त्र पद्धतीला प्रमाण मानतात. मुसलमानी अमलात तसेच इंग्रजी राज्याच्या सुरुवातीलासुद्धा धर्मशास्त्रामध्ये निर्णय देण्याचा अधिकार विद्वान ब्राह्मणांना दिला होता.

या मीमांसा नियमांचे महत्त्व आणि सत्यत्व इंग्रजी न्यायाधीशांस व इतर विद्वानांस इतके पटले की आता न्यायालयातून पंडितांची व्यवस्था कमी केली असली तरी शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याकरिता मीमांसा नियमच उपयोगात आणतात. या नियमांची योग्यता आणि महत्त्व कोलब्रुक, थिबो, मॅक्सम्युलर वगैरे विद्वानांनी

तसेच सर जॉन एज, सर टॉमस स्ट्रेंज, मेन वगैरे कायदेपंडितांनी मान्य केले. या शास्त्राचे कित्येक नियम पाश्चिमात्य देशातील सर्वमान्य झालेल्या कायद्याचा अर्थ लावण्याच्या पद्धतीतील नियमांशी तंतोतंत जुळतात. इतकेच नव्हे तर पाश्चिमात्य पद्धतीतील नियमांपेक्षा मीमांसाशास्त्रातील नियमांमध्ये पुष्कळ ठिकाणी अधिक सूक्ष्मतेने व काटेकोरपणे विचार झालेला आढळतो.

कायद्यात उपयोगी पडणारे काही मीमांसा न्याय, उदा.

(१) प्रत्येक वाक्यास, शब्दास काही तरी हेतू, अर्थ असलाच पाहिजे यास सार्थकता न्याय म्हणतात.

(२) जेथे एका नियमाने भागण्यासारखे आहे तेथे एकापेक्षा अधिक नियमांचे अस्तित्व मानणे योग्य नाही यास लाघव न्याय म्हणतात.

(३) एका ठिकाणी असलेल्या शब्दाचा अगर वाक्याचा अर्थ भिन्न भिन्न प्रकारानी करू नये. यास अर्थैकत्व न्याय म्हणतात. वगैरे.

१३. पुराणे

भारतीय साहित्यातील हा महत्त्वाचा ग्रंथसमूह आहे. कोणत्याही धर्मकृत्यांच्या संकल्पात श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थं असे वाक्य असते. पुराणांना पाचवा वेद असेही म्हटले जाते. स्मृति-सूत्रकारांनी श्रौत-स्मार्त धर्माचा अधिकार त्रैवर्णिकांनाच दिला व इतरांना त्यापासून वंचित केले. अशा वंचिताना व उपेक्षितांना उद्धरण्यासाठी पुराणे आली. सर्व वर्णांना, वर्णबाह्यांना किंबहुना सर्व मानवांना पुराणांनी पारमार्थिक समता दिली. भारतीय संस्कृती व सभ्यता यांचा जनसामान्यात प्रचार करण्याचे श्रेय पुराणांना आहे. सदाचार, श्रद्धा, नीती वगैरे तत्त्वांचे शिक्षण पुराणांनी मनोरंजक कथांच्या द्वारे समाजातील आबालवृद्धांना दिले. धर्म, दर्शन, संस्कृती, राजनीती इत्यादी गोष्टीही पुराणांनी सोप्या भाषेत सर्वांना सुगम केल्या. कथाकीर्तने, व्रते, उपवास, देवोत्सव, सणवार इत्यादी रूपांनी सर्व जनतेत धार्मिकता जागृत ठेवली आणि महत्त्वाचे म्हणजे वैदिक परंपरेशी संबंध न सोडता हे सर्व घडवून आणले. भक्तिमार्गाची स्थापना हीसुद्धा पुराणांची श्रेष्ठ कामगिरी आहे. 'पुरा नवं भवति' म्हणजे प्राचीन असूनही जे नवे असते ते पुराण होय. मुख्य पुराणे १८ आहेत. (१) ब्रह्म, (२) पद्म, (३) विष्णू, (४) शिव, (५) भागवत, (६) भविष्य, (७) नारद, (८) मार्कंडेय, (९) अग्नी, (१०) ब्रह्मवैवर्त, (११) लिंग, (१२) वराह, (१३) स्कन्द, (१४) वामन, (१५) कूर्म, (१६) मत्स्य, (१७) गरूड आणि (१८) वायुपुराण ही ती पुराणे होत.

१४. धर्मशास्त्र

धर्म-अधर्म, कर्तव्य-अकर्तव्य यांच्या निर्णयाचे जे शास्त्र ते धर्मशास्त्र होय. ऋग्वेदात यज्ञाला धर्म म्हटले आहे. ब्राह्मणग्रंथात धर्म शब्दाचा अर्थ आश्रमधर्म आहे. नंतरच्या काळात धर्म शब्दाचा अर्थ वर्णाश्रम धर्मानुसार व्यक्तीकडे आलेले किंवा व्यक्तीने अंगीकारलेले कर्म असा आहे. गीतेमध्ये 'स्वधर्मेनिधनं श्रेयः' यामध्ये हाच अर्थ येतो. प्रवृत्तीचा किंवा निवृत्तीचा नित्य किंवा अनित्य साधनांनी जे पुरुषांना उपदेश करते ते शास्त्र होय (नित्य = वेद, अनित्य = स्मृती, सूत्रे, निबंध) वैदिक आर्यांचा धर्म ही आर्यांची जीवनपद्धती आहे. स्वाभाविक किंवा नैसर्गिक प्रवृत्तीचे नियमन करून त्यांना इहपर कल्याणाचा मार्ग दाखविणे या गोष्टीसाठी धर्मशास्त्र आहे.

श्रौत, गृह्य व धर्म ही तीन प्रकारची सूत्रे आहेत. वेदांना श्रुती म्हटले आहे तर स्मृतींना धर्मशास्त्र म्हटले आहे. ''धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।'' असे मनू म्हणतो.

गौतमधर्मसूत्र हे सर्वांत प्राचीन आहे. ते इ. स. पूर्व ६००-८०० या काळात झाले असावे. वसिष्ठ, गौतम, आपस्तंब, बौधायन आणि हिरण्यकेशी अशी पाच धर्मसूत्रे असून बहुतेक धर्मशास्त्रीय विषय त्यात आहेत. या सूत्रांवर आर्ष भाष्ये व वार्तिके आहेत. ही गद्य स्वरूपात असून उपलब्ध स्मृतीत बऱ्याच स्मृती एकमेकांचा निर्देश करतात. महामहोपाध्याय श्री. काणे यांनी संशोधन करून सुमारे १०० स्मृती नोंदल्या आहेत. पण त्या सर्वांत मनुस्मृतीला प्रामाण्य प्राप्त झाले आहे. स्मृतिग्रंथांशिवाय रामायण, महाभारत यांनाही स्मृती अगर धर्मशास्त्र म्हटले जाते.

राजधर्म, आश्रमधर्म, आचारधर्म, आपद्धर्म, उपवास, तीर्थ, दान, दायभाग, विविध पुत्र, प्रायश्चित्त वर्णधर्म, विवाह, श्राद्ध असे अनेक विषय धर्मशास्त्रात चर्चिलेले असतात.

धर्मशास्त्रावरील टीकात्मक निबंध तर असंख्य आहेत. बंगालमध्ये जीमूतवाहनाच्या दायभाग या निबंधाला न्यायालयातही

प्रमाण मानले जाते. वारसाहक्काच्या बाबतीत याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरा ही टीका भारतभर प्रमाण मानली जाते. 'स्मृतिचंद्रिका' या टीकेचा दक्षिण भारतात विशेष प्रचार आहे. महाराष्ट्रात 'धर्मसिंधू' व 'निर्णयसिंधू' या ग्रंथाचा विशेष प्रचार आहे. वेदातील वाक्यांचा अर्थ कसा लावावा हे मीमांसाशास्त्र सांगते. वेदान्तशास्त्राला धर्मशास्त्र मानते. वेदान्ताप्रमाणेच धर्मशास्त्रात तर्काला किंवा न्यायाला स्थान दिले आहे. यम-नियम-प्राणायाम यांचाही धर्मशास्त्राशी संबंध येतो. कित्येक गोष्टी वास्तव नसताना त्या खऱ्या मानून चालण्याची प्रवृत्ती धर्मशास्त्रकारांमध्ये दिसून येते. काल्पनिक सिद्धान्तावर धर्मशास्त्रातील कित्येक मतांची उभारणी झाली आहे. उदा. त्यांचा पहिला सिद्धान्त ''सांप्रत कलियुग चालू आहे'' धर्मशास्त्रकार मानतात की यापूर्वी सत्ययुग किंवा कृतयुग होते. त्या युगात सर्व परिस्थिती आजच्यापेक्षा वेगळी होती आणि हे अगदी प्राचीन मानलेल्या गौतमधर्मसूत्रापासून सर्व धर्मशास्त्रकार सांगत आले आहेत. या कल्पनेमुळे जे जे वचन चालू रूढीला किंवा व्यवहाराला गैरसोयीचे ते कलिवर्ज्य प्रकरणात ढकलण्याची प्रवृत्ती पुराणकारात, धर्मशास्त्रकारात, निबंधकारात निर्माण झाली. ऐतिहासिक दृष्टीने सर्व स्मृतीकार कलियुगातलेच आहेत पण निबंधकारांनी त्यांना कलियुगाच्या पूर्वीचे ठरविले आहे. अनुलोम विवाह, शूद्राने स्वयंपाक केला तरी चालेल अशा काही गोष्टी स्मृतीत सांगितल्या असल्या तरी व्यवहाराच्या विरुद्ध जाऊ लागल्या त्यामुळे या गोष्टी कृतयुगात धर्म्य ठरत असल्या तरी कलियुगात अधर्म्य ठरतात.

वात्स्यायनाच्या कामसूत्रात चौसष्ट कलांची यादी खालीलप्रमाणे आहे

१. गीतम्

गायन, वादन व नृत्य या कला भारतात वैदिक काळापासून होत्या. ऋग्वेदातील ऋचा एका विशिष्ट पद्धतीने गात त्याला छंदोगान म्हणत. उदात्त, अनुदात्त व स्वरित या तीन स्वरात छंदोगान होई. सामगायनात ऋचा सप्त स्वरात गायल्या जाऊ लागल्या व संगीतातील स्वरमंडल तयार झाले. यज्ञप्रक्रियेत वीणावादन व गायन ह्या दोन्ही गोष्टींना महत्त्व होते. संगीत कलेचे माहात्म्य वैदिक वाङ्मयात व पुराणांत अनेक ठिकाणी वर्णिले आहे. संगीत चिंतामणी ग्रंथात ''त्वरेने शोक नष्ट करणारी विद्या'' असे संगीताचे वर्णन येते. धर्मसूत्रात व स्मृतिग्रंथात हलक्या प्रतीच्या गायन व नृत्यावर, उदरभरणासाठी कलेचा वापर करणाऱ्या धंदेवाईक कलावंता विरूद्ध आक्षेप घेतले आहेत परंतु धार्मिक व्रते, उत्सव, यज्ञविधी यांमध्ये गायनाचे महत्त्व त्यांना मान्य होते. कोणत्याही उत्सवाची सांगता नृत्य, गायन आणि वादन यांशिवाय होत नव्हती. गायकाचे उत्तम, मध्यम व अधम असे तीन भेद आहेत. रागाचा आरंभ, विस्तार व शेवट करण्याचे ज्ञान, विविध राग व त्यांची अंगे यांचे ज्ञान, देशी रागांचे रूपभेदज्ञान, तालाचे ज्ञान, संप्रदायशुद्ध गाण्याची पद्धती, श्रम करण्याची तयारी, दोषरहित गाणे वगैरे गुण उत्तम गायकाचे मानले जातात. जो गायनातले दोष वगळतो पण ज्याच्या अंगी गुण कमी आहेत तो मध्यम व सदोष गातो तो अधम गायक समजला जातो. याशिवाय गायकांचे आणखी पाच प्रकार मानले जातात.

शिक्षाकार - गाण्याचे यथायोग्य शिक्षण देऊ शकणारा गायक.

अनुकार - दुसऱ्या गायकाचे सहीसही अनुकरण करणारा गायक.

रसिक - गाताना जो स्वतः गाण्याचा रसास्वाद घेतो, तो गायक.

रंजक - जो आपल्या सुश्राव्य गायनाने लोकांचे रंजन करतो.

भावुक - जो भावपूर्ण गायन करतो.

गायकाचे एकल, यमल व वृंदगायक असेही तीन प्रकार आहेत. एकल म्हणजे एकटाच गाणारा, यमल म्हणजे दुसऱ्या गायकाच्या जोडीने गाणारा आणि वृंदगायक म्हणजे समूहाबरोबर गाणारा होय. गायिकेच्या बाबतीत रूप, यौवन, कंठमाधुर्य आणि चातुर्य या गोष्टी विशेष सांगितल्या आहेत.

२. वाद्यम्

नृत्यगायनाला साथ व ताल देण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे वाद्य होय. शंकराला वाद्याचा जनक समजतात. त्याचा डमरू हेच पहिले वाद्य होय असे मानतात. दक्षयज्ञाचा विध्वंस केल्यानंतर शंकर तांडव नृत्य करू लागला तेव्हा त्याने नारद तुंबरू व नंदी यांना वाद्ये निर्माण करण्याची प्रेरणा दिली आणि त्यांनी विविध वाद्ये निर्माण केली अशी आख्यायिका आहे.

वाद्यांचे तत, अवनद्ध, सुषिर व घन असे चार प्रकार आहेत. वीणा, सारंगी अशी तंतुवाद्ये म्हणजे तत वाद्ये. डमरू, मृदुंग, नगारा, दुदुंभी इत्यादी चर्मवाद्यांना अवनद्ध वाद्ये म्हणतात. तोंडाने हवा फुंकून वाजवली जाणारी बासरी, सनई वगैरे वाद्यांना सुषिर वाद्ये म्हणतात. आणि ज्यात लाकडाचे किंवा धातूचे तुकडे एकमेकांवर आपटून ध्वनी निर्माण करतात अशा चिपळ्या, टाळ, झांज, घंटा या वाद्यांचा समावेश घन वाद्यात होतो. वैदिक काळात वीणा हे वाद्य माहीत होते. सामगायनाच्या वेळी वीणा वाजवीत तसेच शंख हे प्रमुख सुषिर वाद्य होते. भेरी, शंख, दुदुंभी या वाद्यांचा उपयोग रणांगणात तसेच सामाजिक समारंभातूनही केला जाई. सर्व जगातील संगीतात अवनद्ध वाद्यांचा उपयोग अधिक केलेला आढळतो. वाद्यांचा निनाद म्हणजे आनंदाचा आविष्कार असतो. त्यावाचून कोणताही धार्मिक विधी किंवा उत्सव पार पडत नाहीत. उत्सव, जत्रा, यात्रा या प्रसंगी तसेच पूजाअर्चेतही गायन, वादन, नर्तन हे राजोपचार चालतात. सर्व देवळात हा उपक्रम चालू असतो. पहाटे चौघडा, पूजेच्या वेळी सनई ही प्रमुख वाद्ये असतात. प्रत्येक भक्त देवळात घंटानाद करतो. देवपूजेतही घंटानाद असतो. लग्नासारख्या शुभकार्यात चौघडा, सनई ही मंगल वाद्ये असतात. निरनिराळ्या मिरवणुकीत ढोल, चौघडा, लेझिम, शिंग, तुतारी यांचा वापर होतो. भजन-कीर्तनातही चिपळ्या, टाळ, मृदुंग, झांज यांचा उपयोग होतो. वेगवेगळी वाद्ये वाजविण्याची कला मोठ्या परिश्रमाने कलाकाराला अवगत होते.



३. नृत्यम्

अभिनयदर्पणात 'रसभावव्ञ्जकादियुतं नृत्यमितर्यिते ।' अशी नृत्याची व्याख्या आहे. ताल, अभिनय आणि लालित्य या तिन्ही कलांचा मनोहर संगम म्हणजे नृत्य होय. विविध प्रकारचे पदन्यास, हस्तमुद्रा, अंगविक्षेप, नेत्रविक्षेप, भ्रूविक्षेप आणि अभिनय यांच्या द्वारे नृत्यात रस आणि भाव यांची अभिव्यक्ती करतात. नृत्य हे एखाद्या विषयावर, संकेतावर किंवा कथानकावर आधारित असते. कथानक कोणत्याही शब्दांचा अवलंब न करता अभिनयाच्या द्वारे प्रेक्षकांच्या अंतःकरणापर्यंत पोचवायचे असते. नऊ रसांचा आविष्कार नृत्यामार्फत होते. पुरुषाने केलेले नृत्य तांडव व लास्य (स्त्रीने केलेले नृत्य) असे नृत्य भेद आहेत. ब्रह्मदेवाने भरताला नाट्यवेद शिकवला. त्या वेदाला अनुसरून भरताने एक नाट्यप्रयोग बसवला व तो कैलासावर शंकराच्या समोर करून दाखवला. 'त्रिपुरासुराचा शंकराने केलेला संहार' हा नाटकाचा विषय होता. शंकर प्रसन्न झाला पण त्याने सांगितले की याला नृत्याची जोड हवी. भरत ते करू शकत नव्हता कारण त्याला नृत्यकला अवगत नव्हती तेव्हा शंकराने आपला शिष्य तंडु किंवा नंदिकेश्वर याला आज्ञा केली की भरताला तू नृत्य शिकव. तंडूने भरताला नृत्य शिकविले. त्यास तांडव असे नाव पडले. शिवाचे तेवढ्याने समाधान होईना म्हणून त्याने पार्वतीला प्रेरणा दिली. पार्वतीला लास्य नामक सुकुमार नृत्यकला अवगत होती. तिने ती भरताला शिकविली. अशा प्रकारे भरत तांडव व लास्य दोन्ही प्रकारच्या नृत्यात तरबेज झाला व हे दोन्ही नृत्यप्रकार परंपरेने भारतात प्रसार पावले. नृत्यकला भारतात केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर ईश्वरोपासनेचे अंग म्हणून मंदिरात तिला जागा मिळाली. त्याचबरोबर पुत्रोत्सव, देवोत्सव, देवाची नित्यपूजा, पालखीचा सोहळा, नैमित्तिक सण, व्रतवैकल्ये, यज्ञसंस्था, राजदरबार इत्यादी अनेक ठिकाणी नृत्याला स्थान मिळाले. देवदासी संस्था निर्माण झाली. नृत्यावरचा सर्वांत प्राचीन ग्रंथ म्हणजे नटसूत्र त्यानंतर नंदिकेश्वराचा भरतार्णव हा ग्रंथ येतो. अभिनयदर्पण ही त्याचीच संक्षिप्त आवृत्ती आहे. भरताचे नाट्यशास्त्र, अग्निपुराण, विष्णुधर्मोत्तर पुराण, संगीत रत्नाकर वगैरे ग्रंथात नृत्याची

सांगोपांग चर्चा केली आहे. तमीळ भाषेतील 'शिलाप्पधिकारम्' महाकाव्य नृत्यावर भाष्य करते. या कलेला खूप राजाश्रय मिळाला. भारतात कथक, कथकली, भरतनाट्यम्, कुचिपुडी आणि मणिपुरी हे शास्त्रीय नृत्यसंप्रदाय प्रचलित आहेत. भारतीय लोकनृत्ये लोकांत परंपरेने आलेले असतात. लोकांची करमणूक करणे हा भाग असून लोकनृत्यातला भावनाविष्कार नैसर्गिक असतो. लोकनृत्यांना जातीय व राष्ट्रीय असे संदर्भ असतात. लोकनृत्यात एखाद्या विशिष्ट जमातीचा, ती ज्या प्रदेशात वास्तव्य करते त्या प्रदेशातही स्वभाव, संस्कृती, वातावरण, सामाजिक दर्जा, श्रद्धा यांचे प्रतिबिंब असते. लोकनृत्यात लढाऊ, शौर्यपूर्ण नृत्ये असतात. उदा. शिकारीची नृत्ये, काठी नृत्य, सामाजिक नृत्ये, पेरणीच्या-कापणीच्या वेळेची नृत्ये, गौरीगणपती, दसरा-होळी वगैरे सणांच्या वेळची नृत्ये इथे येतात. धार्मिक नृत्ये - रथापुढे पालखीपुढे केली जाणारी नृत्ये, ग्रामदेवतेच्या समोर केली जाणारी नृत्ये, घालो, कीर्तन, नौटंकी इत्यादी नृत्ये, या सदरात मोडतात.

नृत्याला अनेक प्राचीन व अर्वाचीन राजांनी आश्रय व प्रोत्साहन दिले. काही स्वतः नृत्यनिपुण होते. राजराजा चोळ याने तंजाऊरमध्ये कल्याणी नावाच्या नर्तिकेसाठी बृहदिश्वराचे मंदिर बांधले. आंध्रमधल्या काकतीय राजाच्या दरबारातील जयसेनाने नृत्यरत्नावली ग्रंथ लिहिला. वरंगळच्या प्रतापरूद्राने यक्षगानाला आश्रय दिला. विजयनगराचा सम्राट कृष्णदेवराय याने केवळ नृत्यासाठी रंगमंदिर बांधले होते.



स्वातीतिरूनल राजाने संगीताबरोबरच नृत्यावरही ग्रंथ लिहिला.

उत्तरेतला संत हरिदास हा कथक नृत्याचा जनक. शंकरदेव आसाममधले श्रेष्ठ संत समजतात. त्यांनी अंकियानट नृत्याला जन्म दिला. आजही वेगवेगळ्या नृत्यप्रकारात अत्यंत प्रवीण अशा बालसरस्वती, रुक्मीणीदेवी, यामिनी कृष्णमूर्ती, सोनल मानसिंग, बिरजू महाराज, गुरू केलुचरण व त्यांच्या अनेक शिष्यांनी वेगवेगळ्या नृत्यपरंपरा देशोदेशी नेल्या व त्यात नवनवीन प्रयोग केले. उदय शंकर, रामगोपाल वर्मा, रवींद्रनाथ ठाकूर यांनी नृत्यांना वेगवेगळी परिमाणे दिली व पाश्चात्य व पौर्वात्य नृत्यप्रकारांचा उत्तम प्रकारे संगम घडवून आणला.

४. आलेख्यम्

याचा अर्थ लिहिणे किंवा चित्रे रंगविणे असा होतो. चित्रकला ही चौसष्ट कलांमधली एक प्रमुख कला आहे. विष्णुधर्मोत्तरपुराणात मार्कंडेय मुनी म्हणतात, ''कलानां प्रवरं चित्रं धर्मार्थकाममोक्षदं। मांगल्यं प्रथमं चैतद् गृहे यत्र प्रतिष्ठितम्॥''

सर्व कलात चित्रकला श्रेष्ठ असून ती धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ देणारी आहे. ज्या घरात चित्रकला विद्यमान असते त्या घरात मांगल्याचीच प्रतिष्ठापना होते. एका ठरवून घेतलेल्या चौकटीत रेषा, आकार, वर्ण या तिघांची केलेली सुसंवादी रचना म्हणजे चित्र. निसर्गाच्या रंग रूपांशी, मिळतीजुळती रंगीत रचना असे सामान्यतः समजले जाते. चित्रातले सौंदर्य हे रंग, रेषा, आकार, छटा, जिवंतपणा, पोत आणि अभिव्यक्तीतले कौशल्य या सर्वांवर अवलंबून असते. म्हणजेच चित्राचे सौंदर्य विषयावर अवलंबून नसून चित्रकाराच्या अभिव्यक्तीच्या सामर्थ्यात आहे. अगदी आदिमानवाने काढलेली चित्रे मध्यप्रदेशातील भीमबेटका येथे गुहाचित्रे म्हणून प्रसिद्ध आहेत. निसर्गातूनच मानवाला चित्रकलेची प्रेरणा मिळाली. मग मातीच्या भांड्यावर सजावट करणे, शिकारीची हत्यारे नक्षीदार करणे अशी चित्रकलेची व्याप्ती वाढत गेली. प्राचीन काळी चित्रकलेचे नियम व सिद्धान्त सांगणारे ग्रंथ कोणते होते हे सांगणे कठीण आहे. ते काळाच्या ओघात नष्ट झाले असावेत पण पुराणे, महाकाव्ये, संस्कृत वाङ्मय, नाटके यात चित्रकलेसंबंधीचे उल्लेख व तपशील आढळतात. वात्स्यायनाचे कामसूत्र, विष्णुधर्मोत्तर पुराण, अभिलाषितार्थचिंतामणी या ग्रंथातल्या काही अध्यायात चित्रकलेचे तत्त्व, प्रकार व गौरव याविषयी माहिती येते.



वात्स्यायन म्हणतो ''जो निद्रित माणसाच्या मुखावर चैतन्य दाखवितो, मृताच्या मुखावर चैतन्याचा अभाव दाखवितो, सपाट पार्श्वभूमीवर उंचसखल विभाग दाखवतो त्याला चित्रकार म्हणावे. (१) रूपभेद म्हणजेच निसर्गातील नाना आकृतींचा अभ्यास, (२) प्रमाण - शरीररचना, वस्तूची दूर-निकट अवस्था, आकृतीची प्रमाणबद्धता वगैरेचा अभ्यास, (३) भाव - मेंदू व अंतःकरण यांचे शरीरावर होणारे प्रभाव, त्यांचे अध्ययन, विश्लेषण व स्पष्टीकरण करून चित्र निर्माण झाले पाहिजे. म्हणजेच चित्रांमध्ये भावाला प्राधान्य हवे, (४) लावण्ययोजना - बाह्यसौंदर्य. चित्रात, आंतरिक सौंदर्याच्या

अभिव्यक्तीबरोबरच बाह्यसौंदर्यही असणे आवश्यक आहे, (५) सादृश्य - वस्तू व तिचे चित्र यात समानता असणे आवश्यक आहे, (६) वर्णिकाभंग - कुंचला व रंग यांचा यथायोग्य उपयोग करणे ही चित्रकलेची सहा अंगे मानली आहेत. सोमेश्वर तीन प्रकारचे कुंचले सांगतो. मोठ्या कुंचल्याने लेपनकार्य करावे. मधल्या कुंचल्याने चित्रांकन करावे आणि सूक्ष्म कुंचल्याने सूक्ष्म रेखा काढाव्या. कोणत्याही चित्राचा आकार प्रमाणबद्ध असावा. श्वेतरंगासाठी शंखांचे चूर्ण, तांबूस रंगासाठी हिंगूळ, रक्तवर्णासाठी अळिता, भगव्या रंगासाठी गेरू, पिवळ्या रंगासाठी हरताळ व काळ्या रंगासाठी काजळ वापरावे असे सोमेश्वर म्हणतो.

चित्राचे प्रकार :

१) विद्धचित्र - आरशात पडलेल्या प्रतिबिंबाप्रमाणे हुबेहुब चित्र काढणे.

२) अविद्ध चित्र - चित्रकाराच्या कल्पनेतून अभिव्यक्त होतात.

३) रसचित्र - भिन्न भिन्न रसांच्या अभिव्यक्तीसाठी बनविली जाणारी चित्रे, उदा. नायिकाभेदाची चित्रे, रागरागिण्यांची चित्रे.

४) धूलिचित्र - रांगोळींचे विविध प्रकार.

पूर्वी राजप्रासाद मोठे वाडे यात चित्रशाला असत. अजिंठ्यातली भित्तिचित्रे तर बौद्धधर्माच्या काळातील चित्रकलेचा कळस मानावी लागतील आजही त्यांचे भाव, रंग, वस्त्रप्रावरणे, दागिने खरे वाटतात. सिंधुसंस्कृतीत मोहेंजोदडो, हडाप्पा येथे लोक भांड्यावर पशुपक्ष्यांची चित्रे काढत असे दिसते. ताडपत्रे, पोथ्या वगैरेवर चित्रकला विकसत झालेली दिसते. इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांची यशादर्शन घडविणारी चित्रपद्धती स्वीकारली. पाश्यात्त्य चित्रशैलीला अनुसरून चित्रे काढणाऱ्या चित्रकारात राजा रविवर्मा प्रमुख होता. आधुनिक भारतीय चित्रकलेत क्रांती केली ती रवींद्रनाथ ठाकूर, अमृता शेरगील, गगनेंद्रनाथ ठाकूर, यामिनी राय या कलावंतानी.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशात जी चित्रकला अवतीर्ण झाली तिची वैशिष्ट्ये म्हणजे विसाव्या शतकाच्या प्रारंभी फ्रेंच चित्रकलेकडून भारतीय चित्रकलेला प्रेरणा मिळाली. पुन्हा चमकदार भडक रंगाना प्राधान्य मिळू लागले. रंगयोजनेला प्राधान्य मिळून रेषेला गौणत्व मिळू लागले. चित्रकारांचे कित्येक वर्ग कलकत्ता, मुंबई, दिल्ली या नगरात काम करताना दिसतात. हे कलाकार आजच्या वैज्ञानिक प्रगतीकडे जागरूकपणे पाहतात. परंपरावादाचे विरोधक असून ते मानवतेचे उपासक आहेत.

५. विशेषकच्छेद्य

कुंकुमादी द्रव्यांनी कपाळावर तिलक लावणे असा याचा अर्थ आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत तिलकाला फार महत्त्व आहे. पूजा-अर्चा, संस्कार, मंगलकार्येया प्रसंगी यजमानाच्या कपाळावर कुंकवाचा तिलक लावून त्यावर अक्षता चिकटवितात. पूजेच्या वेळी देवाला चंदनाचा, केशराचा किंवा कुंकवाचा तिलक लावतात. पूर्वी गोरोचन, हरताळ, मनशीळ या द्रव्यांचा तिलक लावण्याची पद्धत होती. सौंदर्यासाठी पांढऱ्या अभ्रकाचा चुरा करून तो डिंकाने किंवा मेणाने कपाळावर लावत. शैव, वैष्णव संप्रदायातील लोक संप्रदाय चिन्ह म्हणून विशिष्ट प्रकारचे तिलक लावतात. हे तिलक कस्तुरी, कुंकुम, चंदन, गंगेतील माती, तुळशीच्या मुळातील माती, साधूंचे चरणरज, गोपीचंदन, तुलसीकाष्ठ, गोरोचन, वारूळाची माती इत्यादी द्रव्यांचे असतात. कपाळावर गोळ टिळा, उभी रेषा अगर आडवी रेषा त्याचबरोबर तीन आडव्या रेषा कपाळावर अगदी केसापासून सुरुवात करून नाकाच्या शेंड्यापर्यंत उभ्या रेषा काढणे. तसेच चेहरा, मान, गाल, हात व पाय जे उघडे राहतात त्यांच्यावर वेगवेगळी नक्षी रंगविणे ही एक कला होती. सुपारीची, विड्याची पाने यांच्यापासून कापून तयार केलेल्या वेगवेगळ्या नक्षीही कपाळावर, गालावर चिकटवत.

कुंचल्याने (पत्रांगुली) नक्षी रंगवली जाई. अशा प्रकारे गालावर व कपाळावर नक्षी काढण्याची प्रथा आजही मथुरेत लग्नाच्या वेळी आहे. पद्मपुराणात सांगितले आहे काळा रंग शांती देतो. लाल रंगाने दुसऱ्याचे नियंत्रण होते. पिवळ्या रंगाने समृद्धी येते आणि पांढऱ्या रंगाने मोक्ष मिळते. ब्रह्माण्डपुराणात सांगितले आहे की तिलक लावण्यासाठी निरनिराळ्या बोटांचा प्रयोग हा निरनिराळी फळे देते. तिलक लावण्यासाठी अंगठा वापरला असता शक्ती मिळते. मधले बोट दीर्घायुष्य देते. अनामिका अन्न देते. तर्जनी मुक्ती देते. तिलक लावताना नखांचा स्पर्श होता कामा नये. 'आन्हिक सुत्रावली' मध्ये सांगितले आहे की ऋषीमुनींना व देवांना गंध लावण्यासाठी अनामिकेचा उपयोग करावा. पितरांना गंध लावण्यासाठी तर्जनी वापरावी व स्वतःसाठी मधल्या बोटांचा उपयोग करावा. तिलक किती मोठा असावा यासंबंधीही मोजमापे आहे. स्मृतिचंद्रिकेत उत्तम मध्यम व अधम असे तीन प्रकारचे तिलक सांगितले आहेत. उत्तम तिलक हा दहा दशांगुळे, मध्यम नऊ अंगुळे तर अधम हा आठ अंगुळे असतो. अंगुळे म्हणजे बोटाचे पेर ज्या जाडीचे असते ते माप होय. किंवा ८ बार्लीचे दाणे होत.

ऊर्ध्वपुंड्र सरळ, सौम्य करगंळीप्रमाणे शोभनीय असावा. नाकाच्या मुळापासून सुरुवात करून केसांच्या मुळांपर्यंत आखावा. सर्वांत शीर हे शरीरात प्रधान त्यामुळे तिलक कपाळावर रेखला जातो.

६. तण्डुलकुसुमवलिविकार

तांदूळ व फुले यांच्या तऱ्हेतऱ्हेच्या आकृती काढणे, जमिनीवर रांगोळ्या काढणे या प्रकारात मोडते. कुठल्याही धार्मिक व मांगलिक कृत्यात रांगोळी आवश्यक व प्राथमिक गोष्ट आहे. वात्स्यायनाच्या काळात (इ.स. तिसरे शतक) धान्यांचा उपयोग करून रांगोळ्या काढत. सरस्वतीच्या मंदिरात, तसेच कामदेव, शिवलिंग यांच्या पूजेसाठी विविधरंगी फुलांनीही आकृतिबंधात्मक रांगोळी काढत. सातव्या शतकातील वरांगचरितात पंचरंगी चूर्णे, धान्ये व फुले यांनी रांगोळीचे निरनिराळे आकृतिबंध तयार करीत असे सांगितले आहे. उत्सवप्रसंगी घरापुढे रांगोळी काढण्याचा उल्लेख १०व्या शतकातील नलचंपूत येतो. ११व्या शतकातील 'गद्यचिंतामणी'त भोजन समारंभाच्या वेळी मंगलचूर्ण रेखा काढीत असा रांगोळीचा उल्लेख आहे. 'देशीनाममाला' या ग्रंथात (११-१२ शतक) तांदळाच्या पिठाने रांगोळी काढण्याचा उल्लेखआहे. धूलिचित्र किंवा क्षणिक चित्र म्हणूनही रांगोळीचा उल्लेख झाला आहे. या सर्व संदर्भावरून ही कला सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रचलित आहे. हिंदू, जैन, पारशी या धर्मात रांगोळी ही अशुभनिवारक व शुभप्रद मानली आहे. रांगोळीचे रहस्य विशद करताना श्री. आनंदघनराम म्हणतात, ''जमिनीवर केरसुणी फिरवताना किंवा सारवताना जमिनीवर सूक्ष्म रेषा निर्माण होतात. त्यात एक प्रकारचे कंपन असते. या रेखा अनियमित असल्याने कंपही अनियमित असून शरीराला, डोळ्यांना व मनाला हानिकारक असते. हे अनिष्ट कंपन टाळण्यासाठी सारवलेल्या जमिनीवर कोन आणि शुभचिन्हे व्यवस्थित रूपाने रांगोळीच्या माध्यमाने काढली की झाडल्याचे, सारवल्याचे अशुभ परिणाम दूर होतात.

सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे दोन उद्देश आहेत. रांगोळीत ज्या आकृत्या काढतात त्या प्रतीकात्मक असतात. उदा. त्रिदल हे त्रिभुवन, तीन देव, तीन अवस्था त्रिकाल यांचे प्रतीक आहे. स्वस्तिक, चंद्र,

सूर्य काढून विश्वतत्त्व निर्माण करतात. साखळी नागयुग्माचे प्रतीक आहे. कमळ लक्ष्मीचे व प्रजनन शक्तीचे प्रतीक आहे.

रांगोळीचे आकृतिप्रधान व वल्लरीप्रधान असे दोन मुख्य भेद आहेत. आकृतिप्रधान रांगोळी राजस्थान, महाराष्ट्र, दक्षिण भारत व उत्तर प्रदेशात आढळतात. तिच्यात रेखा, कोन, वर्तुळेही प्रमाणबद्ध असतात. वल्लरीप्रधान रांगोळी भारताच्या पूर्व भागात आढळते. तिच्यात फुलपत्री, वृक्षवल्ली, पशुपक्षी यांना प्राधान्य असते. अशा रांगोळ्या काढण्यात बंगाली स्त्रिया सिद्धहस्त आहेत. संस्कृतमध्ये तिला रंगवल्ली म्हणतात. बंगालमध्ये अल्पना, राजस्थानमधील मांडणे, मध्यप्रदेशातील चौकपूरना, गुजरातमधील साथिया, आंध्रातील मुग्गू, तामिळनाडूमधील कोलम, कर्नाटकातील रंगोली व केरळातील पूविडल हे सगळे रांगोळीचेच प्रकार आहेत. वृंदावनातील मंदिरातून ते सांझी या नावाने ओळखले जातात.

रांगोळी मुख्यत्वे स्त्रियाच काढतात व ती काढण्यासाठी कुठल्याही उपकरणांची गरज नसते. त्यांची बोटेच मुक्तपणे फिरून विविध आकृत्या निर्माण होतात. जमीन सारवल्यावर रांगोळी न घालणे अशुभ मानतात.

७. पुष्पास्तरणं

पुष्प-आस्तरण म्हणजे शय्येवर फुले विखुरणे, तीही एक कला मानली आहे. मानवाचा फुलांशी संबंध अतिप्राचीन काळापासून आलेला आहे. स्त्रियांचा व फुलांचा संबंध तर अनादी काळापासून आहे. सौंदर्याच्या दृष्टीने फलांचे आणि फुलांच्या हारांचे महत्त्व वैदिक काळापासून होते. सीतेला अर्जुन, तिलक, कर्णिकार वृक्षांची फुले प्रिय होती. स्त्रियांप्रमाणे पुरुषांनाही फुलांची आणि हारांची आवड असे. रामायणात रात्रीही फुलांच्या माळा गळ्यात घालून झोपायची पद्धत दिसते. दक्षिण भारतात सुगंधी पुष्पाचे मुकुट धारण करतात. अभिनंदनीय व्यक्तींवर प्राचीन भारतात पुष्पवृष्टी करण्याची पद्धत होती. लग्नाच्या वेळी वधुवरांना फुलांचा साज चढविण्याचे तसेच समागमाच्या पहिल्या रात्री वधुवरांची शय्या फुलांनी सुशोभित करण्याची हौशी लोकांची पद्धत आहे. फुलांचा सुगंध मैथुन भावना वृद्धिंगत करत असावा. कामदेवही पुष्पशरांनीच प्रेमिकांना विद्ध करतो असे म्हणतात. फुलांचा ताजेपणा, सौंदर्य, सुवास एक पावित्र्यही निर्माण करतो आणि आपले संस्कार पावित्र्याला राखून कर्तव्यभावनेने केले जातात. निरनिराळ्या प्रकारच्या शय्यांमध्ये सोमेश्वराने कुसुमशय्येचा उल्लेख केला आहे. मोगरा, चाफा यांच्यासारख्या सुवासिक फुलांच्या पाकळ्यांनी शय्या तयार करणे ही शय्या रतिक्रीडेसाठी सोयिस्कर मानली जाई.



८. दशनवसनाङ्गराग

राग - रग्ज - रज्जति, रंगविणे, सुवासित करणे. निरनिराळ्या रंगांनी दात, वस्त्रे, शरीराची विविध अंगे रंगविणे, तसेच सुवासित करणे असाही होतो. सौंदर्यप्रसाधन ही कल्पना सुसंस्कृत समाजातच मूळ धरते. ज्ञानांच्या विविध शाखात, दैनंदिन राहणीत मानव जिथे प्रगत असतो, कला आणि संस्कृती जिथे वृत्तीत रुजलेली असते तिथेच सौंदर्यप्रसाधनाच्या शाखांचाही विकास होतो. सौंदर्यप्रसाधनामध्ये रूपाचे प्रसाधन, वेषभूषा, केशभूषा, अलंकार, सुगंधी द्रव्यांची निर्मिती व त्यांचा वापर या साऱ्यांचा विचार येतो. स्त्री-पुरुषांनी परस्परांना एकमेकांकडे आकर्षून घेण्यासाठीच सर्व देशात, सर्वकाळी सौंदर्यप्रसाधनांचा उपयोग केलेला आढळेल.

कामसूत्रात केसांना देण्याच्या व नखांना लावण्याच्या रंगाचा अंतर्भाव आहे. स्त्रिया ओठांना लाल रंग लावीत हा बहुधा लाखेपासून बनवलेला असावा व रंग पक्का बसण्यासाठी त्यावर मेण लावले जाई. नखांना आकार देणे व ती रंगविणे, दातांना काळी मिसरी लावून ते काळे करणे हे प्रकारही रूढ होते. मेंदीने हातांच्या तळव्यांवर अनेक प्रकारची नक्षी, पानेफुले, वेगवेगळ्या आकृती काढत. पायांच्या तळव्यांना लाखेपासून बनविलेला रस किंवा अळिता लावत. डोळ्यात अंजन घालत. सुईने वनस्पतींचा रस शरीरात टोचून देवतांच्या आकृती, किंवा काही चिन्हे शरीरावर कायमची कोरणे याला गोंदण म्हणतात. गोंदण करणारे फिरस्ते कारागीर असतात. जगात जवळजवळ सर्वत्र वन्य जमातीत भुताखेतांपासून स्वतःचे रक्षण व्हावे म्हणून कपाळावर, हातावर व अन्य अवयवांवर सांकेतिक चिन्हे काढण्याचा प्रघात होता. त्यातूनच गोंदण्याची पद्धत सुरू झाली असावी. भारतात कपाळावर त्रिकोणाकृती चंद्र, आडवा, छातीवर मोर अथवा मत्स्य, इत्यादी ठरावीक अवयवांवर ठरावीक आकृत्या गोंदल्या जातात त्यात राममंत्र, ओंकार, हनुमानाचे चित्र, तुळशी वृंदावन, महादेवाची पिंड, शंखचक्रादी चिन्हे काढण्याची पद्धत आहे.

भारतीयांना सुगंधाचे फार वेड होते. सुगंध, सुवास त्यांच्या जीवनाचे आवश्यक अंग होते. प्राचीन काळी कस्तुरी, ऊद, केशर, इत्यादी सुगंधी द्रव्ये दुधाच्या सायीत मिसळून शरीराला लावायची उबटणे तयार करीत, चंदनाचा लेप सर्व उटण्यांहून अधिक वापरात होता. गोरोचनही वापरण्याची पद्धत होती. ह्या लेपनाने त्वचा स्निग्ध, कोमल, कांतिमान व सुवासिक होत असे. आंघोळ हाही सौंदर्यप्रसाधनाचाच एक भाग असे. पूर्वीच्या काळी स्थगरा नावाचे विशिष्ट चूर्ण वापरीत, साबणाप्रमाणे फेसाळणारा फेनक वापरला जाई. देवमंदिरापासून शयनगृहातील शय्येपर्यंत सुगंधाचा सर्रास वापर केला जाई. कपडे धूप घालून सुकवून सुगंधित करत. न्हायलेले ओले केसही धुपावर सुकवून सुगंधित करत.

वस्त्रांवर पानाफुलांची वेलबुट्टी काढणे हीही एक कला होती. वस्त्रे रंगविणे आणि त्यावर निरनिराळी नक्षी काढणे हे भारतात प्राचीन काळापासून होते. राजस्थानमधली बांधणी, आंध्र, गुजरात, ओरिसा प्रांतातील इकत, पंजाबची फुलकारी, दक्षिणेकडची कलमकारी, प्राचीन काळापासून वस्त्रप्रावरणे सुशोभित करण्याच्या विविध कला पिढ्यानपिढ्या जोपासल्या आहेत.



९. मणिभूमिका कर्म

चौकोन-त्रिकोण इत्यादी आकृतींनी जमिनीवर रत्नांची, मण्यांची रचना करणे. वात्स्यायनाच्या कामसूत्रावरील जयमंगला टीकेत याचा अर्थ ग्रीष्म ऋतूत खास झोपण्यासाठी, मद्यपानादी विलासांसाठी म्हणून हिरव्या, लाल इत्यादी निरनिराळ्या रंगाची किमती रत्ने किंवा विविधरंगी दगड जडवून तयार केली गेलेली जमीन असा दिला आहे. मेघदूतातील उत्तरमेघात यक्षाच्या अलकापुरीतील घरांचे वर्णन ''मणिमयभुवः'' म्हणजे रत्नजडित अंगणे असणारी असा होतो.

भारतीय संस्कृती कोशानुसार याचा अर्थ ऋतुमानाप्रमाणे घर शृंगारणे असा आहे. आजही नागपूरसारख्या भागात जिथे कडक उन्हाळा असतो तिथे वाळ्याचे पडदे लावतात किंवा कोकणात अंगणे शेणाने सारवतात किंवा पावसाळ्याच्या अगोदर कौलांची शाकरणी केली जाते. हे ऋतूमानाप्रमाणे घर शृंगारणेच म्हटले जाईल.



१०. शयनरचनं

शयनरचनं म्हणजे नानातऱ्हेच्या बिछायती घालणे.

प्राचीन मानव भूमीवरच झोपत होता. मानवाने आपल्या राहणीत सुधारणा केल्यावर झोपण्यासाठी बिछाना, पलंग वापरात येऊ लागला. ऋग्वेदात 'तल्प' हा शब्द मंचक अथवा बिछाना या अर्थाने वापरला आहे. अथर्ववेदात नवारीला वर्ध्र तसेच 'नड्वला' म्हणजे वेताचा बिछाना हा उल्लेख आहे. उशीसाठी उपबर्हण, उपधान, उच्छीर्षक असे शब्द योजले आहेत. रामायणातील सुंदरकांडात हनुमानाने पाहिलेल्या रावणाच्या शय्यागाराचे वर्णन येते. तेथे सुवर्णजडित पलंग असून त्यावर रत्नखचित आस्तरणे होती. बौद्ध साहित्यात पलंगावर रेशमी पलंगपोस घालत, काही वेळा कदलीमृगाच्या कातड्याचे आस्तरण घालीत. पलंगावर प्रथम ताडपत्रांची चटई अंथरून तिच्यावर गादी पसरीत. पोतकी नावाच्या गवतापासून मिळणारा कापूस, अगर पक्ष्यांची पिसे भरून गादी तयार करीत. गादीवर लोकरी चादर घालीत त्यावर पानेफुले काढलेली असत. लोकर, कापूस, गवत, पाने किंवा वल्कले भरून उशा किंवा तक्के तयार करत असा उल्लेख आहे. सोमेश्वरच्या 'मानसोल्लास' ग्रंथात राजाच्या शय्येचे सात प्रकार दिले आहेत. (१) हंसपिच्छ - हंसाच्या पोटाची आणि शेपटीची मऊ पिसे घेऊन ती मऊ अशा चामड्याच्या खोळीत भरून बिछाना तयार करणे, (२) शाल्मलीतूल - जाड रेशमी कापडाच्या खोळीत सावरीचा अतिशय रेशमी कापूस भरून शय्या तयार करणे, (३) कार्पास - कापूस पिंजून कापडाच्या खोळीत भरणे ही पद्धत आजही प्रचारात आहे. (४) केशर, कमळ, नागकेसर इत्यादी सुगंधी फुलांतील केसर व केशराच्या काड्या घेऊन विविध रंगातील उत्कृष्ट तलम कापडाच्या खोळीत भरून गादी तयार करणे, (५) पल्लवशय्या - लाल, निळी कमळे व केळी, कैकोली इत्यादी झाडांची नऊ पाने पलंगावर पसरून त्यांची शय्या तयार करणे, (६) कुसुमशय्या - मोगरा, चाफा यांसारख्या सुवासिक



फुलांच्या पाकळ्यांनी शय्या तयार करणे. आजही लग्नाच्या पहिल्या रात्री अशा प्रकारच्या शय्या सजवितात, (७) पानीय शय्या - कातड्याच्या खोळीत पाणी भरून शय्या तयार करणे. उन्हाळ्यातही फार सुखकारक वाटते. आजही रुग्ण अत्यवस्थ व बिछान्याला खिळलेला असेल तर त्या अवस्थेत (bedsore) होऊ नये म्हणून (water bed) वापरतात. उत्तम बिछाना घालणे व तो सुंदर वस्त्रे व पुष्पमाला यांनी सजविणे ही एक उत्तम कला आहे. आजही (Hospitality Management) तसेच (Nursing) च्या शिक्षणात उत्तम बिछाने घालणे हा एक भाग असतो. बिछायती ह्या गाण्याची मैफिल, दुसरे समारंभ ह्यासाठीही घालतात.

११. उदकवाद्यम्

जलतरंग हे उदकवाद्य म्हणता येईल. हे घन वाद्यात येते. यात पूर्वी धातूचे पेले वापरीत. इ.स. १० व्या शतकानंतर मात्र चिनी मातीची भांडी वापरली जाऊ लागली. ही भांडी क्रमाने वाढत्या आकाराची असतात. ते वादकासमोर अर्धमंडलाकार ठेवून त्यात पाणी घालतात. बांबूच्या दोन बारीक काठ्यांनी भांड्याच्या काठावर आघात करून हे वाद्य वाजवतात. पाण्यामुळे भांड्यांना स्थिरता येते व पाणी कमी-जास्त करून स्वरांची उंची बदलता येते. पाण्यामुळे गमक निर्मितीही करता येते. एका वेळी एकच स्वरसप्तक वापरता येते. निरनिराळ्या स्वरछटा काढता येतात. जलद तानाही निर्माण करता येतात. वाद्यवृंदातील हे आकर्षक वाद्य असून यावर काही प्रमाणात रागांची आलापीही करता येते. सिकंदराने दिलेल्या एका मेजवानीनंतर एका भारतीय वादकाने जलतरंग वाजवून दाखवल्याचा उल्लेख आहे. वात्स्यायन यास उदकवाद्य म्हणतो. नवव्या शतकातील प्राचीन रोमन साहित्यात तसेच ग्रीक साहित्यात जलतरंगासारख्या वाद्याचे उल्लेख येतात. मलेशिया, चीन येथेही इ.स. च्या दहाव्या शतकात हे वाद्य माहीत असावे असे वाटते.



१२. उदकघात

उदकघात म्हणजे जलक्रीडा करणे. पिचकारी मारणे जलकेली किंवा जलक्रीडा म्हणजे विषयी पुरुष स्त्रियांसहवर्तमान जलामध्ये विलास करतात ती. तसेच पोहणे, नावा वल्हवणे हेही त्यात समाविष्ट आहे. पिचकारी मारणे हे रंगपंचमीसारख्या सणाच्या वेळी आढळून येते. लहान मुले व मोठी माणसे समवयस्कांच्या अंगावर पिचकारीतून रंग उडवतात. मराठ्यांच्या सत्ताकाळात या दिवशी मोठे दरबार भरविण्याची प्रथा होती. या दरबारात सरदार, जहागिरदार वगैरे मंडळी एकमेकांवर गुलाल उडवीत.

महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात इत्यादी ठिकाणी हा सण विशेष उत्साहाने साजरा केला जातो. नव्या जावयाच्या बारा सणात रंगपंचमीचाही सण असून नववधूला त्या दिवशी सासरकडून पांढरी साडी मिळते. त्यावर केशरी रंग उडवलेला असतो. मराठी शाहिरांनी रंगपंचमीवर पोवाडे रचले आहेत, लावण्या आहेत तसेच हिंदी कवींचेही रंगपंचमीवर काव्ये आहेत. दक्षिणेतही ग्रामदेवतेचा रथोत्सव असतो तेव्हा देवळासमोरील हौदात रंगीत पाणी भरून ते एकमेकाच्या अंगावर उडविण्याचा प्रघात आहे. संस्कृत साहित्यात वसंतोत्सवाची विपुल वर्णने आहेत. वसंतोत्सवात वनविहार, जलक्रीडा, नृत्य, संगीत, नाट्य इत्यादी मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले जात. पूर्वीचे राजे सहपरिवार, सर्व ऐश्वर्यानिशी अशा उत्सवात भाग घेत. सामान्य नागरिकही स्वच्छंदाने नृत्य - गायनात सहभागी होत. सर्वजण पिवळी वस्त्रे वापरत. पिवळा रंग उधळीत व स्त्रिया झुल्यावर झोके घेत वसंताची गाणी म्हणत. जलक्रीडा ही ग्रीष्म ऋतूतील सर्वोत्तम मनोरंजन कला मानली गेली आहे. ग्रीष्म ऋतुत उष्ण झळांनी धरती तापली की श्रीमंत नागरिक कूर्परपूर्ण, चंदनलेप, पलाशपुष्पे यांनी सजलेल्या धारागृहात जात. घरातील हौदात व विहिरीतही विलासिनी जलक्रीडा करत. त्यांनी कानावर खोचलेल्या शिरीष कुसुमांनी पाणी रंगीत होत असे व पाण्याच्या आत त्या मृदुंगघोष करत. तो मेघांचा आवाज समजून मोरही अस्वस्थ होत.



१३. चिन्नयोग

अवस्थापरिवर्तन, वृद्धाला तरुण करणे. दुर्भाग्याने, ईर्ष्येमुळे, मत्सरामुळे अथवा फसवून एखाद्याला शक्तिहीन, म्हातारे केले गेले असेल तर वेगवेगळ्या औषधी वापरून अगर मंत्रतंत्रांचा वापर करून त्याला पूर्ववत तरुण बनविणे.

वृद्धावस्था, बलहीन अवस्था कोणालाही आवडत नाही. भोग उपभोगण्यासाठी ययातीने प्रत्यक्ष मुलाकडून तारुण्य मागून घेतले. आजही 'वाएग्रा'सारख्या औषधांच्या जाहिराती व खप माणसाची सदाहरित (Evergreen) राहण्याची दुर्दम्य इच्छाच दर्शविते. ही कला कौचुमार योगापेक्षा वेगळी आहे असे वात्स्यायन सांगतो. यामध्ये वाजिकरणासारखे संभोगशक्ती वाढविण्याचे शास्त्रीय प्रयोग येतात. कौचुमार कला कुरूपाला सुरूप बनविते.



१४. माल्यग्रथन विकल्प

माल्यग्रथन विकल्पा म्हणजे माळा गुंफणे. सौंदर्याच्या दृष्टीने फुलांचे व फुलांच्या हारांचे महत्त्व वैदिक कालापासून लोकांच्या लक्षात आलेले आहे. ऋग्वेदात स्त्रक् म्हणजे पुष्पमाला असून अश्वनीकुमारांच्या गळ्यात कमलपुष्पांचे हार होते असा उल्लेख आहे. रामायणात सीता वनवासात असताना कमलपुष्पांची माळा घालायची असा उल्लेख आहे. रावणाने तिचे हरण केले तेव्हा तिच्या केसातील फुले मार्गावर गळून पडली असा उल्लेख आहे. अयोध्येत स्त्रियांप्रमाणे पुरुषही रंगीबेरंगी फुलांच्या माळा घालीत असा उल्लेख आहे. अशोकवाटिकेत रावण सीतेला भेटायला आला तेव्हा त्याने रक्तपुष्पांच्या माळा घातल्या होत्या असा उल्लेख आहे.

महाभारतातही स्त्रियांनी फुलांचे हार घातल्याचा उल्लेख येतो. निरनिराळ्या रंगीबेरंगी फुलांनी सजविलेल्या केशकलापाला कालिदासाने कुसुमोत्खचित असे म्हटले आहे.



कधीकधी स्त्रिया एकाच प्रकारची फुले माळेत गुंफत तर कधी निरनिराळी फुले घेऊन त्यांचा हार बनवीत. वसंत ऋतूत लोक मोहाच्या सुवासिक फुलांची माळा घालीत तर स्त्रिया भांगात कदंब पुष्पे ठेवत. वर्षाऋतूत त्या केतकी व कदंब पुष्पाच्या माळा डोक्यात माळीत. प्रेमीजन प्रेयसीसाठी मालती, जुई, बकुल इत्यादी फुलांचे हार बनवून त्यांना पाठवीत. वसंत ऋतूत सोनचाफा, मोगरा, अशोक या फुलांनी स्त्रियांचा केशकलाप सुगंधी होत असे. शरद ऋतूत स्त्रिया नवमालती पुष्पे माळत. हेमंत ऋतूत त्या फुलांची वेणी माळत. ग्रीष्म ऋतूत कानावर शिरीष पुष्प ठेवत. वर्षा ऋतूत ककुभाची मंजरी, शरद ऋतूत नीलोत्पल व वसंत ऋतूत कण्हेर ही फुले कानावर खोचत. कानावर सुगंधी कर्णफुले व गळ्यांत सुवासिक माळा घालून तरुणी आपल्या प्रियकारांना मोहवीत असे असे वर्णन कालिदासाने ऋतुसंहारात केले आहे. फुलांचा आकार, त्यांची कोमलता, देठाचा आकार, या सर्वानुसार गुंफणे पण वेगवेगळे असणे. सूताबरोबरच देठात देठ गुंफून किंवा केळीच्या सोपटातून निघणाऱ्या दोऱ्याने अशा विविध तऱ्हेने माळा गुंफणे, रंगसंगती साधणे ही एक मोठीच कला आहे. मोठमोठ्या देवालयातून देवाला लागणारे हारमाळा तयार करण्यासाठी पुष्पबंधन मण्डप नावाचा एक मंडपच असतो.

१५. शेखरकापीडयोजनम्

केसात फुले गुंफणे किंवा मुकुट बनविणे. प्राचीन काळापासून देवतांच्या मस्तकावर शिरोभूषण दिसते. मुकुटाला मौली असे दुसरे नाव आहे.

'मानसार' ग्रंथात मुकुटाचे खालील प्रकार दिले आहेत :

(१) जटामुकुट : मस्तकावरील केशसंभार जटामय असून तो उंच मुकुटाप्रमाणे रचलेला असतो. उदा. ब्रह्मा, रुद्र, शिव यांच्या मस्तकावर तो असतो त्यात कधी रत्ने, चंद्रकोर अथवा कपाल असते.

(२) किरीटमुकुट : नारायण, सूर्य, कुबेर या देवतांच्या मस्तकावर शंकूच्या आकाराचे शिरोभूषण असते, त्याला किरीटमुकुट म्हणतात त्यावर कधी लहानसा कळस असतो किंवा कधी अलंकार असतो.

(३) करंड मुकुट : हा मुकुट करंडीप्रमाणे अर्धगोलाकार व चपटा असतो. तो बहुधा गौण देवतांच्या डोक्यावर असतो.

(४) शिरस्त्रक : हा मुकुट पागोट्याप्रमाणे व्यवस्थित बांधलेला असतो. शुंगकालातील यक्ष, नाग इत्यादी मूर्तींच्या मस्तकावर हा घातलेला असतो. राजे लोक आपापल्या मस्तकावर विविध आकारांचे रत्नजडित सुवर्णमुकुट धारण करीत. दक्षिण भारतातील पुरुष सुगंधी फुलांचे मुकुट मस्तकावर धारण करीत. भारतातील विविध प्रांतात निरनिराळ्या तऱ्हेने पागोटी, फेटे, पगड्या बांधल्या जातात व त्या सजविल्याही जातात व हे उत्तम रीतीने जमणे कला मानतात.



१६. नेपथ्यप्रयोग

देश, काल याप्रमाणे वस्त्रालंकार करणे. वात्स्यायनाने नागरिकाची किंवा शहरवासीयांची जी दिनचर्या सांगितली आहे त्यात हे वर्णन येते.

नागरिक कापूस, ताग, रेशीम व लोकर यापासून बनलेली वस्त्रे ऋतुमानाप्रमाणे वापरीत असे. कपड्यांचे निबंधनीय, प्रक्षेप्य व आरोप्य असे तीन प्रकार असत.

पगडी, साडी हे निबंधनीय प्रकार, चोलक किंवा चोळी हा प्रक्षेप्य प्रकार असून उत्तरीय शेला, दुप्पटा हे आरोप्य होत. अशी वस्त्रे धारण केल्यावर नागरिक अलंकार धारण करत असे. वराहमिहिराने तेरा प्रकारची रत्ने व सोन्याचे नऊ प्रकार सांगितले आहेत. या सोन्यारत्नांनी मढविलेले दागिने असत. दागिन्यांचेही निबंधनीय, प्रक्षेप्य व आरोप्य असे प्रकार असत.

अंगद, वेणी, शिखादृढिका, श्रोणीसूत्र, चूडामणी वगैरे बांधून धारण केले जाणारे दागिने निबंधनीय होत. उर्मिका, कटक, वलय, मंजीर वगैरे अंगात घालून वापरले जाणारे दागिने प्रक्षेप्य होत. तर हार, नक्षत्रमालिका यांसारखे दागिने आरोप्य प्रकारात मोडतात.



अशा प्रकारे वस्त्रे व अलंकार धारण केल्यावर नागरिक फुलांच्या माळा घाले. त्या माळांचेही उद्वर्तित, वितन, संधारय, ग्रंथिमत यासारखे आठ प्रकार असत. आणि प्रसंग, ऋतु, वेळ वगैरे बघून त्यानुसार वेशभूषा करणे ही एक कला मानली गेली. आजच्या युगातील फॅशन डिझाइन्स त्यांचे रंग, कपडा, दागिने आजही ऋतुमान, प्रसंग, वेळ यांच्याप्रमाणेच ठरवितात.

१७. कर्णपत्रभंग

कर्णपत्रभंग म्हणजे पाने-फुले यांच्या साहाय्याने कर्णफुले बनविणे. वेगवेगळ्या ऋतूतल्या पानाफुलांचे अलंकार स्त्री-पुरुष घालत. कुमुददल, मल्लिका मंजरी, चंदन, अशोक व तमाल यांची पाने कर्णफुले म्हणून उपयोगात आणत. वर्षाऋतूत सुगंधी कर्णफुले व सुवासिक माळा घालून तरुणी आपल्या प्रियकरांना मोहवीत असे कालिदासाने ऋतुसंहारात वर्णन केले आहे. ग्रीष्म ऋतूत स्त्री-पुरुष कानावर शिरीषपुष्प ठेवत. वर्षाऋतूत ककुभाची मंजरी, शरद ऋतूत नीलोत्पल व वसंत ऋतूत कण्हेर ही फुले कानावर खोचीत. शिरीषाचे लाल फूल अनुराग व प्रणय याचे द्योतक आहे. तर कमळ पावित्र्याचे प्रतीक आहे.



१८. गंधयुक्ति

गंधयुक्ति म्हणते सुगंधी द्रव्ये तयार करणे. प्राचीन भारतीय लोक सुंदर, सुवासिक वस्तूंचे रसिक व चोखंदळ भोक्ते होते. गंधशास्त्रावर गंधवाद व गंधसार हे दोन स्वतंत्र ग्रंथ १३०० ते १६०० या कालखंडात निर्माण झाले तरी त्या पूर्वीच्या जुन्या ग्रंथात गंधशास्त्रावर त्रोटक प्रकरणे व टिपणे आढळतात. वराहमिहिराच्या (इ.स. ५००) बृहत्संहितेत गंधयुक्ती नावाचे प्रकरण आहे, त्यात सुगंधी वस्तू तयार करताना आठ प्रकारच्या प्रक्रिया आवश्यक आहेत असे सांगितले आहे :

(१) शौच किंवा शोधन.
(२) आचमन.
(३) विरेचन.
(४) भावन - चूर्ण द्रवात घालून मुरविणे.
(५) पाक - भावनाने तयार झालेला द्रव शिजवणे किंवा उकळविणे.
(६) बोधन - एखाद्या सुगंधाच्या साहाय्याने मिश्रणातील सुवास अधिक जागृत करणे.
(७) धूपन - धूर देणे.



(८) वासन - फुलांच्या सुवासाचा वास देणे.

देवाच्या षोडशोपचार पूजेत सुगंध हा उपचार आवश्यक मानला जातो. देवपूजेत चंदन, कर्पूर, केशर, उशीर, नागरमोथा, गोरोचन, देवदार आणि फुले यांपासून बनवलेले अष्टगंध, सुवासिक फुले, धूप वापरला जातो. चरक संहितेते वातरक्तासारख्या विकारावर चंदन, उशीर केशर, तगर, मंजिष्ठा, कुंकुम, पत्रैला, अगुर यासारखी सुगंधी द्रव्ये घालून बनविलेली तैले वापरत.

कस्तुरी, उद, केशर इत्यादी सुगंधी द्रव्ये दुधाच्या सायीत घालून उटणी तयार करत. मानसोल्लासात राजाच्या अंगाला लावायचे उटणे पुढीलप्रमाणे करत. त्यात

पालक, तगर, मांसी, अश्वगंधा, पुष्कर, कोष्ठ, पटोलक, दोन प्रकारची हळद व ग्रंथीपर्णी या औषधी वनस्पती सावलीत वाळवून त्यांची पूड करून मिश्रण तयार करत व निंब, राजवृक्ष, तुलसी, आर्जक यांची पाने वाटून वरील मिश्रणात घालत त्यात नागकेसर, पुन्नाग वगैरे फुलांची पूड मिसळत. वेलदोडा, मोहरी, चक्रमद वगैरे दाण्यांची पूडही त्यात मिसळत. नंतर गुग्गुल सैंधव, सर्जरस वगैरे पदार्थांच्या पाण्यात किंवा तांदळाच्या कांजीत सर्व मिश्रण करून तयार झालेले उटणे राजाला लावीत.

१८११-१२ साली एकट्या पाटणा शहरात गुलाबपाणी, सुवासिक अर्क यांचे आठ व चमेलीच्या तेलाचे तीन कारखाने होते.

मोगल बादशहांनाही सुगंधी द्रव्याची खूप आवड होती. जहांगीरची बेगम नूरजहानने तर गुलाबाच्या अत्तराचा संग्रह केला होता.

राजेरजवाडे, श्रीमंत लोक यांच्यापुरता मर्यादित असणारा सुगंधी अत्तरे, तेले यांचा छंद हा सर्वसाधारण माणसांतही उत्तम रुजला आहे. आपले सण-समारंभ अत्तर, गुलाबपाण्याशिवाय पूर्ण होत नाहीत.

१९. भूषणयोजनम्

भूषणयोजनम् म्हणजे अलंकार करणे, घालणे, नीटनेटके ठेवणे. आपले शरीर शोभिवंत, आकर्षक दिसावे हे मनुष्यामध्ये स्वभावतः आहे. पण अलंकारांचा हेतू केवळ सजवणे हा नसून जीविताचे रक्षण, देवतांची कृपा, पिशाचांचे निराकरण वगैरे हेतूही आहेत.

प्रत्येक समाजातल्या अलंकरणाच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. त्यातही स्त्रिया, पुरुष, मुले यांचे अलंकार भिन्नभिन्न प्रकारचे असतात. सौंदर्यदृष्टी बदलते तसतशी अलंकारांची जडणघडणही बदलते.

अलंकारांचे चार प्रकार आहेत (१) अवेध्य - किरीट, कुंडल इत्यादी, (२) बंधनीय - फुले, गजरे, कंबरपट्टे वगैरे, (३) क्षेप्य - नुपूर, वलय वगैरे, (४) आरोप्य - मोती, मणी यांच्या माळा.

ऋग्वेद काळापासून अनेक दागिन्यांचा उल्लेख येतो. हंसतिलक, ललामक, चूडामंडन यासारखी असंख्य मस्तका भरणे.

चंद्रकोर, गुलाबाचे फूल, नाग, केवडा, बिजवरा, मूद यांसारखे केसात घालण्याचे अनेक प्रकार कुंडल, कर्णिका, तालपत्र यांसारखी अगणित कर्णभूषणे आहेत.

मुक्कु-कुड्डी, बुलक, नत्तू यांसारखी असंख्य नासिकाभूषणे आहेत. रत्नावली, नक्षत्रमाला, भ्रामर वर्णसर, इंद्रच्छंद (याला १००८ पदर असत) तो आजच्या मोहनमाळ, चपलाहारपर्यंत अगणित कंठभूषणे, अंगुरीय, अंगुलिका, ऊर्मिका ते आजची अंगठीपर्यंत असंख्य अंगूलीभूषणे आहेत.

अंगद, केयूर यासारखी अनेक बाहुभूषणे, आवापक, परिहार्य, वलय यांसारखी मनगटात घालायचे असंख्य दागिने, वलयाच्या खाली हरतऱ्हेची कंकणे, कांची, मेखला, कलापपासून कंबरपट्ट्यापर्यंत अगणित कटिभूषणे आहेत.

नुपूर, पादकंटक, पादचूड, पादपद्म असे चरणालंकार जोडवी, गेंद, विरोळ्या, मासोळ्या ह्यासारखे पायाच्या बोटात घालण्याचे अलंकार आहेत.

केवळ स्त्रियाच नव्हे तर पुरुषही नखशिखान्त नटत. कुठले दागिने कधी कुठल्या प्रसंगी घालायचे, कशाबरोबर कुठला दागिना घालायचा, कुठल्या क्रमाने घालायचे या सर्वांचेच अलिखित नियम असत व ते सर्व अवगत असणारी एक कला ठरावी यांत नवल ते काय? आतामात्र पूर्वीचे अवजड अलंकार मागे पडून सुटसुटीत व कमी वजनाचे अलंकार लोकप्रिय होऊ लागले.

२०. ऐंद्रजालयोग

'इन्द्राणामिन्द्रियाणां जालं आवरकं' - इंद्र म्हणजेच ज्ञानेंद्रिये यांना जे आवरण घालते ते इंद्रजाल होय. ऋग्वेदात इंद्राला मायावान म्हटले आहे. जादुविद्येला इंद्रजाल म्हणतात. भ्रांतिकृत चमत्कार, भलत्यातून भलते निष्पन्न होणे, भलत्या जागी भलती वस्तू आणणे, वस्तू नाहीशी करणे, किंवा तिचे रूपांतर करणे या सर्व गोष्टी इंद्रजालात येतात. प्राचीन काळी ज्याला अशी जादुविद्या येई तोच त्या समाजाचा पुढारी बनत असे. लोक त्याला भीत व त्याच्या आज्ञेत वागत. इंद्रजाल हे प्रथम एक चमत्कार या स्वरूपात होते पुढे त्याला मंत्रतंत्राची जोड मिळाली व ती अभिचार विद्या म्हणून प्रसिद्ध झाली. जारण, मारण, वशीकरण, स्तंभन इत्यादी क्रिया इंद्रजाल विद्येची अंगे ठरली.

जादू दाखविणाऱ्या जादूगारांसाठी वैदिक साहित्यात यातुधान, यातुविद् हे शब्द वापरले आहेत.

इतिहास-पुराणे यांत राक्षसांना मायावी म्हटले आहे. मायेच्या प्रभावाने राक्षस नाना रूपे धारण करीत आणि देवांना फसविण्याचा प्रयत्न करीत. राक्षस आणि माया यांच्या अतूट संबंधामुळे सायणाने 'यातवो राक्षसाः ।' म्हणजे राक्षसाला पर्यायी शब्द जादूगार सांगितला आहे.

जातक कथांत भंडुकण्ण व पंडुकण्ण या दोन जादुगारांनी केलेल्या चमत्काराचे वर्णन विस्तृतपणे आले आहे. कौटिल्याने अर्थशास्त्रात जादूला जंभक विद्या म्हटले आहे व या विद्येचा उपयोग करून शत्रूला कसे फसवावे यावर पुष्कळ चर्चा केली आहे. चमत्कार करणारे जादूगार हेर शत्रूपक्षाला नाना प्रकारे रंजीस आणण्यासाठी वापरावे अशी कौटिल्याची सूचना आहे.



मुद्राराक्षस नाटकात ऐंद्रजालिकाच्या म्हणजे जादूगाराच्या रूपाने वावरणाऱ्या हेराचे चित्रण आलेले आहे.

२१. कौचुमारयोग

कुचुमार + अण् असे मानक हिन्दी कोशात रूप दिले आहे. कुरूपाला सुरूप बनविणे.

शरीराचे सौंदर्य वृद्धिंगत करण्याचा उपचार म्हणजे प्रसाधन होय. प्रसाधनाचे आंतरिक आणि बाह्य असे दोन भाग आहेत. पौष्टिक भोजन, व्यायाम या गोष्टी आंतरिक प्रसाधनात येतात शिवाय आंतरिक प्रसाधनासाठी प्राचीन काळी औषधांचाही उपयोग करीत. त्यामुळे दीर्घ कालपर्यंत शरीर स्वस्थ व सुंदर राहायला मदत होई. दात पडू नये, केस गळू नयेत, डोळे तेजस्वी राहावेत, त्वचेवर सुरकुत्या पडू नयेत, अंगकांती सतेज राहावी यासाठी प्राचीन लोकही सतत प्रयत्नशील असत. बाह्य प्रसाधनात विविध प्रकारची उटणी, केसांना लावायची तेले, डोळ्यात घालायचे अंजन, सुगंधी द्रव्ये, ओठ, नखे रंगवायची द्रव्ये, मेंदी, अळिता इत्यादी द्रव्ये येतात. विविध वस्त्रे परिधान करणे, पुष्पमाला व अलंकार धारण करणे या गोष्टीही प्रसाधनात अंतर्भूत होतात. आता हे प्रसाधन म्हणजे नुसतीच सौंदर्यवृद्धी नव्हे तर जे दोष असतात, जी कुरूपता असते ती झाकणे हाही असतो. स्नान ही प्रसाधनातील आवश्यक बाब असून विविध अंगराग, शरीरावरील पत्ररचना व विलेपन, मंडन विभूषण, संवाहन या सर्वांचा हेतू तोच आहे. सोळा शृंगार सांगितले आहेत त्यात उटणे, स्नान, स्वच्छवस्त्र परिधान, भांग, पायांना अळिता, केशरचना, तिलक, हनुवटीवर तीळ बनवणे, अलंकार, मेंदी, दंतमंजन, अंजन किंवा काजळ, अरगजालेपन, तांबुले, माला व गजरा हे येतात. कालिदास, बाणभट्ट इ. संस्कृत कवींच्या ग्रंथात प्रसाधनकलेचे अनेक उल्लेख सापडतात. प्राचीन काळी प्रसाधनकला जाणणाऱ्या पुरुषांना प्रसाधक, स्त्रियांना प्रसाधिका व प्रसाधन सामग्री

ठेवलेल्या पेटीला प्रसाधन पेटिका म्हणत. गुप्तकाळात प्रसाधन कलेकडे अधिक लक्ष गेले आणि चित्रकला, मूर्तीकला यातही प्रसाधनाचे चित्रण होऊ लागले. अजंठा येथील चित्रात प्रसाधक, प्रसाधिका यांची चित्रे आढळतात. प्रसाधिकांच्या मूर्तीही सापडल्या आहेत. मध्ययुगात प्रसाधनकार्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे स्वतंत्र वर्गच अस्तित्वात आले. विविध प्रसाधने करणारे तज्ज्ञही निर्माण झाले. प्रसाधनांची गणना ६४ कलांमध्ये होऊ लागली. पादुकाभोग, तांबुलभोग, वस्त्रोपभोग, माल्योपभोग अशा अनेक अंगात प्रसाधनांचा विस्तार झाला. आजची beauty parlours, beauticians, beauty therapists ही त्याच संकल्पनेची आधुनिक रूपे आहेत.

महाराष्ट्र शब्दकोशात (विभाग-३, पृ.१२४८) कौचुमारयोग याचा अर्थ अंगे रंगवून निरनिराळी रूपे धारण करणे, बहुरूप्याची कला असा दिला आहे. याविषयी माहिती छलितक योग या कलेमध्ये दिली आहे.

२२. हस्तलाघवं

हस्तलाघवं म्हणजे हातचलाखी. अस्वाभाविक रितीने काही घटना घडवून आणणाऱ्या चमत्कारास जादू म्हणतात. मंत्रसामर्थ्याने किंवा अतींद्रीय शक्तीने योगी किंवा दैवी पुरुष जे चमत्कार घडवतात त्यांचा व सामान्य जादूगारांच्या चमत्कारांचा वर्ग निरनिराळा मानला पाहिजे. हातचलाखी करून जादूचे खेळ जे करण्यात येतात त्यांचा अतींद्रिय शक्तींशी संबंध नसतो. तो एक करमणुकीचा प्रकार असतो हा एक नजरबंदीचाच प्रकार असतो. दृष्टीला भुरळ पडते व चमत्कार घडल्यासारखा वाटतो. व्यवस्थित पार पडलेली एखादी हातचलाखीची गोष्ट ही एक उत्तम कला असते. एके काळी भोळ्याभाबड्या प्रेक्षकांना उल्लू सहज बनविता येत असे परंतु सुशिक्षित, वैज्ञानिक दृष्टी असणाऱ्या प्रेक्षकांना केवळ हातचलाखीने थक्क करणे व त्यांची करमणूक करणे म्हणजे जादूगाराची कसोटी लागते. बाकी सर्व कलांप्रमाणे ह्या कलेतील तांत्रिक कुशलता ही केवळ साधन आहे. ती हातचलाखी दाखविताना निःसंशय हवीच पण त्याचबरोबर विविध हातचलाखीचे खेळ योग्य प्रकारे कार्यक्रमात गुंफून चांगल्या प्रकारे सादर करणे व लोकांना थक्क करणे, एक ओघवता कार्यक्रम देऊन लोकांना खिळवून ठेवणे हे कलाकाराचेच कौशल्य आहे, असे प्रख्यात जादुगार Mr. George G. Kaplen म्हणतो. पत्त्यांच्या जादू, जादूच्या छडीमधून विविध वस्तू काढणे, नाण्यांची जादू वगैरे अनेक गोष्ट यात येतात.



दैनंदिन व्यवहारातील गोष्टी सुद्धा सरावाने कमीत कमी वेळात पा सुव्यवस्थितपणे करणे यात लागणाऱ्या हस्तकौशल्यासही हस्तलाघव म्हणता येईल.

२३. विचित्रशाकयूषभक्ष्यविकारक्रिया

शाक-भाजीपाला अपूप - वडे, घारगे, अनरसे वगैरे थोडक्यात पाकशास्त्राची कला. विविध अन्नपदार्थ चवदार व खाण्यालायक करण्याचे जे शास्त्र त्याला पाकशास्त्र म्हणतात. 'स्थालीमार्जनाद्यो नदपरीक्षान्तो व्यापारनिचयः पाकः ।' म्हणजेच भांडी घासण्यापासून शिजविलेल्या अन्नाची परीक्षा करण्यापर्यंतचा ज्या क्रिया त्या सर्वांना मिळून पाक असे म्हणावे.

पाकराजेश्वर या ग्रंथात पाकाचे (१) भाजणे, (२) तेला-तुपात तळणे, (३) वाफेवर उकडणे, (४) पाण्यात शिजवणे, (५) शिजलेल्या पदार्थातला किंवा धान्यातला रस काढून कढण करणे, (६) तोंड बंद करून भूमीत, मडक्यात किंवा भांड्यात भाजणे (तंदूर) आणि (७) खाली-वर कोळसे घालून किंवा अग्नी पेटवून शिजवणे असे सात प्रकार सांगितले आहेत.

पूर्वी मातीच्या भांड्यात स्वैपाक होत होता त्यामुळे नित्य नवीन भांडे वापरावे अगर पंधरा दिवसापर्यंत एक भांडे वापरून मग शहाण्यांनी त्याचा त्याग करावा अशी सूचना केली होती. प्राचीन काळापासून जे पदार्थ माणूस सेवन करत होता त्याचे वर्गीकरण : (१) वनस्पतीजन्य, (२) प्राणिजन्य, (३) भूगर्भजन्य म्हणजेच मीठ असे केले होते.

त्यापासून पाच प्रकारचा आहार बने. (१) भात, डाळ, शाकभाजी वगैरे भोज्य, (२) लाडू, मोदक इत्यादी भक्ष्य, (३) चोखून खाण्याचे पदार्थ चोष्य, (४) चटणी लोणचे हे जिभेला लावण्याचे लेह्य पदार्थ, (५) पिण्याचे पदार्थ - पेय.

वरील पाच प्रकारच्या आहारातून मनुष्याने स्वाद व स्वास्थ्य या दोन्ही दृष्टींनी विचार करून पदार्थ सेवन करावे असे सांगितले आहे. इंद्रियनिग्रह होण्यासाठी व मन ताब्यात राहाण्यासाठी सत्त्व गुणांची वाढ होईल असेच पदार्थ सेवन करावेत असे आयुर्वेद सांगतो. 'मनुष्य जसे अन्न खातो तसा त्याचा स्वभाव बनतो' ही भारतीय विचारवंतांची शाश्वत धारणा आहे.

भगवद्‌गीतेतही सात्त्विक, राजस व तामस या विविध आहारांचे वर्णन येते. अगदी ऋग्वेदकालापासून अपूप एक प्रकारचा वडा असून ते सर्वप्राचीन मिष्टान्न दिसते. हे कणकेपासून तयार करून कुल्माष - हेही गव्हाचे पीठ किंवा ज्वारी बाजरीचे पीठ वाफवून तूप, गूळ घालून केलेले लाडू असत.

चूर्ण - कणिक भाजून साखर मिसळून बनवत.

ओदन - भातालाही संज्ञा असून ते निरनिराळ्या पदार्थांबरोबर शिजवून क्षिरौदन, दध्योदन, मुद्‌गौदन, तिलौदन, घृतौदन असे भाताचे प्रकार असत.

तसेच मंथ, यवागू, यावक, पिष्टक, संयाव, पायस वगैरे लड्डुक, शष्कुली, रागषाडव, गोड पदार्थ होत.

शाकपदार्थ बनविताना वेली, पाने, देठ, अंकुर व फळे यांचा उपयोग करत. शाकाहारात शाकभाज्यांना विशेष महत्त्व देत. स्वयंपाकात तिळाचे तेल सर्वोत्कृष्ट मानत. भोज्य पदार्थ गोड करण्यासाठी मध, तीळ, दूध, साखर घालत व खारे करायचे असतील तेव्हा सुंठ, पिंपळी, मिरची, मीठ, जिरे, मेथी, ओवा, धने इत्यादी मसाल्याचे पदार्थ टाकीत.

स्वयंपाक करणाऱ्या आचाऱ्याला सूद किंवा सूपकार म्हणत. राजवाड्यांतून पाककर्म निपुण सूपकार असत. प्राचीन काळी राजकुमारांनाही पाककला शिकवली जात असे. नळ, भीम व लक्ष्मण हे रामायण-महाभारतातील निष्णात पाकविशारद होते. भोजन पदार्थ वाढताना स्वयंपाकी चांगला पोशाख करीत. दशरथाच्या अश्वमेधात वाढणारे स्वयंपाकी सुवेष व अलंकृत होते व त्यांच्या हाताखाली काम करणारे मणिकुंडलधारी होते असे वर्णन आहे. पंडित रघुनाथसूरी याने 'भोजनकुतुहल' नावाचा ग्रंथ इ.स. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिला.

आजही पाकशास्त्र व सूपकार यांचे महत्त्व तेवढेच अजोड आहे.

२४. पानकरसरागासव योजनम्

रागासव योजना किंवा पानासव रसरागासव योजना म्हणजे नाना तऱ्हेची पेये तयार करणे, मद्य तयार करणे.

आ + √सु + अण् = आसव = मद्यार्क.

मद्य निर्मितीची कला भारतीयांना प्राचीन काळापासून अवगत होती. वेदकाळात सोम व सुरा या दोन मादक पेयांचा उपयोग करीत. वैदिक आर्य यज्ञाच्या वेळी देवतांना सोमरस अर्पण करीत व स्वतः पीत. सोम नावाच्या वनस्पतीपासून सोमरस बनत असे व त्यात दूध, दही व यवही घालत. सोमाला उद्देशून ऋग्वेदात अनेक ऋचा आहेत. त्याच्या सुगंधाची, स्वादाची स्तुती केलेली असून तो स्वास्थ्यवर्धक आहे तसेच युद्धात वीरश्री संचरण्यासाठी, तरतरी व मद येण्यासाठी, प्रतिभेच्या विकासासाठी, व वक्तृत्वाला भरती येण्यासाठी त्याचा उपयोग होतो असे ऋग्वेदात सांगितले आहे.

सुरा ही यव व तांदळापासून बनवत. यजुर्वेदात सोम-सुरा या दोन मादक पेयांचा उल्लेख होतो. सोमाचा उपयोग मुख्यत्वे यज्ञात निमंत्रितांसाठी व वरिष्ठ समाजात मित प्रमाणात होत असावा आणि व्यसनासाठी सुरा बहुजन समाजात प्रिय असावी. त्यामुळे सुरेचा निषेध केलेला आहे.



रामायणकाळी आर्य व अनार्य सर्वजण सुरा पीत. सुरेचे अनेक प्रकार त्याकाळी लोकांना माहीत होते. गाळलेल्या सुरेला कृत्सुरा म्हणत. सुगंधी किंवा मसालेदार मद्याला मैरेय म्हणत. सीधू नावाचे मद्य गुळापासून बनवीत. सौवीरक हे एक साधारण प्रतीचे मद्य होते. ते बोरांपासून बनवीत. वारुणी हे कडक मद्य असून खजुराच्या रसात काही विशेष वनस्पतींचे रस मिसळून ते तयार करीत. उत्तम प्रतीच्या मद्याला 'सुराध्य' असे म्हणत.

सहकार सुरा - साधारण मद्यात आंब्याचा रस मिसळत. त्यात साखरेचा अथवा

गुळाचा पाक घालून रसोत्तरा बने. बीजबंध औषधीने बीजोत्तरा सुरा बने व दूध, केशर, हळद, दारूहळद, पिंपळी वगैरे मसाले मिसळून सम्भारिकी सुरा बने. रामाने सीतेला मधु-मैरेय आपल्या हाताने पाजल्याचा उल्लेख आहे. (७.४२.१८) मदिरापानाने धुंद झालेल्या नागकन्या व किन्नरी रामसीतेचे मनोरंजन करीत असाही उल्लेख आहे. रावणाच्या अंतःपुरातील स्त्रियाही मद्यासक्त होत्या.

त्या काळात अनेक सार्वजनिक मदिरागृहे असत त्यांना पानभूमी म्हणत. पानभूमीत सामान्यतः खालच्या वर्गातील लोक जमत. त्यांना परळातून मद्य दिले जाई. त्यांच्या मनोरंजनाची निरनिराळी साधनेही त्या ठिकाणी असत. वाल्मिकीने लंकेतल्या पानभूमीचे वर्णन केले आहे. पण रामायणातही मद्यपानाची निंदा केलेली दिसते. महाभारतकाळी लोक मद्यपान करीत. यादव तर यात फारच पुढारलेले असून अतिरिक्त मद्यपानाने पुढे यादवी झाली. युधिष्ठिराच्या अश्वमेध यज्ञाप्रसंगी सुरा व मैरेय यांचा जणू सागरच उसळला होता असे म्हटले आहे. द्रौपदी, सुभद्रा यांनीही वनविहारप्रसंगी मद्यपान केल्याचा उल्लेख आहे.



आर्यांची वसाहत वाढली. आर्येतरांशी संघटन वाढले त्याचबरोबर मद्याचाही प्रचार वाढला. रोमन लोकांशी संपर्क वाढल्यावर मद्यकुंभही भारतात येऊ लागले. कडक, रूचकर, सुगंधी मद्ये तयार करण्याच्या पद्धती प्रचारात आल्या. मद्यार्क गाळण्याची प्रक्रिया वाजसनेयी संहितेत सांगितली आहे. या प्रक्रियेमुळे मद्य निर्मितीत क्रांती झाली. तिचा सामाजिक व आर्थिक परिणाम म्हणून सोम व सुरा यांचे निर्माते व विक्रेते विभक्त झाले. मद्याची ने-आण करण्यासाठी कातडी पखाली व बुधले वापरत. पखालीच्या सोंडेसारख्या मुखातून मद्य सुरईत ओतत त्यामुळे मद्याचा व्यवसाय करणाऱ्यांना शौंडिक म्हणत.

कालिदासाच्या काळातही स्त्री-पुरुष मद्यपान करीत याचा उल्लेख ऋतुसंहार, रघुवंश तसेच मालविकाग्निमित्रम आदी नाटकातून दिसतो.

वैदिक काळापासून सुरापानाचा निषेध सापडतो. धर्मसूत्रात पाच महापातकांमध्ये मद्यपान एक मानले आहे. स्मृतिकारांनी मद्यपानाबद्दल कडक शासन सांगितले आहे. पण बहुसंख्य जनतेची मान्यता या निषेधांना कधीच मिळाली नाही. आदिवासी लोकांत तर मद्यपान प्रत्येक धार्मिक विधीचाच भाग झाला.

मद्य बनविणे, ते विशिष्ट पद्धतीने पेश करणे वेगवेगळ्या मद्यांचे ठरावीक पद्धतीने मिश्रण करणे हे आजही एक मोठे शास्त्र तशीच कला मानली गेली आहे. उच्चभ्रू, कनिष्ठ वर्गांमध्ये मद्यपान आजही सर्रास चालते व मध्यमवर्गही ह्यातून पूर्णपणे सुटलेला नाही.

२५. सूचीवानकर्माणि

√वस् धातूपासून वसन हा शब्द परिधान करण्याचे कपडे या अर्थी येतो. √चीव् - आच्छादणे या अर्थी चीवरं तसेच √चि - धातूपासून चीर हा शब्द बुद्ध भिक्षूंच्या वस्त्रासाठी येई. वस्त्रे कापूस (कार्पास), ताग (औमक) व रेशमी (कौशेय व चीनपद) असत. विणण्याची कला अगदी ऋग्वेद काळापासून होती. 'वस्त्रा पुत्राय मातरो वयन्ति। (५.४७.६) म्हणजे माता पुत्रासाठी वस्त्रे विणतात असा उल्लेख ऋग्वेदात येतो. विणकामातले तंतू आणि ओतू म्हणजे उभे आणि आडवे धागे असे पारिभाषिक शब्दही येतात. कौटिलिय अर्थशास्त्रात वस्त्रोद्योगाची बरीच माहिती आहे. सुती कापडांना पण माथुर, आपरांतक, कलिंगक, काशिक, वांगक, वात्सक अशी देशांवरून पडलेली नावे होती. या काळात भारतात जशी उत्तम वस्त्रे तयार होत तशीच चीन, मध्य आशिया, अफगाणिस्तान इत्यादी देशातील वस्त्रेही खुष्कीच्या मार्गाने भारतात येत. भारतातील मलमलीला रोमन साम्राज्यात खूप मागणी होती.

महावग्ग व शूलवग्ग ह्या बौद्ध साहित्यात शिवणकामात येणारे खूप शब्द येतात. महावग्गात सांगितले आहे की त्या काळात शिवणकामात निष्णात असे खूप लोक होते. सूची हा शब्द सुई या अर्थाने येतो. कोंबडीच्या पिसापासून अथवा बांबूपासून सुया बनवत. सुया ज्या पेटीत ठेवत त्यांचा सुचिनलिका म्हणत व त्याही बांबूपासून बनवत. सुईने जे टाके घातले जायचे त्यांना सुतंत्रिका म्हणत. कलंबक व मोघसुत्तक हे टाक्याचे दोन प्रकार होते. पट्टी दुमडून जे शिवण होई त्याला शोभन असे नाव होते. शिवणकामातल्या कातरीला सत्तक असे म्हणत त्या सोन्याच्या किंवा चांदीच्या बनलेल्या असत. बौद्ध भिक्षू मात्र हाडापासून अगर शंखापासून बनलेल्या कातऱ्या वापरत. शिवताना सुई लागू नये म्हणून बोटांना वापरायची अंगुलीस्तान किंवा टोपण याचाही उल्लेख आहे ते सोने चांदी अगर हाडापासून बनवत. ही टोपणे व कात्र्या ठेवायच्या पिशवीला आसेवक विव्यक



म्हणत. शिवणसंदर्भात 'कटीण' हाही शब्द येतो. त्याचा अर्थ लाकडी चौकट असा असून कापड त्यात अडकवून ताठ करून शिवणकाम होत होते. मनुस्मृतीत शिंप्याला 'तंतुवायं' असा शब्द येतो. कपड्यांचे उत्तरीय व अंतरीय असे प्रकार होते. कमरेवरती घालायच्या कपड्यांना प्रवर, अत्तरसंग, बृहतिका, संव्यानम्, उत्तरीय अशी नावे होती तर कमरेखाली वापरायच्या वस्त्रांना अंतरीय, उपसंव्यान परिधानं, अधोन्सुकं अशी नावे होती. आजही मशिनवर अथवा हाताने कापडावर भरतकाम करताना कापड गोल लाकडी चौकटीत ताणून बसवले जाते.

धोतर व कमरबंद नेसायच्या अनेक कलापूर्ण रीती होत्या. हत्तीसौंडिक म्हणजे नीरीचा सोडलेला सोगा हत्तीच्या सोंडेसारखा दिसे. मत्स्यवालक म्हणजे लांब किंवा आखुड किनारी अशा प्रकारे दुमडत की ते माशाच्या शेपटाप्रमाणे दिसे. राजेराण्यांच्या पोशाखात उत्तरीय, अंतरीय व उष्णीश (पगडी) असे कपडे असत ते अतिशय देखणे, नक्षीकाम केलेले असत राण्याही धोतर म्हणजेच साडी व कंचुक वापरत. शिकाऱ्यांच्या पोशाखात संपूर्ण बाह्या असणारे गुडघ्यापर्यंत पोचणारे वगैरे जाकीट असे. आखुड विजारी नाडी बांधून घालत व नाडीच्या टोकाला पताकेप्रमाणे फलकणारे कापड असे. सैनिकही पूर्ण बाह्या किंवा आखूड बाह्यांचे जाकीट वापरत. गुडघ्यापर्यंत आखूड धोतर असे.

मथुरा, बारहुत येथील शिल्पांमधून पायापर्यंत घट्ट खोचून नेसलेल्या वरच्या अंगाला उभ्या निऱ्या असणाऱ्या साड्या दिसतात. हातावर ओघळणारे पदर दिसतात. कधी स्कर्टसारखे दिसणारे कपडेही दिसतात. कमरेला बांधलेला कमरबंद दिसतो. मेखला दिसते तसेच स्कार्फचाही सुंदर उपयोग केलेला दिसतो. एकूण शिवण कामाची कला बरीच विकसित झालेली दिसते.

२६. सूत्रक्रीडा

हा शब्द संस्कृती कोशात सूत्रकर्म असा घेतला आहे व त्याचा अर्थ वेलबुट्टी काढणे, रफू करणे असा दिला आहे. महाराष्ट्र शब्दकोशामध्ये सूत्रक्रीडा या शब्दाचा अर्थ बाहुल्या नाचविणे. भोवरे फिरवणे असा दिला आहे. आपल्या देशात फार प्राचीन काळापासून कळसूत्री बाहुल्यांचा खेळ प्रचलित आहे. या कलेचा सर्वप्रथम उल्लेख महाभारतात सापडतो. (महा. उद्योगपर्व ३२.१३) ''कळसूत्री बाहुली ज्याप्रमाणे सूत्रधाराच्या इच्छेनुसार हालचाल करते त्याप्रमाणे मनुष्य ईश्वरेच्छेनुसार हालचाल करतो'' पंचतंत्रांत 'काष्ठचित्रक्रीडनक'. असा शब्द कळसूत्री बाहुलीला उद्देशून आला आहे. श्रीहर्षाच्या नैषधीय चरितात नलराजाच्या प्रमोदभवनात नित्य कळसूत्री बाहुल्यांचा नाच होत असे व सूत्रधार भिंतीच्या आड बसून बाहुल्या नाचवीत असे असा उल्लेख आहे. या खेळाच्या उगमाविषयी व स्वरूपाविषयी विद्वानांत मतभेद आहेत. कळसूत्री बाहुल्यांच्या खेळातला सूत्रधार जे कार्य करतो तेच कार्य लाक्षणिक अर्थाने नाट्यकथासूत्र सांभाळणारा सूत्रधार भरताच्या नाट्यशास्त्रात सापडतो.

यांत्रिक हालचाली करणाऱ्या बाहुल्यांचा उल्लेख कथासरित्सागरात आला आहे. त्या गोष्टीत मयासुर नावाच्या शिल्पकाराने तयार केलेल्या यांत्रिक बाहुल्यांच्या पेटीचा उल्लेख येतो. प्रत्येक बाहुलीत एक कळ होती ती कळ दाबली की बाहुली आकाशात उडून फुलांचा हार घेऊन खाली येई. दुसरी पाणी आणी, तिसरी नाच करी व चौथी आवाज काढी. या कळसूत्री बाहुल्या मिळाल्यावर राजकन्या कलिंगसेना खेळण्यात दंग झाली असा उल्लेख आहे. राजशेखराने 'बालरामायण' हे कळसूत्री भावल्या रंगभूमीवर आणणारे नाटक लिहिले.

कळसूत्री बाहुल्यांचे अवयव हव्या त्या दिशेला फिरविता यावे म्हणून त्यांच्या अंगातून तारा नेलेल्या असतात. या तारांनाच कळसूत्र म्हणतात. ते हाती घेऊनच सूत्रधार बाहुल्यांना विविध प्रकारे नाचवीत असतो.

भारतात आजही राजस्थान, माळवा, सौराष्ट्र, महाराष्ट्र व केरळ, बंगाल या प्रांतात कळसूत्री बाहुल्यांची परंपरा विद्यमान आहे. भारताच्या बाहेर पूर्वेकडील देशात जे स्वरूप दिसते ते भारतीय परंपरेला धरूनच आहे. पाश्चिमात्य देशात आधुनिक यंत्रविद्येची जोड देऊन कळसूत्री बाहुल्यांचे प्रयोग मोठमोठ्या नाट्यगृहातही दाखवितात.

उत्तर प्रदेशात कळसूत्री बाहुलीला कठपुतळी म्हणतात. याचा अर्थ लाकडी बाहुली असा आहे. ही कठपुतळी बनविताना लाकडाबरोबरच कापड व चामडे याचा उपयोग करतात. या बाहुल्या उंच असतात. ज्या प्रकारचे कथानक असेल त्याप्रमाणे या कठपुतळ्यांची वेशभूषा करतात. गोल चेहरा, मासळीच्या आकाराचे डोळे, रेखीव भुवया, आकर्ण ओठ अशी त्यांची मुखाकृती असते. प्रत्येक पुतळीच्या मागे सूत्र बांधण्यासाठी कडी असते. जोधपूरच्या कठपुतळ्या पौराणिक किंवा ऐतिहासिक व्यक्तित्वाला अनुरूप अशा उंच ठेंगू, नाजूक वा भयानक असतात. दक्षिणेतील पुतळ्यांची बनावट दाक्षिणात्य ढंगाची असते. ज्या प्रदेशात या कठपुतळ्या बनवितात त्या प्रदेशातील वेषभूषा त्यांच्या अंगावर चढवली जाते.

बाहुल्यांचा खेळ दाखविणारा सूत्रधार त्यासाठी एक रंगमंच बनवितो. त्याच्यामागे एक चारपाई ठेवून तिच्यावर बसतो. प्रेक्षक समोर बसून खेळ पाहतात. कित्येकदा या खेळासाठी खांब, महिरपी उभारून मोगली दरबारासारखा दरबार केला जातो दरबारचे छत खुले असते व तिथल्या आढ्यावर बसून सूत्रधार आपल्या बाहुल्यांना वरून खाली उतरवितो व बोटांच्या कुशल हालचालीने त्यांना नाचवितो. राजस्थानी पद्धतीत सूत्रधार सूत्रांच्या साहाय्याने रंगमंचाच्या वर बसून बाहुल्या नाचवितो. प्रथम एक माणूस ढोलके वाजवून खेळ सुरू झाल्याची सूचना देतो. एक बाहुली येऊन रंगमंच झाडण्याचा अभिनय करते. मग एकामागून एक बाहुल्या येतात. सूत्रधार रंगमंचाच्या मागे उभे राहून सूत्रचालन करतो व दुसरा माणूस ढोलकीच्या साथीवर कथा-गीत गातो. धार्मिक ऐतिहासिक कथासूत्रे असतात. दाक्षिणात्य पद्धतीत बाहुल्या मोठ्या असून, सूत्रधार खाली बसून लांब काठ्यांच्या द्वारे त्यांचे संचालन करतो. तिथे रंगभूमीवर पडदा असून बाहुल्यांचे संचालन पडद्यामागे होते. प्रेक्षकांना बाहुल्या न दिसता पडद्यावर त्यांच्या छाया दिसतात. या खेळाला केरळामध्ये पवाकूतु असे म्हणतात. पवाकूतुमध्ये रामायण महाभारतातील आख्यानेच विशेषकरून दाखवितात. हे खेळ तिकडच्या मंदिरातून वंशपरंपरेने करतात. त्यांना त्यासाठी देवालयातून बिदागी मिळते. कित्येकदा या खेळांसाठी देवालयात स्वतंत्र दालन असते. आंध्रात या खेळाला टोलुबोम्मलाटा म्हणतात.



महाराष्ट्रात रंगभूमीचे जनक विष्णुदास भावे यांनी कळसूत्री भावल्यांच्या साहाय्याने प्रथम सीतास्वयंवर नाटक केले असा उल्लेख आहे.

वात्स्यायनाच्या कामसूत्रावरील जयमंगला टीकेच्या अनुसार सूत्रक्रीडा याचा अर्थ हातातील सुताने पशु-पक्षी, मंदिर, घर यांच्या आकृत्या काढणे असा होतो.

२७. वीणाडमरूकवाद्यानि

वीणाडमरूवाद्यानि म्हणजे वीणा, डमरू इत्यादी वाद्ये वाजविणे.

अगदी प्राचीन काळापासून अत्यंत लोकप्रिय असणारे हे सर्वश्रेष्ठ तंतुवाद्य होय.

ऋग्वेदात काही ठिकाणी वाण नाम वाद्याचा उल्लेख आहे व सायणाचार्याने त्याचा अर्थ मरुद्वीणा असा दिला आहे. मरूत् देव वीणा वाजवत असे ऋग्वेदात वर्णन आहे. ही वीणा शंभर तारांची (शततंत्री) असून तारा मुंज नावाच्या गवतापासून बनवत. यज्ञाच्या वेळी सामगायनाला वीणेची साथ असे. वीणावादन करणाऱ्याला वीणावाद म्हटले आहे.

ब्राह्मण ग्रंथात गोधा, काण्डमयी, पिच्छोरा वक्रा, अलाबू वगैरे वीणाप्रकारांचा उल्लेख येतो. घोरपडीच्या कातड्याने मढवलेली ती गोधा, बांबूची कांडे जोडून तयार केलेली - काण्डवीणा, भोपळा असलेली वीणा म्हणजे अलाबू असे काव्यायन श्रौतसूत्राच या भाष्यकाराने स्पष्ट केले आहे.



रामायणात लवकुशांनी वीणेच्या साथीवर रामायण गायले असा उल्लेख आहे. पार्वतीला शुभ्र चांदण्यात पुष्पशय्येवर शयन करताना महादेवाने पाहिले व रुद्रवीणा निर्माण केली अशी दंतकथा आहे.

दक्षिणेतील सरस्वतीवीणेचा आविष्कार सरस्वतीने केला असे मानले जाते.

भरताच्या नाट्यशास्त्रात चित्रा व विपंची हे वीणेचे मुख्य प्रकार सांगितले आहे. या वक्राकार वीणा असून त्यांना सात तारा असत. विपंची क्वचित नऊ तारांचीही असे. चित्रा ही वीणा बोटांनी वाजवायची असून विपंची कोणाने वाजवायची असे भरताने सांगितले आहे. नाट्यशास्त्राचे टीकाकार अभिनवगुप्त व शारङ्देव यांनी नाट्यशास्त्रातील मुख्य वीणा २१ तारांची मानली असून तीस मत्तकोकिळा हे नाव दिले आहे. कच्छपी वीणेला पडदे नसत. घोषा ही वीणा एका तारेची असावी. वीणेचे किन्नरी (एक लोकवाद्य) आलापिनी, पिनाकी विचित्रवीणा, व कछवा हेही प्रकार आहेत.

उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय वीणेत थोडासा फरक आहे. उत्तर भारतीय वीणा म्हणजे नारदीय वीणा व दक्षिण भारतात सरस्वती वीणा प्रचलित आहे. सरस्वती वीणेची

रचना साधी, स्वर अधिक तीव्र असतात. उत्तर भारतीय वीणेची रचना क्लिष्ट असली तरी तिचे स्वर अत्यंत कोमल असतात.

भारतीय संगीतशास्त्रज्ञांनी वीणेला साक्षात् सरस्वतीच मानले आहे त्यामुळे तिची साधना पवित्र वातावरणात करण्याची प्रथा आहे. संगीत सभेतील वीणावादनही विधिपूर्वक केले जाते. मध्ययुगात तानसेनाचे घराणे, त्याचे दौहित्र घराणे व मेवाती घराणे ही तीन वीणावादनासाठी विशेष प्रसिद्ध होती. सांची, बारहुत, पितळखोटे, अमरावती, वेरूळ, बदामी वगैरे ठिकाणी असलेल्या शिल्पात वीणेची निरनिराळी रूपे पाहायला मिळतात कित्येक कथांमधून, नाटकांमधून वीणावादनाचे प्रसंग वर्णिलेले आहेत.

डमरू :

हे चर्मवाद्य असून हे शिवाचे वाद्य मानले जाते. माहेश्वरसूत्रे शिवाच्या डमरूनादातूनच उद्भवली असे मानतात. डमरू हे शब्दब्रह्माचे प्रतीक असून शिवाने आपल्या तांडवनृत्याच्या प्रसंगी या वाद्याची निर्मिती केली व संगीत शास्त्रातील तालाचे उगमस्थान डमरूच्या नादात आहे असे संगीतशास्त्रज्ञांचे मत आहे. सर्व चर्मवाद्ये डमरूतूनच उत्क्रांती झाली असावीत. हे वाद्य वीतभर लांब असून दोन्ही तोंडांचा व्यास आठ-आठ अंगुळे असतो. दोन्ही वर्तुळाकार तोंडावर लोखंडी कडी बसवून त्यावर चामडे ताणून बसविलेले असते. डमरूचा मध्यभाग सिंहकटीप्रमाणे असतो. दोन्ही तोंडावर चढविलेल्या चामड्याच्या कड्यांतून ओवून घेतलेल्या सुताच्या दोरीच्या वेढ्यांना मध्यभागी दुसऱ्या एका दोरीने आवळून बांधलेले असते. मध्यभागी दोन लोंबत्या दोऱ्या असून त्यांच्या टोकांना मेण व माती यांच्या गोळ्या बांधलेल्या असतात. अशा या डमरूचा निमुळता भाग हातात धरून ड घ वर्ण वाजवावा किंवा क ख र ट हे वर्ण वाजवावे असे काहीजण म्हणतात. उदुक्कू, निदक्कू, बुदबुद्क ही डमरूचीच अन्य रूपे आहेत. कापालिक शैवांच्या हाती डमरू असते. माकडवाले आणि गारूडी खेळांच्या वेळी डमरू वाजवून माणसे गोळा करतात. शैव वाङ्मयात डमरूच्या नादाने प्रभावित झालेल्या वातावरणाची अनेक वर्णने येतात.



महाराष्ट्रातील भराडी लोक भैरवाचे उपासक असतात ते डाव्या हातात डमरू (डौर) धरून उजव्या बोटाने ते वाजवतात. नेपाळमध्ये डमरू (डंफु) च्या साथीने केले जाणारे डंफुनृत्य प्रसिद्ध आहे. अशी वीणा व डमरू वाजविणे ही एक कला मानली आहे.

२८. प्रहेलिका

मराठीत याला उखाणा म्हणतात. ह्याची बैठक केवळ धार्मिक आणि सांस्कृतिकच नाही तर तो एक साहित्यप्रकारही समजला जातो. याने ज्ञान व मनोरंजन होते. उखाण्याला आहाणा, कोहाडा, उमान किंवा उमाण हे प्रतिशब्द आहेत. हिंदीत यास पहेली म्हणतात. बंगालीत द्यामघा, कानडीत आंगणु, तेलगुत विडिकथ, व तामीळ व मल्याळममध्ये विडिकदाई असे म्हणतात.

ब्रह्मदेवाने आपल्या कन्येशीच संभोग केला, त्याच्या निषेधार्थ त्याच्या 'अगुणांचे' वर्णन सुरू झाले त्यातूनच उखाण्यांची म्हणजे प्रहेलिकांची उत्पत्ती झाली असे मानतात. ब्रह्मदेवाच्या पूजेचा निषेध भारतात सार्वत्रिक आहे. लग्नाच्या उखाण्यांतली अश्लीलता यातूनच पुढे आली असे दुर्गा भागवत सांगतात.

प्रश्न व उत्तर या दोहोतून उखाणा बनतो. प्रश्नात रूपकाच्या आश्रयाने एखादी गोष्ट लपविली जाते व उत्तरात तिचा गौप्यस्फोट होतो. गोपन हा उखाण्याचा प्राण आहे. कोणत्याही साहित्य प्रकारापेक्षा उखाण्यात कल्पकता अधिक आढळते. मनोरंजक उखाणे सोडले तर बाकीचे उखाणे महत्त्वाच्या प्रसंगी वापरायचे असतात असा प्राचीन काळापासून संकेत आहे.

पावसाचे येणे-जाणे, लग्नादी संस्कार व मर्तिक, शेतीची लावणी हे मानवी जीवनातले महत्त्वाचे प्रसंग असून त्या प्रसंगी उखाणे घालणे ही प्रथा जगभर आहे. भारतातला उखाणा वेदकालापासून आढळतो. ''सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वोवहति सप्तनामा । त्रिनाभि चक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः ॥ (ऋ १.१६४.२)

अर्थ : सात पुरोहित यज्ञाच्या योगाने सूर्याचा रथ चालवितात हा रथ सात घोडे चालवितात. सूर्यरथाच्या चाकाला ऋतूंच्या तीन अऱ्या आहेत व या ऋतुचक्रात सारे प्राणी जगतात.

सुक्या विहिरीत पाखरे फडफडतात.

हा कढई व लाह्या ह्यांच्यावरचा उखाणा आहे.

घमघम घमाटा सोन्याची घंटा
विषाचा कांटा आत गोड गोटा

हा फणस व त्याचे गोड गरे यावर उखाणा आहे. उखाण्यात ग्राम्यता व अश्लीलताही खूपदा

आढळते. नाव घेण्याचे उखाणे हे प्रश्नविरहित उखाण्यांचे उत्तम उदाहरण आहे. यात केवळ गोपनक्रिया असते.

बायकोने नवऱ्याचे किंवा नवऱ्याने बायकोचे नाव घेऊ नये हा संकेत भारतभर आहे. असे नाव घेतले की त्या व्यक्तीचे आयुष्य कमी होते असा संकेत आहे. पण महाराष्ट्रात व कर्नाटकात लग्नप्रसंगी पत्नीने पतीचे व पतीने पत्नीचे नाव घेण्याची पद्धत आहे. मात्र ते असेच न घेता उखाण्यात गुंफून घ्यायचे असते. शब्दांच्या अवडंबरात गुंफून नाव घेतल्यामुळे मृत्यूच्या कानावर ते पडत नाही अशी समजूत आहे. नाव गुप्त राखणे हा आदिम संस्कृतीचा विशेष व अवशेषही आहे.

भारतभरचे लग्नविधी पाहिले तर सांकेतिक अश्लीलता शिवराळपणा व भांडकुदळपणा हे प्रकार सर्वत्र आढळतात. मध्यप्रदेशात या प्रकाराला 'भडौनि' असेच म्हणतात. लग्नात असे अनेक अश्लील, बोचक उखाणे घालून विहिणी व करवल्या यांची एकमेकांवर तोंडसुख घेण्याची स्पर्धाच लागते.

उदा. नवरा नवरी सुताएवढी,
नवऱ्याची आई भुताएवढी.

झिम्मा, फुगडी वगैरे खेळतानाही मुली एकमेकांना उखाणे घालतात. अशा प्रकारच्या उखाण्यातून एकमेकींची उणीदुणी काढली जातात.

चेष्टेचे व उपहासाचे महार समाजातले उखाणेही मनोरंजक असतात, उदा.

अशी लेक साळ्याची
भाकरी खाईना टाळ्याची
कांदा खाईना पातीचा
नवरा मागते जातीचा वगैरे ....

अशा प्रकारे उखाण्यात गोपनीयता, कल्पकता, बुद्धीची चमक असल्यामुळे एक कलाच मानली गेली आहे.

२९. प्रतिमाला

प्रतिमाला म्हणजे भेंड्या लावणे - यास अंत्याक्षरी असेही म्हणतात. अंत्य-अक्षर म्हणजे कुठल्याही शब्दाचे किंवा पदाचे अंतिम अक्षर, आणि अंत्याक्षरी म्हणजे कुणीतरी सुरू केलेल्या पद्याचे किंवा श्लोकाचे शेवटचे अक्षर घेऊन - त्यावरून नवीन पद्य सुरू करणे. ह्यात स्मरणशक्तीची तसेच समयसूचक हजरजबाबीपणाचीही कसोटी लागते. आजतागायत जनसामान्यांचा हा मनोरंजनाचा प्रकार आहे.



३०. दुर्वाचक योग

दुर्वाच्य म्हणजे जे शब्द उच्चारण करायला किंवा अर्थ समजायला कठीण असतात. ते मनोरंजनासाठी किंवा वादविवाद करताना वापरतात. महाकवी दुःखभंजन शतघटिक याचा एक दुर्वाचक योग श्लोक आहे ज्याचा अर्थ लावणे साधारण बुद्धीचे काम नाही. तो श्लोक असा आहे.

फाचैवैज्येआश्राभाआकामापौमा चैव।

इथे फा म्हणजे फाल्गुनपासून मा म्हणजे मार्गशीर्षपर्यंत बारा महिने सांगितले आहेत. यातही कल्पकता, बुद्धिमत्ता यांचा कस लागल्यामुळे ही एक कला मानली आहे.



३१. पुस्तकवाचनं

भरताच्या नाट्यशास्त्राचे किंवा शृंगारिक काव्ये असतील तर रसोत्पत्ती करेल असे सुरेल वाचन करणे. त्यातील भावाला अनुसरून वाचन केल्याने श्रोत्याला ते जाऊन भिडते, रसनिष्पत्ती होते. आजही काव्यवाचन किंवा नाटकाचे वाचन तसेच कथाकथन हे प्रकार अतिशय लोकप्रिय आहेत. शिवाजीराव भोसल्यांच्या किंवा बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या सुरेल रसनिष्पत्ती करणाऱ्या व्याख्यानांनाही लोक तुडुंब गर्दी करतात. वात्स्यायनाच्या काळीही हा मनोविनोदनाचा प्रकार कला म्हणून मानला गेला.

३२. नाटकाख्यायिकादर्शनम्

वात्स्यायनाच्या कामसूत्रांवरील जयमंगला टीकेत याचा अर्थ नाटकांचे व ऐतिहासिक गोष्टींचे ज्ञान असा दिला आहे व महाराष्ट्र शब्दकोशात दर्शन याचा अर्थ नाटके, प्रहसने करून दाखविणे असा दिला आहे. गोष्टींचे ज्ञान असणे यापेक्षा ती करून दाखविणे यात कलेचा भाग जास्त येतो. भरत म्हणतो,

त्रैगुण्योद्भव लोकचरितं नानारसं दृश्यते।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥

म्हणजे नाट्यात सत्त्व, रज, आणि तम या तीन गुणांतून उद्भवणारे आणि नाना रसांनी युक्त असे लोकव्यवहार दिसतात आणि त्यामुळे नाट्य हे वेगवेगळ्या आवडी असणाऱ्या लोकांचे एकमेव मनोरंजनाचे साधन ठरते. सर्वसाधारण प्रेक्षकांना आनंदाची उपलब्धी करून देणे हे नाट्याचे प्रयोजन आहे. केवळ मनोरंजन हेच नाटकाचे प्रयोजन नव्हे तर धर्म आणि यश यांना धरून असले पाहिजे. चतुर्विध पुरुषार्थाचे साधक असले पाहिजे. वात्स्यायनाच्या कामसूत्रात गीतं वाद्यं नृत्यं ह्या तीन कला झाल्यावर चौथे आलेख्य म्हणजे चित्रकला सांगितली आहे. नाट्याचा इथे उल्लेख नाही पण संस्कृती कोशात व महाराष्ट्र शब्दकोशात नाट्य हे चौथ्या स्थानावर सांगितले आहे. त्यामुळे परत नाटकाख्यायिका दर्शनमध्ये नाटकाची पुनरावृत्ती होते असे वाटते. मूळ चौसष्ट कलात नाट्य हे याच ३२ व्या कलेच्या स्थानी धरणे इष्ट वाटते.

नाटक हा दृकृश्राव्य मनोरंजनाचा प्रकार आहे. पाणिनीने हा शब्द नट् = नाचणे, अभिनय करणे या धातूवरून मानला आहे. भरताने नाट्यशास्त्रात नाटकाचा अर्थ 'नटाची अभिनयकला' असा केला आहे. तो म्हणतो, नाट्य हे त्रैलोक्यातील भावभावनांचे अनुकीर्तन म्हणजेच अनुकरणात्मक प्रकटीकरण होय. (नाट्यं भावानुकीर्तनं ना.शा. १.१०६) नाटकाला दृश्यकाव्यही म्हणतात.



नाटक हा असा साहित्य प्रकार आहे, ज्याचे मूल्यमापन रंगभूमीवर होते. रंगभूमी ही कालमानाप्रमाणे बदलते. लोकांची अभिरुची, तत्कालीन आर्थिक परिस्थिती यांच्यावर रंगभूमीची निर्मिती होत असते.

त्यामुळे नाटकाचे स्वरूपही सारखे बदलत राहते.

प्राचीन संस्कृत नाटकांचे प्रयोग बहुतेक राजवाड्यातच होत. राजांची प्रेमप्रकरणे, पराक्रम हेच नाटकाचे विषय असत. शृंगार, वीर या रसांचाच तिथे परिपोष असे.

पण राजप्रासादाच्या बाहेरही नाट्य फुलत होते पण ते बहुधा नृत्यात्मक होते. जत्रा, उत्सव, सार्वजनिक यात्रा अशा प्रसंगी त्यांचे प्रयोग होत आणि समाजातील सर्व थरांतील जनता ते नृत्यनाट्य - मोठ्या आवडीने पाहत. त्यामुळे भरताने त्यांना नाट्य शास्त्रात स्थान दिले व रूपकांचे दहा प्रकार सांगितले :

(१) नाटक (२) प्रकरण (३) भाण (४) व्यायोग (५) समवकार (६) डिम (७) ईहामृग (८) अंक (९) वीथी (१०) प्रहसन.

१८ उपरूपकेही सांगितली आहेत. असे एकूण नाटकाचे २८ प्रकार होतात.

(१) नाटक : ही अशी साहित्यरचना आहे ज्याच्यात काही घटना असते व तिचे असे वर्णन असते की तिचा रंगमंचावर सहज अभिनय होऊ शकेल.

(२) प्रकरण : यामध्ये नाटकाचे कथानक कल्पित असते. प्रख्यात असत नाही. येथे नायक धीट व शांत असतो.
नायिका चांगल्या कुळातील स्त्री किंवा वेश्याही असू शकते.

(३) भाण - हे हास्यरसप्रधान असते. त्यात एकच पात्र असते आणि जे आकाशवाणीसारख्या गोष्टींच्या साहाय्याने कल्पित व्यक्तीशी संभाषण करते.

(४) व्यायोग - या प्रकारात स्त्री पात्रांची संख्या कमी असून पुरुष पात्रांची अधिक असते. यामध्ये रूपकामधले गर्भ, विमर्ष, संधी ही अंगे नसतात.



(५) समवकार - यामध्ये तीन अंक असून देवदानवामधल्या संग्रामाचा उल्लेख असणारे वीररसपूर्ण कथानक असते.

(६) डिम - अशा प्रकारच्या नाटचप्रकारात इंद्रजाल, रागाने बेभान

होणे, लढाई अशी दृश्ये असतात.

(७) ईहामृग - हे चार अंकांचे रूपक असून देव - देवी हे नायक, नायिका असतात आणि मुख्यतः नायिकेचे शौर्य दाखविलेले असते.

(८) अंक - यांत कधी सर्वश्रुत कधी अनोळखी कथानक असते. यात देवदेवता नसून सामान्य माणसाचेच कथानक असते. पुष्कळदा करुण रसप्रधान कथानक असून स्त्रियांचा आक्रोश अधिक असतो.

(९) वीथी - यात एकच अंक असून तो शृंगारप्रधान असतो. यामध्ये एक ते तीन पात्रे असतात. प्राचीन काळी असे अंक दुसऱ्या नाटकांच्या बरोबरीने अगर स्वतंत्रपणेही खेळवले जात.

(१०) प्रहसन - हे हास्य रसप्रधान असते. यात एक, दोन किंवा अनेक पात्रे असतात. कविकल्पित विषय असून समाजातील हीन व वाईट प्रवृत्तींची यात खिल्ली उडवलेली असते.

या नाटकांच्या दहा प्रकारांकडे पाहिले तर असे दिसते की यातील डिम हा प्रकार पारसी रंगभूमीवरील चमत्कृतीपूर्ण कथानकांमध्ये हाताळला गेला. मराठी रंगभूमीचे जनक विष्णुपंत भावे यांनी तत्कालीन सांगलीचे राजे पटवर्धन यांच्या सांगण्यावरून दाक्षिणात्य नाटकापेक्षा कलापूर्ण नाट्य मराठीत तयार करावे म्हणून सीतास्वयंवर नाटक लिहिले. त्याचा पहिला प्रयोग सांगलीत १८४३ मध्ये झाला व अशा रितीने मराठी रंगभूमीचा जन्म झाला. त्यापुढे झालेल्या किर्लोस्कर, देवल, खाडिलकर वगैरे मंडळींनी रूपकाचे अनेक प्रकार हाताळलेले दिसतात.

एक काळ असा होता की भव्यदिव्य नेपथ्य आणि वेशभूषा हा संगीत रंगभूमीचा प्राण होता. पडद्याला टाळी पडण्याचे फार महत्त्व होते. रात्री सुरू होऊन पहाटेपर्यंत नाटके चालत आणि काळानुसार ह्यात बदल होत होत आज जेमतेम दोन तास चालणारी, कित्येकदा



३३. काव्यसमस्यापूरणं

चौसष्ट कलांपैकी दोन तृतीयांश कला ह्या बौद्धिक व साहित्यिक आहेत. काव्यशास्त्रविनोदामध्ये विद्वान लोक, कवी, भाट, गायक, विदूषक, इतिहासतज्ज्ञ, कथा-पुराणे जाणणारे ह्या सात प्रकारचे लोक भाग घेत. ह्या भल्या लोकांच्या सभेत खेळ आणि विद्या यांना मान होता. सुजाण, सुविद्य नागरिक संगीतसभा, काव्यसभा, इतिहास, पुराण, आख्यान, सभा वगैरेमध्ये भाग घेत.

पदगोष्टी या सभेत काव्याचे चरण पूर्ण करणे ह्यासारख्या बुद्धीला आव्हान देणाऱ्या समस्या असत. कधी अक्षर, कधी मात्रा, कधी चरण तयार करून काव्य पूर्ण करणे आवश्यक असायचे.

मनोविनोदनासाठी समस्या क्रीडा असत. ह्या सामुदायिकरित्या खेळल्या जात. त्यामध्ये ज्या काव्यक्रीडा असत त्यामध्ये प्रतिमाला म्हणजेच भेंड्या लावणे, दुर्वाचनयोग म्हणजे काव्यात अशा कठीण शब्दांची योजना करायची की ती पटकन वाचता येणार नाही किंवा ज्यांचा अर्थ सहज समजणार नाही अशा समस्या असत.

३४. पट्टिकावानवेत्र विकल्प

संस्कृतीकोशात याचा अर्थ नेवार किंवा वेत यांची वाज विणणे असा दिला आहे. वेताच्या वस्तू तयार करणे असा दिला आहे. हजारो वर्षांपासून आपल्या देशात बांबूच्या पातळ पट्ट्या कापून त्या वेताने करंड्या, चटया, पलंग, पिंजरे, चाळण्या, सुपे वगैरे विणले जात असे. वेताचे काम करणारे बहुतेक आदिवासी असून महाराष्ट्रात त्यांना बुरूड म्हणतात. उत्तरेकडे वांसफोड म्हणतात. ते वगेवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातात. हे विणकर वेतापासून स्वस्त, टिकाऊ टोपल्या, पाट्या विणतात. ज्यातून दैनंदिन वस्तूंची सहज ने-आण होऊ शकते. ब्रिटिशांनी तर काश्मिर खोऱ्यात बांबूची वने लावली व वेताच्या वस्तू तयार करण्यास शिकविणारी संस्थाही काढली आणि पाश्चात्य संस्कृतीत बसणाऱ्या वस्तू म्हणजे लँपशेड्स, ट्रे, गार्डन चेअर्स वगैरे वस्तूही वेतापासून बनविल्या जाऊ लागल्या. दक्षिणेकडे वेताबरोबरच नारळाच्या झावळ्याही या कामी वापरतात त्यापासून नुसत्या खाटाच नव्हे तर खोपटाच्या भिंतीही बनतात हे सर्व एकसंधपणे विणून मजबूत वस्तू तयार करणे ही कला आहे.

३५. तक्षकर्माणि

सोन्याचांदीचे दागिने तसेच भांडी यावर करायची मीनाकारी. ही कला मुघलांकडून भारतात आली. सोन्याचांदीच्या पृष्ठभागी खळगे पाडून त्यात रंग भरले जातात व एक प्रकारचा काचेचा मुलामा दिला जातो. निळ्या रंगासाठी कॉबाल्ट ऑक्साइड वापरला जातो. हिरवा लाल खनिज रंगही वापरतात. तो अशा प्रकारे खळग्यात जातो की बारीक सोन्याची किंवा चांदीची किनार त्याच्या विविध कणांना वेगळे करते व सुंदर नक्षी तयार होते. उत्तरेकडील वधूंचे असे मीनाकारीचे दागिने म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण असते. बनारस प्रांतात तर गोळ वळ्यांवर गळ्यातल्या कंठ्यावर मीनाकारी केलेली आढळते.



३६. तक्षणम्

तक्षणम् - तक्ष् - म्हणजे सुतारकाम करणे. सुतारांना सूत्रधार, सुतार, वाडिग, थवी, बढई अशी स्थानपरत्वे नावे आहेत. यांचा व्यवसाय वंशपरंपरागत असून ते गाड्या, नांगर, शेतीचे व इतर अवजारे तयार करतात. खेडेगावात ते पूर्वी बारा बलुतेदारांपैकी एक असत. शहरातले सुतार घरे-दुकाने बांधतात, निरनिराळ्या प्रकारचे सजावटी सामान तयार करतात. काही सुतार गलबतेही बांधतात.

स्थूलमानाने लाकूड कामाला सुतारकाम म्हणतात. अश्मयुगातील माणसाने भटके जीवन सोडले, गुहांतून राहणे सोडले, नदीकाठी किंवा जलाशयाजवळ राहू लागला त्या वेळी त्याला लाकडाचा उपयोग समजला असला पाहिजे. सिंधुसंस्कृतीत सुतारकामासंबंधीचे बरेच पुरावे हाती येतात. वैदिक वाङ्मयात सुतार, सुतारकाम यांचे भरपूर उल्लेख येतात. अथर्ववेदात अनेक लाकडी खांबाच्या घराचा उल्लेख येतो. लाकडाचा बुंधा कोरून नावा तयार करण्यात आल्या. त्या चालविण्यासाठी वल्ह्यांचा उपयोग होई. ऋग्वेदात शंभर वल्ह्यांच्या नावांचा उल्लेख आहे. ब्राह्मण ग्रंथाच्या काळात यज्ञीय उपकरणेही वेगवेगळ्या लाकडापासून बनवीत. अनेक राजप्रासाद व मंदिरेही लाकडाची बनत. रामायण महाभारतात हे उल्लेख सापडतात. आजही केरळात तसेच हिमालयातील चंबा भागात लाकडी मंदिरे आढळतात. काष्ठमूर्ती, बाहुल्या ह्याही सुतारकामात येतात. कळसूत्री बाहुल्या त्याचप्रमाणे छायानाट्यासाठी लागणाऱ्या बाहुल्या लाकडी असत. गृहरचनेत सुतारकामाचा फार मोठा वाटा असतो. घरांचे खांब, तुळ्या, सज्जे, चौकटी, दरवाजे हे सर्व सुतारकामात येते व या प्रश्नांचा विचार वास्तुशास्त्रात केलेला दिसतो.



तसेच तुळ्यांच्या दर्शनी भागावर लाकडात वेलबुट्या काढणे, नक्षीकाम करणे, नक्षीचे छत करणे, उत्तम जाळ्या बनविणे हेही कलापूर्ण काम होते.

३७. वास्तुविद्या

वस् = राहणे या धातूपासून वास्तू हा शब्द येतो. वास्तुविद्या म्हणजे गृहनिर्माण कला किंवा गृहरचना-शास्त्र होय. प्राचीनकाळी वास्तू या शब्दाचा अर्थ निवासस्थान एवढाच होता. परंतु त्यानंतरच्या वास्तुशास्त्रविषयक ग्रंथांत संपूर्ण शिल्पशास्त्राला वास्तुशास्त्र म्हटले आहे. वास्तुविद्या म्हणजे गृहे, मंदिरे, प्रासाद, तट, मनोरे, बुरूज, किल्ले, तलाव, विहिरी, कालवे, स्तूप, विजयस्तंभ इत्यादी बांधण्याचे शास्त्र होय. वेदकाळी वास्तुरचना हे धार्मिक कृत्य मानले जाई. वास्तोष्पती ही वास्तूची अधिष्ठात्री देवता असून गृहरचनेच्या वेळी तिला आवाहन करीत. ऋग्वेद काळातील घरे चांगल्या पद्धतीने बांधलेली, मोठी व सुखसोयींनी युक्त अशी निवासस्थाने होती. गृहरचनेच्यां वेळी म्हणावयाची काही सूक्ते अथर्ववेदात आहेत व त्यात वास्तुशास्त्रातील अनेक पारिभाषिक शब्द येतात. जमीन कशी असावी, मुख्य स्तंभ कुठे उभा करावा, निरनिराळ्या खोल्यांची रचना कशी असावी, घरातील दारे कुठे असावीत, घराभोवती झाडे लावताना कोणते झाड कोणत्या दिशेला असावे किंवा लावू नये याचे नियमही येतात. रामायणकाळी वास्तुशास्त्रज्ञांना खूप मान होता. मय व विश्वकर्मा हे प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ होते. वास्तुशास्त्राच्या दक्षिण भारतीय व उत्तर भारतीय अशा दोन पद्धती असून, दक्षिण भारतीय पद्धतीचे प्रवर्तक ब्रह्मा, त्वष्टा, मय वगैरे आहेत तर उत्तर भारतीय पद्धतीचा प्रवर्तक मानसार हा होता.



देवतांची मंदिरे प्रथम गुप्तकाळात निर्माण झाली. इ.स. १३व्या शतकाच्या आरंभी दिल्लीवर मुसलमानी अंमल सुरू झाल्यावर या देशात मुस्लिम वास्तूंची निर्मिती सुरू झाली. पहिल्या शंभर-सव्वाशे वर्षांत खूप नक्षीकाम केलेल्या सुंदर इमारती निर्माण झाल्या. दक्षिणेकडे आदिलशाहीत राज्यातले अधिकारी इराणी होते. विजापूरचा प्रचंड गोलघुमट या पद्धतीच्या शिल्पाकृतींचे उत्तम उदाहरण आहे. दिल्लीवर प्रथम सत्ता स्थापन करणाऱ्या सुलतानांनी इथल्याच कारागिरांकडून मशिदी व मकबरे बांधून घेतले. त्यामुळे सारासेनिक म्हणून ओळखली जाणारी वास्तुशिल्पे काही अंशी हिंदू वाटतात. नंतरची मुस्लिम रचनापद्धती वेगळी असून मिहराब व घुमट ही मुस्लिम वास्तुकलेची प्रमुख अंगे मानली जातात. नंतर ब्रिटिश अमदानीत गॉथिक रोमन अशी वेगळ्या प्रकारची वास्तुकला आली. आजच्या काळात आपण परत वास्तुशास्त्राच्या अभ्यासाकडे वळलेलो दिसतो.

३८. रूप्यरत्नपरीक्षा

रूपे हा खनिज धातू असून रूप्याचा रंग शुभ्र असून ते प्रसरणशील, लवचीक, उष्णतावाहक व विद्युतवाहक असते. त्याचा नाद मधुर असतो. रूप्याचा रूक्म किंवा रजत असा उल्लेख तैत्तिरिय संहिता व अथर्ववेदात आला आहे. मराठी भाषेत अशुद्ध चांदीला रूपे म्हणतात. दृष्ट लागू नये म्हणून चांदीचे वाळे, तोरड्या, बांगड्या, माळा घालण्याची पद्धती होती. प्रकाशमान कठीण वस्तू म्हणजे रत्न होय. रत्नाला संस्कृतात मणी असेही नाव आहे. रत्ने खाणीतून, भूगर्भातून निघतात. म्हणून पृथ्वीला रत्नगर्भा म्हणतात. रत्नांचे महारत्ने व उपरत्ने असे दोन वर्ग आहेत. हिरा, माणिक, मोती, पाचू, पुष्कराज, नील, गोमेद, लसणिया, वैडूर्य व पोवळे ही महारत्ने मानली आहेत. कूर्म, महाकूर्म, अहिच्छत्र, सूर्यनाल, स्फटिक, कर्पूरक, काच वगैरे उपरत्ने होते. दुसऱ्या काही ग्रंथानुसार वज्र, मुक्ता, माणिक्य, नील, मरकत ही पाच महारत्ने असून गोमेद, पुष्पराज, वैडुर्य व प्रवाळ ही उपरत्ने आहेत. रत्नांविषयी अनेक दंतकथा आहेत :

(१) बली नावाचा त्रैलोक्यविजयी दानव होता. त्याने इंद्राला जिंकले व देवांनी कपट करून बलीला श्रेष्ठ मानले व तू आमच्या यज्ञात बलियोग्य पशू हो अशी विनंती केली. बलीने हो म्हटले व देवांनी सौत्रामणी यज्ञ केला. बलीला पशू म्हणून यज्ञस्तंभाला बांधले पण बलीचे जन्म-कर्म विशुद्ध असल्यामुळे त्याचे सर्व अवयव रत्नमय झाले व ती रत्ने भूमीवर गळाली. ती पाहून देव, यक्ष, सिद्ध, नाग त्या रत्नराशीवर तुटून पडले. त्या झटापटीत रत्ने समुद्र, नद्या, पर्वत, अरण्य इत्यादी ठिकाणी विखरून पडली आणि तिथे रत्नांच्या खाणी निर्माण झाल्या.



(२) इंद्राने वज्रासूर नामक एका असुराचा वध केला त्याच्या मस्तकावर प्रहार केला तेव्हा त्याच्या शरीरातून अनेक प्रकारची रत्ने पृथ्वीवर पसरली.

(३) समुद्रमंथनातून चौदा रत्ने निर्माण झाली.

(४) रत्ने नागाच्या फणेमधून गळून पडली. रत्नांचे गुणदोष सांगितले आहेत. गुरुत्व, घनत्व, काठिण्य, स्निग्धता, रंग, कांतिमत्ता व

स्वच्छता हे रत्नांचे गुण होत. त्याच्या विरुद्ध दोष होत. रत्ने शरीरावर धारण केल्यास भाग्योदय होतो. निर्दोष रत्न ऐश्वर्यदायक व सदोष रत्न दारिद्र्य देणारे असते. रत्नांचा उपयोग ऋग्वेद कालापासून केलेला आढळतो. रत्ने ही किमती वस्तू ठरल्यामुळे तिच्या देवघेवीच्या व्यवहारात फसगत होऊ नये म्हणून भारतात रत्नपारखी हा एक वर्गच निर्माण झाला. रत्नपरीक्षेचे एक स्वतंत्र शास्त्रच बनले. अर्थशास्त्र याचा विचार करते. रत्नपरीक्षा, नवरत्नपरीक्षा, अगस्तीय रत्नपरीक्षा, मानसोल्लास वगैरे अनेक ग्रंथ रत्नपरीक्षेवर निर्माण झाले. भारतात व सिलोनमध्ये नकली रत्नेही बनवत. ती बनविण्याची प्रक्रियाही नवरत्नपरीक्षा ग्रंथात दिली आहे. खरे रत्न ओळखणे पारखणे, ही कला आहे.

३९. धातुवाद

संस्कृतीकोशात याचा अर्थ कच्ची धातू पक्की करणे किंवा मिश्रित धातू वेगळी करणे असा दिला आहे. सोने, रूपे, माणिक, हरिताळ, मनःशिला, गैरिक, शिसे, लोखंड, हिंगुळ, गंधक, अभ्रक इत्यादी पदार्थांना प्राचीन वाङ्मयात धातू मानले आहे. सोने, रूपे, तांबे, लोह, कुप्य, पारद, वंग व शिसे या आठ धातूंची निर्मिती देवांपासून झाली असे मानतात.

आप आणि तेज यापासून सोने निर्माण झाले असे मनू म्हणतो.

निरनिराळ्या धातूंविषयी लोकांमध्ये अनेक समजुती आहेत. उदा. मणिपुरी लोक असे मानतात की उमांग लाइ हा जंगलाचा देव लोखंडाच्या खाणींचे रक्षण करतो. लोखंडाचा एक चौकोनी तुकडा हे त्याचे प्रतीक असते. तो देव प्रसन्न राहावा म्हणून खाणीत काम करण्यापूर्वी लोक त्या प्रतीकाची पूजा करतात.

अशुद्ध धातूपासून धातू शुद्ध करून घेऊन त्यांचा उद्योगधंद्यामध्ये उपयोग करण्याच्या कलेस धातुविद्या म्हणतात. (metallurgy) एखादा धातू कोणत्या जागी आढळतो व त्याचे रासायनिक व स्वाभाविक गुणधर्म काय ह्यावर धातू शुद्ध करण्याची पद्धत अवलंबून असते. सोने, चांदी, वगैरे धातू स्वाभाविक शुद्ध स्थितीत आढळतात. निरनिराळे धातू सिलिकेट, आर्सेनाइड, कार्बोनेट, सल्फेट या निरनिराळ्या संयुक्तात आढळतात. काही धातू शुद्ध करण्यासाठी केवळ कुटणे, बारीक करणे याच क्रिया कराव्या लागतात. काहींच्या बाबतीत अशुद्ध धातूचे तुकडे प्रथम आवश्यक तेवढे बारीक करून धुतले असता अनावश्यक भाग काढून टाकता येतो. कथील, शिसे वगैरे अशुद्ध धातू धुण्याच्या पद्धतीने शुद्ध होतात. काहींच्या बाबतीत लोहचुंबकाने अशुद्ध धातूतील शुद्ध अंश एका ठिकाणी आणतात. काही वेळा धातू उष्णतेने वितळवून शुद्ध धातू मिळवितात.

शुद्ध धातू किंवा त्यापासून बनविलेल्या मिश्र धातू यांची अंतर्गत रचना, त्यांचे मिश्रणाचे प्रमाण व त्यांचे स्वाभाविक व यांत्रिक गुणधर्म ह्याचे विरेचन करणारी ही धातुविद्येची शाखा असते त्याला Metalography म्हणतात.

आपल्याकडे पूर्वापार धातुविद्येच्या या शाखा विकसित झालेल्या दिसतात व त्यात निष्णात असणाऱ्याना कलाविद मानले गेले.

४०. मणिरागाकरज्ञानम्

मणिराग म्हणजे रत्नांचे विविध रंग. वैदिक कालापासून आजतागायत रत्न ही एक वैभवाची वस्तू मानली गेली असल्यामुळे ज्याच्या खजिन्यात विविध रत्ने आणि रत्नालंकार असतील तो श्रीमंत व भाग्यवंत समजला जातो. रत्न ही किमती वस्तू ठरल्यामुळे देवघेवीच्या व्यवहारात फसगत होऊ नये, रत्न म्हणून खडा किंवा नकली वस्तू पदरात बांधली जाऊ नये म्हणून भारतात रत्नपारखी हा वर्गच निर्माण झाला व त्यांना राजदरबारी मान्यता मिळाली. रत्नपरीक्षेचे एक स्वतंत्र शास्त्रच बनले.

अर्थशास्त्रात कौटिल्याने रत्नपरीक्षेविषयी महत्त्वाचे अनुभव सांगितले आहेत. त्याचप्रमाणे रत्नांची नावे, उत्पत्तीस्थाने, गुणदोष हे वर्णन केले आहे. 'रत्नपरीक्षा' हा ग्रंथ आठव्या शतकात बुद्धभटाने लिहिला. त्याने रत्नपरीक्षेविषयी पुष्कळ लिहिले आहे.

अगस्तिमत - बुद्धभटाच्या नंतरच्या काळात हा लिहिला गेला. अगस्तीने प्राचीन सिद्धान्ताचे विवेचन करत रत्नांविषयी स्वतःचे अनुभवही लिहिले.

'मानसोल्लास' ग्रंथात रत्ने कशी तोलावी, तोलण्याचा तराजू कसा असावा याचे विवेचन येते. याशिवाय 'रत्नसंग्रह', 'रत्नसमुच्चय', 'मणिमाहात्म्य' वगैरे ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत. अल्लाउद्दीन खिलजीच्या खजिन्याचा अधिकारी ठक्कर फेरू याने 'रत्नपरीक्षा' हा प्राकृत भाषेतला ग्रंथ महत्त्वाचा आहे.

ज्योतिषशास्त्रात ग्रह रत्ने व त्यातून परावर्तित होणाऱ्या रंगांचा संबंध लावला आहे.



ग्रह	रत्न	रंग
रवि	माणिक	लाल
चंद्र	मोती	नारिंगी
मंगळ	पोवळे	पिवळा
बुध	पाचू	हिरवा
गुरू	मूनस्टोन	निळा
शुक्र	हिरा	पारवा
शनि	नीलम्	जांभळा
राहू	गोमेद	अल्ट्राव्हायलेट
केतू	लसण्या	इनफ्रारेड

रत्नांच्या रंगाची पारख करणे ही कला मानली आहे.

आकर ज्ञान म्हणजे खाणीतून खोदून काढण्याचे ज्ञान होय.

४१. वृक्षायुर्वेदयोग

झाडे जोपासणे - उपवन करण्याची कला. प्राचीन भारतीय लोक कृषिकर्मात तसेच वनौषधी चिकित्सेत पारंगत असून त्यांनी विविध वनस्पतींचा अभ्यास दोन्ही दृष्टींनी केला होता. विष्णुपुराण, भागवतपुराण या ग्रंथात असंख्य वनस्पतींचे वर्णन व त्यांच्या पोषणाविषयीचे ज्ञान एकत्रित केले आहे. सुश्रुत, चरक, बृहत्संहिता, अग्निपुराण यातही वनस्पतीशास्त्राचे सखोल अध्ययन केले आहे. बृहत्संहिता व अग्निपुराण यात निरनिराळ्या वनस्पती लावण्यासाठी कोणती परिस्थिती योग्य असते, चांगली जमीन कोणती, खत कसे द्यावे, वनस्पतींच्या रोगांची चिकित्सा कशी करावी, त्यावर कोणते उपाय करावेत आणि रोपे लावण्याच्या भिन्न पद्धतीही सांगितल्या आहेत. प्राचीन काळी अनेक वनस्पतीकोश रचले गेले असून त्यांना निघण्टू म्हणतात. ते वैद्यांच्या सोयीकरता रचले गेले.

वृक्षांचे पोषण चांगले होऊन ते वाढावे म्हणून अनेक उपाय शारंगधर पद्धतीत सांगितले आहेत. झाडांना भरपूर फुले व फळे येण्यासाठी तूप व थंड पाणी यांचे सिंचन करावे, असे आणि दुसरे उपाय अग्निपुराणात दिले आहेत. विष्णुधर्मोत्तर पुराणात निरनिराळ्या वृक्षांच्या निरनिराळ्या आवडी सांगितल्या आहेत. अशोक वृक्षाला सुंदर स्त्रीची लाथ आवडते. बकुल वृक्षाला सुंदर स्त्रीच्या मुखातील मद्य पोषक ठरते. माशांनी युक्त असे थंड पाणी आम्रवृक्षाला व द्राक्षवेलीला मानवते. बोरीच्या झाडाला ज्येष्ठमधयुक्त पाणी, सप्तपर्ण वृक्षाला दूध, कवठ व बेल या वृक्षांना गुळपाणी, खजूर, नारळ यांना मीठयुक्त पाणी उपयुक्त असते असे सांगितले आहे. माणसांप्रमाणेच वनस्पतींनाही कफ-वात-पित्त या त्रिदोषांमुळे रोग होतात त्या दृष्टीने रोगचिकित्सा करून उपचार करणे आवश्यक आहे असे म्हटले आहे.



वराहमिहिराने वृक्षायुर्वेद नामक अध्यायात वनस्पतींची बरीच माहिती दिली आहे व उपवन विद्येसंबंधी शास्त्रीय प्रयोगांचा निर्देश केला आहे. त्याच्या मते साधारण ऋतूंव्यतिरिक्त सगळ्या

ऋतूंमध्ये फळे उत्पन्न करण्याची क्षमता झाडांमध्ये निर्माण करणे शक्य आहे. आधुनिक युगात वराहमिहिराचे हे म्हणणे खरे झालेले आपण पाहतो. मोसमी फळे वर्षभरही येऊ शकतात. संस्कृत साहित्यात अनेक वृक्ष-वाटिकांचा, उपवनांचा, लतामंडपांचा उल्लेख येतो. ते चांगल्या प्रकारे तयार करून जोपासणे एक उत्तम कला आहे जी आजही शास्त्रशुद्धरीत्या शिकवली जाते.

राज्ञ : साधरणं वनं - राजाने निर्माण केलेले साधारण वन म्हणजे उद्यान होय असे अमरकोशात म्हटले आहे. उद्यानात विविध प्रकारचे लतावृक्ष, लताकुंज, कृत्रिम पर्वत, निरनिराळ्या आकारांचे चबुतरे, लतामंडप, तलाव, पुष्करणी त्यात हंसकारण्डव वगैरे पक्षी असत. उद्यानात एक किंवा अनेक रक्षक असत. नगरातले रसिकजन, प्रेमीयुगुले सहलीसाठी व प्रेमक्रीडेसाठी तिथे जात. इंद्राचे नंदनवन, कुबेराचे चैत्ररथवन व रावणाचे अशोकवन प्रसिद्ध आहे. मोगल सम्राट, उद्याने निर्माण करण्यास प्रसिद्ध होते. चौदाव्या शतकात फिरोजशहाने दिल्लीच्या आसपास १२०० बगीचे निर्माण केले. मोगलकालीन उद्यान कलेवर पर्शिया व तुर्कस्तान देशातील कलेचा प्रभाव होता. बाबर फुलवेडा होता. श्रीनगर येथील निशात व शालिमार बाग, आगरा येथील अंजुरी बाग, दिल्लीजवळची तालकटोरा बाग अशी असंख्य उपवने सांगता येतील.

४२. मेषकुक्कुटलावकयुद्धविधि

मेंढे, कोंबडे, लावक नावाचे पक्षी यांच्या झुंजी लावणे. हे जेवणानंतरच्या मनोरंजनाच्या साधनातले एक साधन होते. त्यांना पौष्टिक अन्न देऊन धष्टपुष्ट करायचे आणि तुल्यबल मेंढ्यांच्या धष्टपुष्ट कोंबड्यांच्या झुंजी लावल्या जायच्या. मेंढ्यांचे चोलिक, जटील आणि शोणवर्ण असे तीन प्रकार मानले आहेत. मोठ्या तोंडाचा, गोंडेदार शेपटाचा मेंढा सर्वांत शुभ मानला जातो. काळ्या तोंडाचा शूर मानला जातो व असे मेंढे झुंजीसाठी राखून ठेवले जायचे.

झुंजीसाठी पाळलेल्या मेंढ्यांना हरभऱ्याची डाळ, तिलमिश्रित भात, हरळीचे गवत चारीत. त्याशिवाय आठवड्यातून एकदा सैंधव व तूप एकत्रित करून पाजीत. सकाळी - संध्याकाळ त्यांना हिंडवून आणीत. त्यांच्या शिंगावर लोखंडाच्या शेंब्या बसवत. झुंजीच्या आदल्या दिवशी मेंढ्यांना अंधारकोठडीत ठेवत. प्रत्यक्ष झुंजीच्या दिवशी अगदी थोडे खायला देत आणि दारू पाजीत. त्याचबरोबर सुंठ, मिरी, पिंपळी यांचा भाजून तयार केलेला गोळा त्यांना चारीत. त्यामुळे ते जोराने झुंज देत. दोन प्रतिस्पर्धी मेंढ्याचे मालक पण लावून ही लढत घडवून आणत. बाजाराच्या दिवशी अगर यात्रांच्या ठिकाणी यासाठी अलोट गर्दी जमे. जुगारी लोक त्यांच्यावर पैसे लावत या टकरीमध्ये दुसऱ्या प्राण्याचा मृत्यू होई अगर ते जायबंदी होत. कोंबड्यांच्या पायांना सुऱ्या लावलेल्या असत. उंच उडून ते एकमेकांवर आक्रमण करत असताना सुऱ्यांमुळे घायाळ होऊन ते एकमेकांना नामोहरम करण्याचा प्रयत्न करत व आजूबाजूचे गोळा झालेले लोक नाना आवाज, चित्कार काढून त्यांना अधिक लढण्यासाठी उद्युक्त करत. आजही खेडेगावातून अशा प्रकारच्या झुंजी लावतात व सामुदायिक आनंद मिळवतात.

दुसऱ्यांना झुंजायला लावून त्यापासून आनंद मिळविणे ही माणसाची प्राचीन काळापासून जोपासली गेलेली वृत्ती दिसते. ह्या झुंजीसाठी त्या प्राण्यांना व पक्ष्यांना वर्षभर शिक्षण देऊन पोसणे ही एक कलाच होती. अशा प्रकारच्या झुंजी जगात सर्वत्र दिसतात. 'रूट्स' ह्या कादंबरीत आफ्रिकेत कोंबड्यांना या झुंजीसाठी कसे तयार करत ह्याचे मार्मिक वर्णन येते.

४३. शुकसारिकाप्रलापनम्

नागरिकाची दैनंदिनी सांगताना वात्स्यायन म्हणतो की जेवणानंतर हा शुकसारिकेबरोबर बोलत असे. पोपट-मैना हे पक्षी प्राचीन भारतात अगदी अंतःपुरापासून तपोवनापर्यंत आढळतात. कित्येकदा आपली व्यक्तिगत सुखदुःखे भावभावना जी दुसऱ्या व्यक्तीकडे बोलून त्यांचा आवेग कमी करता येत नाही ती या पक्ष्यांकडे बोलून भावनिक निचरा होताना दिसतो. हे पक्षी मनुष्याचे मनोविनोदाचे साधन होतेच त्याचबरोबर रहस्य, गुप्तमर्मेयोग्य व्यक्तींना पोचविणारे दूतही होते. त्यावेळच्या राजाच्या अंतःपुरात अशा पक्ष्यांना खूपच सन्मान मिळत असे व लाड होत असत. पक्ष्यांकडून शुभशकून - अपशकून वगैरे समजावून घेतले जात. प्रियकराच्या विरहाच्या वेळी पक्ष्यांकडून त्यांना एक प्रकारची सांत्वना मिळे. प्रणय कलहाच्या वेळी प्रियकर-प्रेयसीमध्ये समेट घडवून आणण्यासाठी हे पक्षी उपयुक्त ठरत. तसेच युद्धकाळात गुप्त समाचार एका राज्यातून दुसऱ्या राज्यात धाडणाऱ्या गुप्तचराचेही काम शिक्षित पक्षी करत.

शुक-सारिका हे पक्षी बहुतेक शयन कक्षातच पिंजऱ्यात असून नागरिक भोजनानंतर शय्येवर पडल्यापडल्या त्यांच्याबरोबर मजेदार वार्तालाप करत स्वतःची करमणूक करे. तपोवनातील शुकसारिका तर वेदांगाची तत्त्वचर्चा ऐकत असल्यामुळे तात्त्विक विचार योग्य समयी बोलून तत्त्ववेत्त्यांना संभ्रमात टाकताना दिसतात.



एकदा शंकराचार्य मंडनमिश्रांबरोबर शास्त्रचर्चा करण्यासाठी महिष्मती नगरात गेले. त्यांनी एका पाणी घेऊन येणाऱ्या स्त्रीकडे मंडनमिश्रांचे घर कुठे आहे असे विचारले. तेव्हा ती म्हणाली, ''स्वतः प्रमाणं परतः प्रमाणं'' असा शास्त्रार्थ करत असणाऱ्या पोपटमैनांचे पिंजरे ज्या दारात आहेत तेच मंडनमिश्रांचे घर आहे.

तसेच बाणभट्टाने आपल्या एका पूर्वजाचा कुबेरभट्टाचा परिचय देताना सांगितले आहे की त्याच्या घरी पाळलेल्या पोपट मैनांनी सगळी वेदवेदांगे मुखोद्गत केली होती. यजुर्वेद आणि सामवेदाचे सस्वर पठण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चुका ते पक्षी बरोबर काढत आणि त्यांना सुधारायला लावत. तेव्हा अशा प्रकारे शुक-सारिकांना बोलायला शिकवणे ही एक महत्त्वाची कला मानली गेली होती.

४४. उत्सादने संवाहने केशमर्दनेच कौशलम्

''पादाभ्याम् यन्मर्दनं तदुत्सादनमुच्यते ।'' पायांना मालीश करण्याच्या क्रियेला उत्सादन असे म्हणतात. केरळात नायरांच्या प्रत्येक वसाहतीत एक भगवतीचे मंदिर असे व मंदिराच्या आवारात एक आखाडा असे. आखाड्यात प्रत्येक तरुणाला कुस्ती, मुष्टियुद्ध, द्वंद्वयुद्ध याचे शिक्षण तज्ज्ञ गुरूंकडून दिले जाई. इथे अंगाला मालिशही करत असत त्यामुळे त्वचा नितळ होई व व्यायामाने देह पिळदार होई. ह्या प्रशिक्षाला कलरी किंवा कलारिपायतू असे म्हणत. मालिशसाठी खास तेल तयार केलेले असते व पूर्ण अंगमर्दन गुरू आपल्या पायाने करतो. हे शरीराच्या सांध्याना व स्नायूंना बळकटी देते. मालीश करण्यास चंपी असेही म्हणतात. अंग चोळण्या-रगडण्याचे अनेक प्रकार आहेत. जखमा बऱ्या करण्यासाठी, अथवा मज्जातंतूस इजा पोहोचली असता इजा झालेल्या भागापासून शरीराच्या मुख्य भागाच्या दिशेने मालीश करण्यात येते.

एखाद्या ठिकाणी रुधिराभिसरण जलद व्हावयाला पाहिजे असेल किंवा एखाद्या ठिकाणी पेशीला चेतना द्यायची असेल तर तेल लावून चोळण्यात येते. शरीरातील काही पेशींस, चामडीस किंवा स्नायूंस उत्तेजन द्यायचे असेल तर तो भाग दोन्ही हाताच्या तळव्यात धरून वाटोळा मळण्यात येतो. याखेरीज थकवा घालवायचा असेल किंवा एखादा भाग ताठला असल्यास, संधीवातामध्ये किंवा पक्षाघाताच्या काही प्रकारामध्ये बोटांची टोके विशिष्ट भागी दाबून किंवा हाताचे तळवे अथवा मुठी यांनी बुकलून मालीश करण्यात येते.

वात्स्यायनाने नागरिकाच्या दिनचर्येत सांगितले आहे की नित्यस्नान व दर दुसऱ्या दिवशी मालिश करावे. नागरिक जेव्हा सार्वजनिक स्नानागारात स्नानास जाई तेव्हा तिथल्या परिचारिका त्यांच्या केसांवर सुगंधित आवळ्याचे कल्क हळूहळू मळत असत. शरीराला सुगंधीत तेल लावून मालीश करत. डोक्यांच्या मज्जातंतूंना सचेत करण्यासाठी नागरिकाच्या मानेवर बराच काळपर्यंत मर्दन केले जाई. मग थोडा वेळ द्रोणीमध्ये डुबून तो स्नान करण्यास जाई.

संस्कृतीकोशात केशमर्दन हा शब्द केशमार्जन म्हणजे केस विंचरणे, केस प्रसाधन असा घेतला आहे. संहिता व ब्राह्मणग्रंथ यात केसांचा उल्लेख वारंवार आलेला आहे. आर्य लोक केसांची विशेष काळजी घेत असत. केसांची चांगली वाढ व्हावी

म्हणून अथर्ववेदात अनेक मंत्रही दिलेले आहेत. (६.१३६,१३७) प्राचीन काळापासून स्त्रिया व पुरुष वेगवेगळ्या तऱ्हेच्या केशरचना करीत. केस विंचरण्याकरिता निरनिराळ्या आकाराच्या कंगव्यांचा उपयोग होई. वैदिक काळातल्या स्त्रिया व पुरुष केसांना तेले लावत आणि ते विंचरून नीट भांग पाडत. ऋग्वेदात कुमारिका चार वेण्या घालीत असल्याचा उल्लेख आहे. न्हायलेले आले केसही धूपावर सुकवून सुगंधित करून सरळ केस, केसांच्या लहरी किंवा लाटा आणि कुरळे केस असे केसांचे प्रकार असून वंश, देश, आनुवंशिकता यावरही केसांचा रंग, पोत व वळणदारपणा अवलंबून असतो.

सर्वसाधारणपणे प्रत्येक स्त्री व पुरुषाच्या बाबतीत केस वाढण्याची कमाल मर्यादा ठरलेली असते. वयाच्या तरुणपणी केसांची वाढ जास्त होते व तिशीनंतर मंदावते. केसांचा विरळपणा व दाटपणा हा केसांच्या मुळांवर अवलंबून असतो. सोनेरी केस अतिशय नाजूक, तलम असून बारीक असतात. त्यामुळे अशा केसांची संख्या भरपूर असूनही केस पातळ किंवा विरळ वाटतात. काळेभोर केस पोताने जाड असतात त्यामुळे त्यांची संख्या कमी असली तरी ते मस्तकावर दाट दिसतात. तांबूस केस सर्वांत जाड असतात व भरपूर दिसतात. प्राचीन काळी काळ्याभोर मृदू केसांची वाङ्मयात प्रशंसा केलेली आढळते. केस काळे व मृदू होण्यासाठी आवळ्याचे चूर्ण व अगुरूधूप वापरीत. ग्रीष्मकाळात सुगंधी तेले लावीत. कोणत्या स्त्रियांना कशी केशरचना करावी याबाबत भरताने नाट्यशास्त्रात नियम दिले आहेत. मुनीकन्यांची भूमिका घेणाऱ्यांनी एकच वेणी घालावी, विद्याधरी किंवा यक्ष स्त्रियांचे केस मस्तकाभोवती फिरवून फणा उभारलेल्या सापाप्रमाणे बांधावे. तसेच तो म्हणतो भारतवर्षातील स्त्रियांची केशरचना निरनिराळ्या प्रदेशातील पद्धतीप्रमाणे कराव्या. उदा. गोपींच्या दोन वेण्या घालाव्या. गौड देशातील स्त्रियांचे केस कुरळे करावेत. अवंतीच्या स्त्रिया शेपूट सुटलेला आंबाडा घालत, इत्यादी. पुरुषांनी आपले केस कसे ठेवावे ह्या बाबतही भरत सांगतो. अनेक शिल्पांतून स्त्रियांच्या अनेक कलात्मक केशरचना दिसतात. आजही सौंदर्यप्रसाधनाला व केशप्रसाधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

४५. अक्षरमुष्टी

मानसिकतेप्रमाणे एक काव्यक्रीडा. इथे समस्या दोन प्रकारच्या असत. सभासा आणि निरवभासा. कुठल्याही नामाला संक्षिप्त करून बोलणे म्हणजे सभासा किंवा सभाषा होय. उदा. चै-म्हणजे चैत्र, वै म्हणजे वैशाख. निरवभासा किंवा निरवभाषा या समस्येत वेगवेगळ्या संकेतांनी अक्षरे सांगितली जायची. त्यातला एक विधी अक्षरमुष्टी हा होय. ह्यात 'क' वर्गातील अक्षरासाठी मूठ बांधली जायची. 'च' वर्गातील अक्षरासाठी तळहात पसरला जायचा. अशा प्रकारे प्रत्येक वर्गासाठी असलेला संकेत पहिल्यांदा सांगितला जाई. त्यानंतर बोटे उचलून त्या वर्गातले कितवे अक्षर हे सांगितले जाई. त्यानंतर पाय वाजवून अगर चुटकी वाजवून मात्रा सांगितल्या जात. प्रत्येक नागरिक अत्यंत लक्ष देऊन काव्यसमस्यापूर्ती करायचा प्रयत्न करत असे.

अशा अवघड समस्या सोडविणे म्हणजे बुद्धीला आव्हान देणारी कलाच होती.

४६. म्लेच्छितविकल्प

म्लेच्छ या शब्दाने ''पुलिन्दा, नाहला निष्ट्याः शबरा वरूटा भटाः । माला भिल्लाः किराताश्च सर्वेऽपि म्लेच्छ ज्ञातयः ॥'' या सर्व आदिवासी, रानटी जमाती दर्शवल्या जातात. त्यांची अनार्य असंस्कृत भाषा थोडक्यात परकीय भाषाज्ञान ही कला मानली गेली. राजाला राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने राज्यात कुठेही कटकारस्थान होत असले तर समजणे आवश्यक असते त्यामुळे कित्येदा परकीयभाषाज्ञानही आवश्यक मानले गेले आहे. जयमंगला टीकेत याचा अर्थ 'गुप्तभाषाज्ञान' असा दिला आहे.

४७. देशभाषाविज्ञानम्

देशभाषाविज्ञानम् म्हणजे देशी भाषा जाणणे. यामध्ये एखाद्या प्रांतात बोलली जाणारी बोलीभाषा येते. भारतामध्ये जवळजवळ १६५२ बोली भाषा असून त्या चार भाषाकुलांमध्ये मोडतात.

आग्नेयभाषापरिवार - यात ६५ बोलीभाषा आहेत.
द्राविडभाषाकुलात - १६१ बोलीभाषा आहेत.
सिंध क्षेत्रातील - १४ बोलीभाषा आहेत.
मराठीच्या - ६५ बोलीभाषा आहेत.
उरियाचा - २४ बोलीभाषा आहेत.
बंगालीच्या - १५ बोलीभाषा आहेत.
हिंदी क्षेत्राच्या - ३५ बोलीभाषा आहेत.
गुजरातीच्या - २७ बोलीभाषा आहेत.
पंजाबीच्या - २९ बोलीभाषा आहेत.

गोपनीय वस्तू जाणण्यासाठी तसेच एखाद्या ठिकाणी व्यवहार जाणण्यासाठी देशी भाषांचे ज्ञान आवश्यक आहे.

४८. पुष्पशकटिका

फुलांनी रथ, गाडी शृंगारणे. बैलगाडी, मेणे, घोडे, हत्ती यांच्यावरील फुलांची सजावट. राजे-रजवाडे पदरी महाकाय, गुणी हत्ती तसेच उत्तम लक्षणे असणारे घोडे बाळगीत. हत्तींवर अंबारी ठेवून त्यात बसत. हत्तीवरून देवतांच्या मिरवणुकी काढण्याचीही प्रथा होती. त्या प्रसंगी भारी गालीच्यांच्या झुली, हत्तींवर घातल्या जात. त्यांच्या मस्तकावर शुभ चिन्हे रंगतीत. गळ्यात मण्यांच्या व घंटांच्या माळा घालत अंबारीवर फुलांची सजावट करत. रथही उत्सव प्रसंगी फुलांनी सजवीत. बैलगाड्या, बैल यांना शेतकरी समाजात खूप महत्त्व आजही आहे. पेरण्या संपल्या शेतीची कामे संपली की बैलांना न्हाऊमाखु घालून, शृंगारून, फुलांच्या माळा घालून श्रावण अमावास्येला पोळा साजरा करतात. बैलगाड्या सजवून त्यांच्या स्पर्धाही लावतात. पूर्वी मेणे हे राजघराण्यातील व सरदार घराण्यातील स्त्रियांचे प्रवासाचे साधन होते. जनसामान्यातही लग्नप्रसंगी वधूला मेण्यातून न्यायचे. मेणे त्या प्रसंगी फुलांनी सजवीत. रथ, गाड्या, मेणे हे प्रवासाचे साधन असल्यामुळे त्यांच्या कार्यात अडथळा होणार नाही पण त्याचबरोबर ते आकर्षक दिसतील अशाप्रकारे सजविणे एक कलाच मानावी लागेल.



४९. निमित्तज्ञानम्

शकुन अपशकुन यांचे ज्ञान भविष्यसूचक शुभचिन्ह किंवा दुश्चिन्ह. या शुभाशुभ कल्पनांचे प्रत्यंतर निकटच्या भविष्यकाळात येते. भविष्य जाणून घेणे ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. त्यातूनच शुभाशुभ घटना सांगण्यासाठी फलज्योतिषाचे एक अंग म्हणून शकुनशास्त्र जन्माला आहे. या कल्पना सर्वत्र सारख्या असत नाहीत कारण स्थानिक अनुभव भिन्न असतात, सांप्रदायिक आचार, विचारात फरक असतो तसेच तत्त्वज्ञानही निरनिराळे असते. शुभाशुभ कल्पना फार प्राचीन आहेत. शकुन याचा मूळ अर्थ पक्षी असा आहे. ऋग्वेदात भारद्वाज पक्षाची दोन शकुनसूक्ते आहेत. त्यात असे म्हटले आहे, "हे शुभंकर आणि शुभवाची पक्षिराजा आमच्या घराच्या उजव्या अंगाला येऊन तू आवाज काढ." (ऋ.२.४२.४३) आणि आश्वलायन गृह्यसूक्तात प्रवासाला निघताना अशुभ पक्ष्यांचा आवाज आला तर वरील दोन सूक्ते म्हणावीत असे सांगितले आहे.



उत्तरकालीन वाङ्मयात या प्रकारच्या संकेतांमध्ये खूपच वाढ झाली. या सर्वांनाच शकुन म्हणू लागले. रावणाच्या त्रासातून सुटण्यासाठी जीवनाचा त्याग करायला तयार झालेल्या सीतेला काही शकुन झाले. तिचा डावा डोळा लवू लागला. डावा हात स्फुरण पावू लागला. त्यामुळे तिला आपले भविष्य चांगले आहे असे वाटून तिने आत्मघाताचा विचार सोडला असे रामायणात सांगितले आहे. सीता लंकेत आल्यापासून अशुभ गोष्टी घडू लागल्या असे बिभिषण रावणाला सांगतो.

महाभारतातही हा प्रकार विपुल प्रमाणात आढळतो. या ग्रंथात द्रोणाचार्य व अर्जुन या गुरुशिष्यांना शकुनज्ञाते म्हणून गौरव केला आहे.

धर्मशास्त्रात व सामान्य लोकांमध्ये प्रवास, सर्प, पाल, कावळा, कुत्रा, मांजर, कोल्हा, शिंक, उचकी, जांभई, श्वासोच्छ्वास, निरनिराळ्या ग्रहांचे खडे, अंगस्फुरण व संख्या यांच्या माध्यमातून शकुन पाहिले जातात.



मोर, चातक, मुंगूस, डाव्या बाजूला जाणे, परटीण धुण्याचे गाठोडे घेऊन व ब्राह्मण पळी, पंचपात्री घेऊन समोर येणे, लग्नाची मिरवणूक, पाण्याने भरलेली घागर घेतलेली सुवासिनी, मूल घेतलेली माता, दांपत्य, सवत्सगाय समोर येणे, हरीण, मांजर, साप-उजवीकडे जाणे,

गाढव उजव्या बाजूला ओरडणे, कोकिळेचा ध्वनी ऐकणे, घोड्याचे खिंकाळणे, कुत्र्याचे कान फडफडावणे, शुभ वचन, शिजवलेले अन्न, फळांची टोपली घेतलेला माणूस, दिवा हे सर्व शुभशकुन आहेत.

बोडका ब्राह्मण, विधवा, रजस्वला, काळ्या वस्तू समोर येणे, गाढव डाव्या बाजूला ओरडणे, पक्षी, कुत्रा यांचे रडके स्वर ऐकणे, गोवऱ्या, जळकी लाकडे दिसणे हे अशुभ शकुन आहेत.

अशुभ शकुनांच्या परिहारासाठी धार्मिक, तांत्रिक विधी करण्याची पद्धतही प्राचीन काळापासून आहे. या शुभाशुभांचे ज्ञान ही कला मानली गेली.

५०. यन्त्रमातृका

मातृका या लोकमाता नावाच्या क्षुद्र देवता. यांची संख्या ७,८,९,१४,१६ वगैरे आहे. काश्मिरी शैवसंप्रदायात मातृका शक्ती ही आदिशक्ती असून ती मंत्ररूपात आहे असे मानले आहे. व यंत्रावर लिहिली गेलेली ह्रीं, क्रीं (बीजमंत्र त्रिपुरसुंदरीचा व कालीचा) ही अक्षरे आदिमातृकाशक्तीला जोडतात असे मानले गेले आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या ध्वन्याक्षरांचे यंत्रे मानली गेली व ती तंत्रसाधनेत वापरतात. इथे यंत्र म्हणजे ताईत असावा. लहान मुलांच्या रक्षणासाठी वगैरे अशी यंत्रे वापरली जात असावी. सटवी ही अशीच एक मातृका होय. यन्त्रमातृका याचा अर्थ विविध नक्षींचे ठसे बनविणे असाही केले जातो.



५१. धारणमातृका

धारणमातृका म्हणजे स्मरणशक्ती वाढविण्याची कला. आपले एकूणच वाङ्मय अगोदर मौखिक होते. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे श्रवण-मनन स्मरण व पुनरुच्चार ह्या क्रमानेच जाई. निरनिराळ्या शास्त्रांमधील तत्त्वे छोट्या सूत्ररूपाने आठवणीत ठेवली जात असत त्यामुळे आपल्या वैदिक व पुढल्या वाङ्मयात श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे वगैरे आहेत. सूत्राची व्याख्या 'अल्पाक्षरं असंदिग्धं साखद्विश्वतोमुखम् । अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः ।।' अशी आहे. म्हणजेच सूत्र हे अल्प अक्षरांचे, संदेहरहित, सारवान, ज्याचा अनेक अंगांनी अर्थ करता येतो असे, अनिंदनीय असे असते. स्मरणशक्तीचे अनेक खेळही खेळले जात जसे प्रतिमाला किंवा भेंड्या.

५२. सम्पाठ्यम्

सम्पाठ्यम् म्हणजे जसे ऐकले ते तसेच्या तसे परत ऐकविणे. हा सुद्धा एक स्मरणशक्तीचाच प्रकार आहे. वेदकाळात ऋचेमध्ये मात्रा असून सामगायनही असे. मात्रेच्या फरकाने अर्थ बदले त्यामुळे पूर्ण काळजी घेऊन गुरूने जसे उच्चारण केले तसेच ते शिष्याने म्हणण्याची पद्धत होती. ती पद्धती सहज व्हावी म्हणून खेळीही असत व जसेच्या तसे म्हणणे एक कलाही गणली जाऊ लागली.

५३. मानसीकाव्य क्रिया

मानसिकाव्य क्रिया किंवा मानसी कला. ही एक काव्य समस्या क्रीडा आहे. ह्या खेळात श्लोकात अक्षरांच्या जागी फुलांच्या पाकळ्या ठेवल्या जात व श्लोक वाचणाऱ्याला या ठिकाणी एक मात्रा आहे किंवा अनुस्वार आहे, विसर्ग आहे एवढेच सांगून श्लोक पूर्ण करायला सांगायचे.



५४. अभिधानकोशविज्ञानम्

अभिधानकोशछन्दोविज्ञानम् म्हणजे शब्दकोषांचे ज्ञान. भारतात वैदिक निघण्टू हा प्राचीन कोश म्हणता येईल. त्यानंतर अमरकोशादी अनेक संस्कृत कोश रचले गेले. संस्कृत कोश हे विशिष्ट ग्रंथांशी संबंधित असलेले आढळत नाही. पण कोश म्हणजे केवळ शब्दांच्याच यादा नसून त्यात इतरही माहिती उद्धृत केलेली मधूनमधून आढळते. निघण्टूमध्ये नामे व अव्यये याप्रमाणेच धातूही संग्रहित केलेले आढळतात. परंतु कोशामध्ये नामे व अव्यये यांचाच संग्रह केलेला असतो. कोशाचा मुख्य उद्देश जरी शब्दार्थांचे विवरण करण्याचा असला तरी पुष्कळशा कोशात केवळ महत्त्वाचे अथवा क्वचित योजले जाणारे शब्द संग्रहित केलेले असून त्यांचा उपयोग मुख्यतः कवींकरताच असावा. उदा. 'कवींना हितकाम्यया' (धनंजय), कवींना सुखहेतवे (धरणीकोश) 'कृपानुपेत्य सतांकवीनां' (महेश्वर), 'कवेः शीघ्रक वित्वाय' (शीघ्रबोधिनी) ह्यावरून अभिधान कोशांचे ज्ञान हे एक काव्याभ्यासाचे अंग समजले जात असे.

संस्कृत भाषेत पूर्वी शब्दकोशास कोश, अभिधावकोश, नाममाला, नामपारायण व निघण्टू इत्यादी नावे आढळतात. संस्कृत शब्दकोशांमध्ये मुख्यतः आपणास दोन वर्ग आढळतात. (१) एकार्थवाचक किंवा समानार्थवाचक शब्दांचा म्हणजे ज्या शब्दांचा एकच किंवा सारखा अर्थ आहे असे शब्द एकत्र देणारा व दुसरा अनेकार्थवाचक किंवा नानार्थवाचक म्हणजेच ज्या एकाच शब्दाचे अनेक अर्थ होतात ते सर्व अर्थ एकत्र देणारा कोश. हेमचंद्राने पहिल्या प्रकारच्या शब्दांचा संग्रह 'अभिधान चिंतामणी' या कोशात व दुसऱ्या शब्दांचा संग्रह' 'अनेकार्थसंग्रह' या नावाने स्वतंत्र केला आहे. या कोशांचे ज्ञान अनेक काव्यसमस्यांपूर्तीकरता आवश्यक मानले जायचे व ते जाणणे ही एक कला मानली गेली.

५५. छन्दोविज्ञानं

मानव प्रथम बोलू लागला तेव्हा त्याची भाषा Sing-Song धर्तीची किंवा काहीतरी गायल्यासारखे बोलण्याची असावी. म्हणजे लयबद्ध किंवा छंदोबद्ध वाणी आदिमानवापासून चालत आली असावी.

मानवी साहित्याचे सर्वात जुने नमुने छंदोबद्ध आहे. भारतीयांचे वेद छंदोमयी वाणीत आहेत. ग्रीक प्राचीन साहित्य, पारसिकांचे झेंद-अवेस्ता, हिब्रू बायबल लयबद्ध आहेत.

वेदसंहितेत गायत्री उष्णिक, अनुष्टुभ, बृहत्ती, पंक्ती, त्रिष्टुभ, जगती इ. छंदाचे उल्लेख आहेत. हे छंद अक्षरनिर्भर आहेत. छंदाचे चरण घेऊन त्यातील अक्षरे सांगण्याची वैदिक पद्धती रूढ होण्यापूर्वी समग्र छंदातील अक्षरे योजली जात. २३ अक्षरापर्यंतची वृत्ते सविशेष असतात. पुढे २४ ते ४८ अक्षरांचे सात अतिच्छंद मानले गेले.

८ अक्षरांचा अनुष्टुभ, ११ चे त्रिष्टुभ, १२ची जग्ती अशी वैदिक छंदाची उत्तरोत्तर वाढ झालेली आहे. पिंगलाचार्य किंवा पिंगलनाग यांनी रचलेल्या छंदःसूत्रांना छंदशास्त्र म्हणतात.

मध्ययुगातले जयदेवाचे गीतगोविंद ललितरम्य छंदोगानाचे आहे. तशाच अनेक रचना लोकगीतातून प्राकृतात आल्या असाव्यात. धवळे, आरत्या, भूपाळ्या, गौळणी, पोवाडे, लावण्या, कटाव यांचे मूळ अशा प्रकारे गाननाट्यात असावा. आज मुक्तछंदात कविता आहेत पण लोकांचा ओढा छंदोयुक्त गायनाकडे अजूनही दिसतो. हे छंदोविज्ञान कला मानली गेली.

५६. क्रियाकल्प

क्रियाकल्प म्हणजे काव्यालंकार. 'शब्दार्थभूषणमनुप्रासोपमादिः'' शब्द आणि अर्थ यांना भूषणभूत होणारे अनुप्रास, उपमा प्रकार म्हणजे अलंकार होत. साहित्यशास्त्रात रससिद्धान्त येण्याअगोदर काही साहित्यशास्त्रज्ञ अलंकारांनाच काव्याच्या उत्कटतेचे प्रमुख साधन मानीत असत. काव्यात अलंकारांना श्रेष्ठत्व देणाऱ्यांमध्ये भामह हा कवी होता. दंडी कवीलाही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अलंकारांचे महत्त्व मान्य होते. भामहाने वक्रोक्ती अलंकार हा अलंकारांचा पाया मानला. त्याने शब्दालंकारापेक्षा अर्थालंकारावर विशेष भर दिला. मम्मटानेसुद्धा त्याचा उल्लेख केला आहे.

अलंकारांचा विकास हळूहळू होत गेलेला दिसतो. भारताच्या नाट्यशास्त्रात अनुप्रास, उपमा, रूपक व दीपक या चारांचाच निर्देश आहे. त्यातला अनुप्रास हा शब्दालंकार असून बाकीचे तीन अर्थालंकार आहेत.

अलंकारमताच्या आचार्यांना रसतत्त्व अज्ञात नव्हते. पण त्यांनी रसाला स्वतंत्र स्थान न देता एक अलंकार विशेष म्हणून स्वीकारले. भामहाने रसवत्, प्रेय, उर्जस्वी व समाहित या चार अलंकारांमध्ये रस आणि भाव हा विषय घेतला आहे. काव्य रसयुक्त असावे नाहीतर रसिक काव्यापासूनही विन्मुख होतील असे तो म्हणतो. दंडीही आठ रस व आठ स्थायी भाव यांचा निर्देश करतो.

काव्यात अलंकारांचे जे महत्त्व वरील साहित्यकारांनी मानले ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पुढच्या काळातही मान्यता पावले.

असे काव्यालंकारांविषयीचे ज्ञान एक कला मानली आहे.

५७. छलित योग

दुसरा वेष धारण करून फसविणे किंवा बहुरूप्याची कला. बहुरूपी वेगवेगळी विनोदी गाणी म्हणतो व त्यातील आशय जिवंत करण्यासाठी निरनिराळी वेषांतरे करतो. त्या भूमिकेला साजेसा अभिनयही करतो, आवाजातही चढउतार करून आणलेले सोंग हुबेहुब वठवतो. कधी गर्भवती स्त्री, कधी बाळंतीण बाई, कधी तिचे रडणारे मूल अशा वेगवेगळ्या भूमिका तो करून दाखवतो. पशुपक्ष्यांचे हुबेहुब आवाजही काढतो, बहुरूपी हे महाराष्ट्रात तसेच गुजरात, पंजाब इथेही आढळतात. पुरुष माणसे कामाला गेली, बायका मुली निवडण्या-टिपण्याची कामे करीत बसलेली असतात तेव्हा दुपारी काहीशा बायकी आवाजात बोलत महाराष्ट्रातील खेड्यात दुपारी बहुरूपी हिंडताना दिसतात.



५८. वस्त्रगोपनानि

जयमंगल टीकेत तोकडे कपडे असे घालायचे की ते मोठे आहेत असे वाटतील व मोठे कपडे असे परिधान करायचे की ते छोटे आहेत असे वाटतील. संस्कृती कोशात याचा अर्थ फाटलेले वस्त्र शिवण दिसणार नाही अशरितीने शिवणे असा दिला आहे. रफू करणे ही एक कला आहे. ज्यामध्ये फाटलेले वस्त्र त्याचे आडवे धागे व उभे धागे अशा रितीने बरोबर शिवले जातात की पटकन जोड लक्षात येणार नाही. ही निश्चितच एक कला आहे. अशा प्रकारे रफू करणाऱ्या कारागिरांना रफूगर म्हणतात.

५९. द्यूतविशेष

द्यूतक्रीडा हा प्राचीन खेळ आहे. या खेळातले फासे बेहड्याचे, मातीचे, दगडाचे अथवा हस्तिदंताचे असत. द्यूतक्रीडेसाठी स्वतंत्र जागा असत त्यांना द्यूतसभा म्हणत. तिथे जुगारी लोक जमत. या द्यूतसभेच्या प्रमुखाला सभिक असे म्हणत.

ऋग्वेदात कवण ऐलूष नावाच्या वैदिक ऋषीने आपल्या सूक्तात द्यूताचे दुष्परिणाम अत्यंत प्रभावी भाषेत मांडले आहेत. मनूने द्यूताचा अठरा व्यसनांमध्ये समावेश केला आहे. द्यूत हे वैर निर्माण करणारे असल्याने गंमत म्हणूनसुद्धा द्यूत खेळू नये असे तो सांगतो. कौरव-पांडव द्यूत खेळले आणि पांडव देशोधडीला लागले तसेच नलराजाही द्यूत खेळून आपले राज्य गमावून बसला.

महाभारतावरून असे कळते की प्राचीन काळी राजे लोक द्यूतगृहे बांधत. तिथे खेळायला येणाऱ्या जुगाऱ्यांकडून कर घेत एवढेच नव्हे तर जुगाऱ्यांनी जिंकलेल्या द्रव्यातही राजाचा ठरावीक भाग असे. जे लोक हा कर चुकवीत त्यांना शिक्षा देऊन राज्याबाहेर घालवले जाई. चोर दरोडेखोरांना जुगाराचे व्यसन मोठ्या प्रमाणात असे आणि त्या लोकांचा पत्ता राजाला द्यूतगृहातच लागत असे. चाणक्याने तसेच सम्राट अशोकानेही आपल्या राज्यात द्यूताला बंदी घालण्याचा प्रयत्न केला पण तो कागदोपत्रीच राहिलेला दिसतो.

द्वारकेमध्ये द्यूत चालत असल्याचा उल्लेख भागवतात आहे. गुप्तकाळातही द्यूताचा बराच प्रचार होता. मृच्छकटिकात द्यूताचे बरेच उल्लेख आहेत. दंडी कवीने द्यूताची प्रशंसा केली आहे. तो म्हणतो की द्यूताने औदार्य वाढते व हारजीत सारखी येत असल्यामुळे सुखदुःखात समवृत्तीने राहण्याचे शिक्षण मिळते.



शिव हा द्यूताचा आद्य प्रवर्तक आहे असे मानतात. शिव-पार्वती सारिपाट खेळत असल्याची अनेक शिल्पे आहेत.

समाजाची द्यूताबद्दलची आसक्ती ध्यानात घेऊन धर्मशास्त्रकारांनी कोजागिरी पौर्णिमा व बलिप्रतिपदा या दिवशी द्यूत खेळण्याची सूट दिली आहे.

द्यूतासंबंधी 'चतुरंगदीपिका' नावाचा ग्रंथही उपलब्ध आहे. द्यूत चांगले खेळता येणे ही कला मानली आहे.

६०. आकर्षक्रीडा

ही परत एक प्रकारची द्यूतविद्याच आहे. यालाच अक्षक्रीडा असेही म्हणतात. फाशांच्या आधाराने केली जाणारी अक्षक्रीडा होय. ऋग्वेदात अक्षक्रीडेचा रोचक उल्लेख असून ५३ फाशांचा उल्लेख आहे. वैदिक काळातले फासे बेहड्याचे असत. पाणिनीच्या काळी हा खेळ अक्ष व शलाका यांच्या साहाय्याने चाले. तैत्तिरिय ब्राह्मणात राजसूय यज्ञाच्या प्रसंगी पाच फाशांचा उल्लेख आला आहे. त्यांची नावे अनुक्रमे अक्षराज, कृत, त्रेता, द्वापार व कली अशी होती. या द्यूताला पंचिकाद्यूत असे म्हणत. फासा फेकण्याला ग्रह किंवा ग्राम म्हणत. ज्या खळ्यात फासे फेकत त्याला देवन असे म्हणत. पुरस्कार द्रव्याला 'लक्ष' असे म्हणत. पाणिनीने त्यालाच ग्लह असे म्हटले आहे. पाचही फासे चित किंवा पट पडले तर त्याला कृत म्हणत कृत डाव पडल्याने जीत होत असे.

पाचातला एक उलटा पडला तर त्या डावाला अक्षपरी, दोन उलटे पडले तर द्विपरी, तीन उलटे पडले तर त्रिपरी व चार पडले तर चतुष्परी म्हणत. पाली ग्रंथात कली शब्दाने हार व कृत शब्दाने जीत सांगितली आहे.

यज्ञ प्रसंगात एक अनुष्ठान या रूपाने अक्षक्रीडा चाले. यजमानाला आपल्या पत्नीसमवेत फासे खेळावे लागत. राजसूयप्रसंगी द्विग्विजयाचे प्रतीक म्हणूनही फासे खेळत. त्या वेळचे फासे सोन्याचे असत.



आकर्ष याचा अर्थ धनुष्य असाही होतो तेव्हा हा कदाचित धनुर्विद्येकडेही निर्देश असेल.

६१. बालक्रीडनकान्

बालक्रीडनकान् म्हणजे लहान मुलांची खेळणी. लहान मुलांच्या करमणुकीसाठी रंगीबेरंगी खेळणी असतात. खेळणी ही केवळ करमणूक करत नाहीत तर ती त्यांच्यात जिज्ञासा उत्पन्न करतात व त्यांची कलात्मक प्रवृत्तीही वाढवतात. खेळणी ही सार्वकालिक व सार्वदेशिक आहेत. अश्मयुगापासून जगात खेळणी तयार होत आली आहेत. प्राचीन संस्कृतींच्या उत्खननातून दगड, माती, लाकूड, धातू, गवत, शिंगे, हाडे, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तूंपासून बनविलेली विविध खेळणी सापडली आहेत. खेळण्यात मानवी आकृतीबरोबरच गाय, बैल, हत्ती, घोडे, कुत्रे, माकड, वाघ, सिंह इत्यादी प्राण्यांच्या आकृतीही आढळतात. ऋग्वेदात बाहुल्यांचा उल्लेख आहे पण यांच्या खेळण्यासाठी उपयोग होत असे का जादुटोण्यासाठी हे माहिती नाही.

मोहेंजोदडो, हराप्पा येथेही मातीची खेळणी सापडली आहेत. मौर्य काळात भाजलेली पक्क्या मातीची खेळणी तयार होत. उत्खननात खेळण्यांचे साचेही सापडले आहेत. शुंगकाळात मेंढे जुंपलेल्या गाड्यांची खेळणी प्रचारात होती. कुशाणकालातल्या मातीच्या बाहुल्यांना सर्वतोभद्र म्हणजे चारी बाजूंनी कोरलेल्या असे म्हणतात. गुप्तकालीन मातीच्या बाहुल्या फार सुंदर दिसतात. या खेळण्यांचा पाठीमागचा भाग सपाट असून मस्तकावर एक छिद्र असते त्यात दोरा अडकवून ती खेळणी भिंतीवरही टांगता येत असत. कालिदासाच्या शाकुंतलात खेळण्यातील मोराचा तसेच कुमारसंभवात पार्वती बाहुल्या घेऊन गंगेच्या काठी खेळे असे वर्णन येते.



बाणभट्टाच्या कादंबरीत खेळण्यांमध्ये चक्रवाक पक्ष्यांची जोडी व रत्नांच्या अनेक बाहुल्या होत्या असा उल्लेख आहे. कथासरित्सागरात अनेक मनोरंजक खेळ व खेळणी यांचा उल्लेख येतो. त्यात उडणाऱ्या लाकडी बाहुल्यांचा उल्लेख येतो. या बाहुल्या कळ दावल्यावर काही उंच उडत, काही गात, काही नाचत तर काही आवाजही करत.

भारतातील अनेक सण - उत्सवांशी बाहुल्यांचा संबंध जोडलेला आहे. तामिळनाडू, म्हैसूर व आंध्र प्रदेशात नवरात्रात बाहुल्यांना सजवून त्यांची आरास मांडतात. उत्तर-पूर्व भागात नागपंचमीच्या दिवशी बाहुल्यांची मिरवणूक काढून नदीत विसर्जन करतात. त्याला बाहुल्यांची जत्रा असे म्हणतात. महाराष्ट्रात चैत्रगौरीची आरास करतात. त्यावेळी प्रामुख्याने बाहुल्या व खेळणीच मांडतात.

उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश या प्रांतातही मुली भातुकली मांडून बाहुला-बाहुलीचे लग्न लावतात. वेगवेगळ्या प्रांतातील लोकांच्या पेहरावाप्रमाणे बाहुल्यांचे पोशाखही असतात. काही खेळणी इतिहासाशी संबंधित असतात. उदा. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या प्रतिकृती, काशी, मथुरा येथे मिळणाऱ्या गौळणी, धार्मिक परंपराही अजमाविता येतात. उदा. श्रीकृष्णाच्या खेळातल्या मूर्ती सौराष्ट्र मध्य प्रदेशात मिळतात. बंगालमध्ये कालीमातेच्या खेळातल्या मूर्ती दिसतात.

आजूबाजूच्या मानवी व्यवहारांचे प्रतिबिंबही खेळण्यात पाहायला मिळते. गवळी, सुतार, कुंभार, व्यापारी, शेतकरी हेही खेळण्यात दिसतात त्याचप्रमाणे बैलगाडी-टांगा, मोटार, बस, आगगाडी, विमान हेही दिसतात. शहरात खेळण्यांची कायमस्वरूपी दुकाने असतात. खेडेगावात जत्रा, उत्सव अशा प्रसंगी खेळण्यांची दुकाने लागतात. आजही बार्बीडॉल ही शहरवासी मुलांची आवडती बाहुली आहे.

६२. वैनयिकी विद्या

'वैनयिकीनाम् विद्यानां ज्ञानम् ।' म्हणजे विनय व शिष्टाचार यांचे ज्ञान.
शिष्टाचार या शब्दाचा अर्थ. शब्दकल्पद्रुमात -
"दानं सत्यं तपोऽलाभो विद्येन्या पूजनं दमः ।
अष्टौ यानिचरित्राणि शिष्टाचारास्य लक्षणं ॥

दान, सत्य, तप, निर्लोभी वृत्ती, विद्या, यजन, पूजन व इंद्रियदमन ही शिष्टाचाराची आठ लक्षणे सांगितली आहेत. ज्यांनी धर्मनियमांना अनुसरून वेदांचे अध्ययन केले व त्यानुसार उपदेश करतात ते शिष्ट होत असे मनू म्हणतो. शिष्ट पुरुष सत्यपरायण असतात. ते आपली बुद्धी संयत राखतात व धर्ममर्यादा पाळतात. महाभारत उद्योगपर्वात शिष्ट बनण्याची कामना करणाऱ्या महापुरुषांना खालील सूचना केल्या आहेत.

उद्योगी बना, वृद्धांची सेवा करा, ज्ञानवृद्धांकडून कर्तव्ये समजावून घ्या; दिवसा असे काम करा की रात्री सुखाने झोप येईल, वर्षाचे आठ महिने असे अंगमेहनतीचे काम करा की पावसाळ्याचे चार महिने सुखात घालविता येतील. तारुण्यात असे काम करा की वृद्धावस्थेत आनंदाने राहता येईल. जीवनभर असे काम करा की मृत्यूनंतर आत्म्याला सुख व सद्गती मिळेल.

मनुष्याचे आचरण सूर्यासारखे प्रकाशमान पाहिजे. सूर्याप्रमाणेच परोपकार हे श्रेष्ठ कर्तव्य समजावे. जो सर्वांना स्नेहदृष्टीने पाहतो त्यालाच स्वर्गात सर्वश्रेष्ठ पद मिळते. प्राणिमात्रांच्या दुःखनिवारणासाठी जो सतत प्रयत्न करतो, जो लोकांच्या सुखाने सुखी होतो व दुःखाने दुःखी होतो तो खऱ्या अर्थाने शिष्ट होय. शिष्टाचार हे धर्माचे तिसरे मूळ आहे. शिष्टांना धर्मनिर्णय करण्याचा अधिकार असतो. आज शिष्टाचार या शब्दाचा अर्थ संकुचित झाला आहे प्रत्येक व्यवसायाचे आपले असे शिष्टाचार असतात व ते त्या व्यवसायात स्थिर होण्यासाठी शिकून घेणे आवश्यक असते. समाजाच्या विशिष्ट थरात वावरण्यासाठी विशिष्ट शिष्टाचार अंगी बाणवले नाही तर आपण हास्यास्पद ठरतो. पूर्वी आपण म्हणत होतो की विद्याविभूषितांना विनय अधिक शोभा देतो. आजही तेच आहे परंतु हा विनय किंवा modesty ही बऱ्याचदा शाब्दिक असून आधुनिक शिष्टाचाराचाच एक भाग असते.

६३. वैजयिकी विद्या

'वैजयिकीनां विद्याज्ञानम्' म्हणजे विजय मिळवून देणाऱ्या विद्या.

यामध्ये शस्त्रविद्येचा अंतर्भाव केला आहे. धनुष्यबाण हे सर्वश्रेष्ठ प्राचीन आयुध होय. रामायण-महाभारत, पुराणे या संस्कृत ग्रंथात अनेक प्रकारच्या शस्त्रांची नावे आढळतात. रामायणात राम-रावणांच्या युद्धात शस्त्रास्त्रांचे वर्णन येते. या युद्धात वानरांनी आदिमानवांची शस्त्रे जी दात, हात, पाय, नखे, झाडे, दगड यांचा उपयोग केला तर राक्षसांनी अत्यंत सुधारलेली शस्त्रे वापरली. त्या काळी धनुष्यबाणांचे पुष्कळ प्रकार प्रचलित होते. रावणाने वानराच्या वानर सेनेवर कुक्कुटमुख, मकरमुख, सर्पमुख, वराहमुख इत्यादी शस्त्रांचा प्रयोग केला. गदा, पाश, शक्ती यांचेही विविध प्रकार रामायणात आढळतात.

महाभारतात दंड, यष्टी, लगुड, गदा, परशू, भल्ल, कुंत, पाश, चक्र, शक्ती, शूल, धनुष्यबाण, शतघ्नी, क्षेपणी अशी अनेक शस्त्रे येतात. यात -

(१) अमुक्त - हातात धरून मारता येण्याजोगी, उदा. खड्ग.
(२) मुक्तामुक्त - हातात धरून तसेच फेकूनही मारता येते असे शस्त्र, उदा. गदा.
(३) पाणिमुक्त - जे फेकूनच मारावे लागते, उदा. चत्र, शूळ, शक्ती ही शस्त्रे.
(४) यंत्रमुक्त - यांत्रिक साधनांनी दूर फेकले जातात, उदा. शतदनी, धनुष्यबाण, गोफण गुंडा वगैरे असे भाग करू शकतो.



कौटिलीय अर्थशास्त्रात व ग्रीक इतिहासकारांच्या लेखातही अशा शस्त्रास्त्रांचे व यंत्राचे उल्लेख आहेत. मध्ययुगात पट्टा, खंजीर, सुरा, कट्यार, तलवार, भाला ही शस्त्रे आली त्याचबरोबर संरक्षणासाठी ढाल, शिरस्त्राण, कवच हे आले. आणि आज २० व्या शतकात अणुबॉम्ब आणि २१ व्या शतकात केमिकल वॉरफेर चालू आहे. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी अनेक विद्या कौटिलीय अर्थशास्त्रात सांगितल्या आहेत.

६४. व्यायामिकी विद्या

शरीर व मन यांचे बल वाढविण्यासाठी व्यायामादी प्रकार करतात. बळ म्हणजे इंद्रियांची, स्नायूंची, प्राणांची, एकूण मानवाची जीवनधारक शक्ती होय. वैदिक आर्यांनी जे चार आश्रम कल्पिले त्यात बलोपासनेची जोड ब्रह्मचर्याशी घालून दिली आहे. विद्यार्जनाच्या काळात बलाचीही प्राप्ती करून घ्यावी आणि गुरुकुलातून बाहेर पडणारा युवा स्नातक महत्त्वाकांक्षी, बलवान व कणखर बनलेला असावा अशी वैदिकांची अपेक्षा होती.

निघण्टुमध्ये बलवाचक जवळजवळ २८२ शब्द आले आहे. बल याचा अर्थ पौरुष, गती, वीर्याधिक्य, वाढ, शरीराची चपलता असे अनेक आहेत.

ऋग्वेदात मरूत, इंद्र, वरुण, वायू इत्यादी देव बलवान म्हणून ओळखले जातात.

वैदिक काळात शरीरसामर्थ्याविषयी तीव्र आस्था होती. शिस्तबद्ध व्यायामाची पद्धती कदाचित त्या काळी निर्माण झाली नसेल पण शिकार, घोडदौड, पोहणे, नाचणे यातूनच भरपूर व्यायाम मिळून शरीरशक्ती वाढत असावी. रामायणातील हनुमान व महाभारतातला भीम हे शरीर व शरीबळ कसे असावे याचे उत्कृष्ट नमुने आहेत.

रामायणात हनुमंताविषयीच्या श्लोकात म्हटले आहे, ''पराक्रम, उत्साह, बुद्धिमत्ता, सुशीलता, माधुर्य, राजनीतिज्ञता, गांभीर्य, चातुर्य, धैर्य या दृष्टीने हनुमंतापेक्षा कोण अधिक आहे ?''

पाच पांडवांमध्ये भीम बलवान होता व त्याच्या शरीरबळाच्या गोष्टी अनेक ठिकाणी मोठ्या गौरवाने दिल्या आहेत.

पौराणिक काळी ब्रह्मचर्याश्रमात गुरुगृही विद्यार्जन करणारे विद्यार्थी शरीरबल वाढविण्यासाठी निरनिराळी आसने, प्राणायाम करीत मनोबल वाढविण्यासाठी त्रिकाल संध्या करीत. अग्निपुराणात व्यायाम व त्यासंबधी विधिनिषेध सांगितले आहेत.



शिवरायांच्या काळात बलवृद्धीकडे विशेष लक्ष दिले गेले. समर्थ रामदासांनी महाराष्ट्रात मारुतीची उपासना रूढ केली व गावोगावी तालमी स्थापल्या.

एकंदरीत समर्थांनी महाराष्ट्रात मल्लविद्या

पसरवून बलोपासनेची गोडी लावली. सूर्यनमस्कार, प्रदक्षिणा, योग या प्रकारांनीही व्यायामाचा प्रसार झाला.

भाऊसाहेब पेशवे पानिपतच्या रणांगणावरही सूर्योदयापूर्वी हजार सूर्यनमस्कार घालीत असे बखरकार सांगतात.

आजकाल जोर, बैठका, नमस्कार याबरोबरच शाळाशाळांतून सांघिक कवायती होऊ लागल्या. आजकाल लढाया जरी शारीरिक बळावर लढल्या जात नाहीत, वैज्ञानिक शस्त्रांस्त्रांनी लढल्या जातात तरी ते वापरणारे सैनिक सदृढ, चपळ, काटक असले पाहिजेत याची जाणीव आजच्या युद्धशास्त्राला आहे त्यामुळे आजच्या लष्करी तरुणांनाही विविध प्रकारचे शारीरिक व्यायाम व कवायतीचे विविध प्रकार सक्तीने करावे लागतात, हीच व्यायामिकी कला होय.

संस्कृतीकोशात ३५वी कला तक्षकर्माणि या ऐवजी तुर्ककर्म असा शब्द घेऊन त्याचा अर्थ चरखा किंवा तकलीवर सूत काढणे असा दिला आहे. ३६वी कला तक्षण याचा अर्थ दगडावरील कोरीव काम असा दिला आहे. तसेच पुष्पशकटिका - निमित्तज्ञान ह्या दोन कला एकत्र करून प्राकृतिक लक्षणांच्या आधारे भविष्य वदविणे असा दिला आहे.

चौथी कला नाट्य अशी देऊन वीणाडमरूकवाद्यांनी ही कला गाळली आहे.

मणिरागाकरज्ञान ही कला संस्कृती कोशात रत्नाचे रंग ओळखणे ही एक कला व खाणीतून खोदून रत्ने काढणे ही एक कला अशा वेगवेगळ्यांना कला मानल्या आहेत.

वात्स्यायनाची कलासूची पाहिली तर असे दिसते की ज्या कौशल्यामुळे स्त्रिया प्रसन्न होतील व वश होतील त्या सर्व कला होत.

प्राचीन व आधुनिक विद्वानांच्या मते 'काव्यसमस्यापूरणं', 'काव्यक्रिया', क्रियाकल्प, मानसी यासारख्या काव्यावर आधारित कला पाहतो.

कविता व वनिता यांचा अभेद्य संबंध आहे, असे सर्व आचार्य मानतात.

'सा कविता सा वनिता' यस्थाःश्रवणेन स्पर्शनेनच ।
कविहृदयं पतिहृदयं सरलं तरलं च सत्वरं भवति ॥

''ती कविता आणि ती वनिता आहे जिला ऐकल्याने आणि स्पर्श केल्याने कवीचे हृदय आणि पतीचे हृदय सरळ व तरल होते.'

वात्स्यायनाच्या 'कामसूत्रा'मध्ये या कलाविद्यांचा अंतर्भाव असल्याने त्याने या सर्व कलांकडे जरा वेगळ्या दृष्टीने पाहिले आहे.

तो म्हणतो, गुणवान, शीलवान व रूपसंपन्न वेश्याही ह्या कलांद्वारे आपला उत्कर्ष करू शकतात. समाजात 'गणिका' म्हणून तिला प्रतिष्ठा मिळते. राजा तिचा सन्मान करतो. गुणवान लोक तिची प्रशंसा करतात व तिच्याकडून कला शिकून घेण्यासाठी तिची प्रार्थना करतात. लखनौ, वाराणसी इथल्या वेश्यांकडून थोरामोठ्यांची मुले तहज़ीब (शिष्टाचार) शिकून घेत याची आठवण होते.

पुढे तो म्हणतो, ''ह्या कलांमध्ये निपुण राजकन्या किंवा मंत्र्यांच्या मुली मोठा जनानखाना बाळगणाऱ्या पतीलाही वश करून ठेवू शकतात. पतीपासून वियोग झाला

किंवा ती एखाद्या दारूण संकटात सापडली किंवा तिला परदेशी जावे लागले तरी या कलांच्या आधारे ती आपला उदरनिर्वाह करू शकते.

तसेच पुरुषांच्या संदर्भात वात्स्यायन म्हणतो की वार्तालाप करण्यात चतुर, गोड बोलणारा पुरुष जर या कलांमध्ये निपुण असेल तर तो अपरिचित असूनही स्त्रियांची मने आकृष्ट करू शकतो. पुढे तो म्हणतो की, ''या कलांचे ज्ञान मिळवून आपला भाग्योदय होतो परंतु जर देश आणि कला प्रतिकूल असेल तर मात्र या कलांचे योग्य फळ मिळणे कठीण होते.

इतिहासाकडे दृष्टी टाकली असता आपल्याला हेच दिसते की राजकीय व सामाजिक स्थैर्य असणाऱ्या काळातच निरनिराळ्या कला विकास पावतात.

संदर्भग्रंथांची सूची :

१. भारतीय संस्कृती कोश - १ ते १० खंड
पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९६४.

२. कामसूत्र, वात्स्यायन - देवदत्तशास्त्री
वाराणसी, चौखंबा संस्कृत सीरीज, १९६४

३. महाराष्ट्र शब्दकोश - दाते-कर्वे
नवी दिल्ली, एशियन एज्युकेशन सर्विसेस, १९८८

४. मानक हिन्दी कोश - रामचंद्र वर्मा
प्रयाग, हिन्दी साहित्य संमेलन, शके १९१९.